• पुणे, गुरूवार, २० फेब्रुवारी २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 85 • वर्ष ४ थे, अंक ८५ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News





पुण्यात अवतरली शिवशाही P३





देवाभाऊ केसरी आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धा १२


# शिवरायांचे आठवावे रुप । शिवरायांचा आठवावा प्रताप ।।



जुन्नर शिवजयंती उत्साहात: छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती किल्ले शिवनेरीवर उत्साहात साजरी करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी गडावर उपस्थित होते. (छाया - सुरेश वाणी)

सविस्तर वृत्त पान ७ वर

## शाही लवाजम्यासह शिवजयंती साजरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** देशभरात शिवजयंती उत्साहात साजरी होत असताना, कोल्हापुरात टाऊन हॉल परिसरात असलेल्या नर्सरी बागेतील छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिरात छत्रपती घरण्यामार्फत शिवजयंती शाही पद्धतीने साजरी करण्यात आली.

आज शिवाजी महाराजांची ३९५ वी जयंती असून, पाच वर्षांनंतर छत्रपती शिवरायांच्या जयंतीला ४०० वर्षे पूर्ण होतील. छत्रपती शिवाजी महाराजांचं कार्य निश्चितच देशातील सर्वांना मार्गदर्शक ठरलं आहे. त्यांनी दाखवलेल्या मार्गानं आपण पुढे जाऊ यातून देश पुढं जाईल आग्र्यामध्ये शिवजयंती साजरा होत आहे याचा आनंद आहे. आग्रामधून छत्रपती शिवाजी महाराज निसटले. महाराजांच्या गनिमी काव्याचं हे उत्तम उदाहरण आहे. छत्रपती शिवाजी महाराज आग्रावरून परत कसे आले? हे कोणालाच माहीत नाही. या संदर्भात संशोधन होण्याची गरज आहे.

मध्यंतरी अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी चुकीचं वक्तव्य केलं, छत्रपती शिवाजी महाराज हे आग्राहून निसटले हे निश्चित आहे. पण, छत्रपती शिवाजी महाराज औरंगजेबाच्या माणसांना पैसे देऊन निसटले ही गोष्ट चुकीची आहे." असं खासदार शाहू महाराज छत्रपती म्हणाले.






## शिवसृष्टीच्या तिसऱ्या टप्प्यासाठी ५० कोटींचा निधी

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठानच्या वतीने आणि पद्मविभूषण शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या मूळ संकल्पनेतून साकारत असलेली शिवसृष्टी पाहून मी नि:शब्द झालो आहे. ही शिवसृष्टी पुढील पिढ्यांसाठी प्रेरणेचे एक केंद्र ठरणार असून, यातील पुढील टप्पे लवकरात लवकर पूर्ण व्हावे या दृष्टीने शिवसृष्टीच्या तिसऱ्या टप्प्याच्या उभारणीसाठी आम्ही राज्य सरकारतर्फे ५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देणार आहोत, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केली. मी आणि राज्याचे दोन्ही उपमुख्यमंत्री आम्ही तिघेही छत्रपती शिवाजी महाराजांचे मावळेच आहोत त्यामुळे ही शिवसृष्टी पूर्ण व्हावी ही आम्हा सर्वांची इच्छा आहे असेही फडणवीस यांनी सांगितले.

शिवजयंतीचे औचित्य साधत मुख्यमंत्र्यांच्या हस्ते महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठानच्या वतीने आंबेगाव बुद्रुक येथे उभारण्यात येत असलेल्या शिवसृष्टीच्या द्वितीय चरणाचा लोकार्पण समारंभ संपन्न झाला. खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले, केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे उच्च, तंत्र शिक्षण आणि संसदीय कार्यमंत्री चंद्रकात पाटील, राज्याचे माहिती तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड आशिष शेलार, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे संघचालक नाना जाधव, पुणे महानगर संघचालक रवींद्र वंजारवाडकर, आमदार विजय शिवतारे, महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठानचे

» पान ७ वर

## दिल्ली मुख्यमंत्रीपदी रेखा गुप्ता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**नवी दिल्ली :** भारतीय जनता पक्षाने बुधवारी पहिल्यांदाच आमदार झालेल्या रेखा गुप्ता यांची भाजपच्या दिल्ली विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी निवड केली.

येत्या २० फेब्रुवारी रोजी शपथविधी सोहळ्यादरम्यान त्या दिल्लीच्या पुढील मुख्यमंत्रिपदाची सूत्रे स्वीकारणार आहेत. तब्बल २७ वर्षांनंतर दिल्लीत भाजपचे पुनरागमन झाले आहे. विधानसभेच्या ७० पैकी ४८ जागा जिंकून भाजपने २७ वर्षांनंतर राजधानीत पुन्हा सत्ता मिळवली.









- राज्यात पुण्यातील तब्बल पावणेतीन लाख विद्यार्थी
- मुंबईच्या सर्वाधिक 3.5 लाखांवर विद्यार्थ्यांचा समावेश
- २ हजार ४६० दिव्यांग विद्यार्थी
- १९ तृतीयपंथी विद्यार्थी

## १६ लाख विद्यार्थी देणार दहावीची परीक्षा

**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात येणाऱ्या दहावीच्या परीक्षेला येत्या शुक्रवारपासून (दि. २१) प्रारंभ होणार आहे. यंदा दहावीचे १६ लाखांवर विद्यार्थी परीक्षा देणार आहेत.सध्या बारावीच्या परीक्षा सुरू असून शुक्रवारपासून सुरू होत असलेल्या दहावीच्या परीक्षेमुळे राज्य मंडळाला अधिक सजग राहावे लागणार आहे. दोन्ही परीक्षांसाठी तब्बल १ लाख ८० हजारांवर मनुष्यबळ कार्यरत राहणार असल्याचे राज्य मंडळातील अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

त्यानुसार दोन्ही इयत्तांच्या विद्यार्थ्यांना हॉलतिकीट उपलब्ध करून देण्यात आले आहे. राज्य मंडळाने गैरप्रकारांवर आळा घालण्यासाठी कडक उपाययोजना केल्या आहेत. त्यामुळे बारावीच्या परीक्षेत दैंनदिन गैरप्रकार वगळता अद्याप तरी मोठा कोणताही गैरप्रकार झाला नसून परीक्षा सुरळीत सुरू असल्याचे दिसून येत आहे.

दहावीच्या परीक्षेला राज्यातील १६ लाख ११ हजार ६१० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून ५ हजार १३० केंद्रावर परीक्षा घेण्यात येणार आहे.

## एकपात्री अभिनय स्पर्धा पारितोषिक



पुणे वितरण : एकपात्री कलाकार परिषद, महाराष्ट्र आणि निळू फुले कला अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने सौ. श्यामल कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ श्यामल करंडक महिला एकपात्री अभिनय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे पारितोषिक वितरण मागीकर यांच्या हस्ते झाले.

## पालिका २०० कोटींचे हरित कर्जरोखे उभारणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरातील कार्बन उत्सर्जन, वाहतूक कोंडी कमी करणे, सायकल मार्गिका विकसित करणे, पादचाऱ्यांसाठी अनुकूल पायाभूत सुविधा उपलब्ध करणे, हवेची गुणवत्ता वाढविण्यासाठी महापालिका २०० कोटी रुपयांचे हरित कर्ज उभारणार आहे. हे कर्जरोखे उभारण्यासाठी राज्य शासनाने परवानगी दिली आहे. शहराच्या विकासाच्या अनुषंगाने पर्यावरण तसेच हवामान बदल यामध्ये सकारात्मक योगदान देणाऱ्या प्रकल्पांसाठी हरितकर्ज रोखे उभारण्यात येणार आहे. महापालिकेला हवामान बदलाचे परिणाम कमी करण्यासाठी आणि पर्यावरणाचे संरक्षण करण्याच्या दृष्टीकोनातून हरित रोख्यांमध्ये समावेश असणाऱ्या प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणावर निधीची आवश्यकता होती. दोनशे कोटींचे हरित कर्ज रोख्यांची उभारणी करण्यासाठी नऊ जुलै २०२४ मध्ये स्थायी समिती आणि १६ जुलै २०२४ रोजी सर्वसाधारण सभेने मान्यता दिली होती. त्यानंतर याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाकडे मंजुरीसाठी पाठविला होता. या प्रस्तावाला राज्य शासनाने मान्यता दिली आहे.

## गुंतवणूकदारांसाठी डीएसपी निफ्टी फंड योजना

**पुणे :** डीएसपी म्युच्युअल फंडाने गुंतवणूकदारांसाठी डीएसपी निफ्टी प्रायव्हेट बँक इंडेक्स फंड ही नवीन गुंतवणूक योजना आणल्याची घोषणा केली आहे. हा फंड मुदतमुक्त श्रेणीतील असून तो निफ्टी प्रायव्हेट बँक निर्देशांकाआधारे आपली वाटचाल करणार आहे. खासगी बँकिंग क्षेत्रातील समभागांत गुंतवणूकीवर हा फंड प्रामुख्याने आपले लक्ष केंद्रीत करणार आहे.

बँकिंग क्षेत्राबद्दल आशावादी दृष्टीकोन असलेले गुंतवणूकदार या फंडात गुंतवणूक करू शकतात. निर्देशांकात सुमारे ८० टक्के वाटा असलेल्या चार सर्वात मोठ्या खासगी बँकांच्या समभागांमध्ये गुंतवणूकीची संधी या खास दृष्टीकोनामुळे मिळते. निफ्टी प्रायव्हेट बँक निर्देशांकात मोठ्या बँकांचे झालेले केंद्रीकरण ही एक लाभाची बाजू असू शकते, अशी डिएसपीची धारणा आहे. ग्राहक अन्य लहान समकक्ष बँकांपेक्षा मोठ्या बँकांवर विश्वास ठेवतात आणि त्यांना प्राधान्य देतात. या धारणेमुळे कर्जवितरणात उच्च वाढ, भांडवलाची सहज उपलब्धता आणि मोठी आर्थिक उलाढाल आदी बाबींमुळे या मोठ्या बँकाना टिकून राहता येते, तसेच आणखी वृध्दी साध्य करता येते.

# कामे वाटपावर प्रशासनाचाच 'वरचष्मा'

### मनपा आयुक्तांची स्पष्टोक्ती :

अंदाजपत्रकात केवळ भाजपच्या नगरसेवकांच्या प्रभागात निधी दिल्याचे आढळून आल्यास या प्रकरणी महापालिकेविरोधात न्यायालयात जाण्याचा इशारा महाविकास आघाडीकडून पत्रकार परिषदेत देण्यात आला. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, शिवसेनेचे शहर प्रमुख संजय मोरे, गजानन थरकुडे, वसंत मोरे, अशोक हरणावळ, सचिन दोडके यावेळी उपस्थित होते. अशा प्रकारे प्रशासकांकडून काही ठरविक प्रभागातच अंदाजपत्रकात निधी दिल्याचे समोर आले तर तो शहरातील मतदारांबाबत भेदभाव करण्याचा प्रकार असेल, अशी टिकाही या नेत्यांनी केली.

**Analytical**



महापालिकेच्या अंदाजपत्रकासाठी या वर्षी मोठया प्रमाणात पत्रं आली आहेत. अंदाजपत्रकाच्या बैठका सुरू असल्या तरी कोणीही गुपचूप अथवा भेटून पत्रं दिलेली नाहीत. प्रत्येकाकडून कार्यालयात पत्र देण्यात आली आहेत. यात माजी नगरसेवक, पक्षाचे पदाधिकारी तसेच निवडणूक लढविण्यासाठी इच्छूक असलेल्या उमेदवारांच्या पत्रांचाही समावेश आहे. त्यात सुमारे ५० ते १०० कोटींची मागणी करण्यात आली आहे. मात्र, असा निधी देणे शक्य नाही. त्यामुळे अंदाजपत्रकात केवळ प्रशासनाला संयुक्तिक वाटतील तीच कामे घेतली जातील.

**— आयुक्त डॉ.राजेंद्र भोसले**

- संभाव्य उमेदवारांकडून निधीचा आग्रह
- सुमारे 100 कोटी च्या निधीची मागणी
- योग्य वाटेल त्याच कामांना निधी मिळेल
- पाटील , मोहोळ यांच्या हस्तक्षेपाच्या चर्चा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** स्थानिक लोकप्रतिनिधीमध्ये असलेल्या सुंदोप-सुंदीचा फायदा प्रशासनाला होत असल्याचे दिसून येत आहे. अंदाजपत्रकाचे काम बनवले जात असताना अनेकांनी शिफारशी दिल्या या सर्वच शिफारसी अमलात आणणे शक्य नाही, त्यामुळे प्रशासन म्हणेल आणि त्यांना योग्य वाटेल त्यांनाच निधी उपलब्ध केला जाईल आणि त्यांना मान्यता मिळेल असे स्पष्टपणे सांगत काल आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी या अंदाजपत्रकावर प्रशासनाचाच वर्चस्व राहील हे एक प्रकारे स्पष्ट केले.

मागील तीन वर्षांपासून रखडलेल्या महापालिका निवडणूका मे महिन्यात होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्यामुळे, या निवडणूकांना सामोरे जाताना आपल्या प्रभागात महापालिकेचा जास्तीत जास्त निधी मिळावा यासाठी माजी नगरसेवक, आमदार आणि भावी नगरसेकवकांची चढाओढ सुरू असून, महापालिकेकडे निधीच्या मागणीची शेकडो पत्रं आली आहेत. त्या पेक्षाही धक्कादायक बाब म्हणजे प्रत्येक पत्रात ५० ते १०० कोटींच्या निधीची मागणी करण्यात आली आहे.

राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या वक्तव्यावरून नव्या वादाला तोंड फुटले आहे. महापालिकेतील माजी विरोधीपक्षांकडूनही समान निधीची मागणी केली जात आहे.



## सुषमा चोरडिया यांना 'परम वीरांगना पुरस्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :**सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनच्या उपाध्यक्षा व सचिव सुषमा संजय चोरडिया यांना 'परम वीरांगना' या राष्ट्रीय पुरस्काराने नुकतेच सन्मानित करण्यात आले. परोपकारी आणि सामाजिक कार्यकर्त्या असलेल्या चोरडिया समाजाच्या भल्यासाठी आणि वंचितांच्या उन्नतीसाठी अथक परिश्रम करत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सूर्यदत्त एज्युसोशियो कनेक्ट, फूड बँक, नॉलेज बँक, क्लोदिंग बँक, प्रॉडक्ट बँक अंतर्गत विविध स्वयंसेवी कौशल्य आधारित प्रकल्प, जागरूकता कार्यक्रम आणि समाजातील गरजू, आर्थिकदृष्ट्या वंचित वर्गाला मोफत शिक्षण देण्यात येते.

पुरस्काराचे हे पहिलेच वर्ष होते. अरुणाचल व मिझोराम राज्याचे माजी राज्यपाल लेफ्ट. जनरल निर्भय शर्मा यांच्या हस्ते सुषमा चोरडिया यांना महिला सशक्तीकरणासाठी दिलेल्या विशेष योगदानाबद्दल मेडल, मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरवण्यात आले. पिंपरी-चिंचवड येथील सायन्स पार्कमध्ये झालेल्या सोहळ्यात प्रमुख वक्ते म्हणून वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अरविंद नातू, फाउंडेशनचे अध्यक्ष नरेश गोल्ला, सैन्यदलातील पदाधिकारी, विविध क्षेत्रातील मान्यवर व 'सूर्यदत्त'चे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया उपस्थित होते.



"सूर्यदत्त संस्थेच्या स्थापनेपासून विद्यार्थ्यांना सर्वोत्तम आणि सर्वांगीण शिक्षण देत आहे. विद्यार्थ्यांना मूल्याधिष्ठित शिक्षण, कमवा आणि शिका तसेच शिष्यवृत्तीच्या योजनेतून आर्थिक सहकार्य, स्टार्टअपना संधी देत आहे. सैन्यदलातील जवान सीमेवर अहोरात्र पहारा देत संपूर्ण देशाचे रक्षण करतात. त्यांच्या व कुटुंबियांच्या प्रती सूर्यदत्तने नेहमीच आदरभाव जपला आहे. सैन्याशी संबंधित संस्थेकडून मिळालेला हा पुरस्कार येत्या काळात शिक्षण आणि महिलांच्या सक्षमीकरण क्षेत्रात प्रभावी कार्य करण्यास पाठबळ देणारा आहे.

**— सुषमा चोरडिया**



सत्कार : शिवजयंती महोत्सव समितीतर्फे गेली १३ वर्षांपासून शिवजन्मोत्सव स्वराज्यरथ सोहळा या भव्यदिव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात येते. या मिरवणुकांमध्ये सरसेनापती, सरदार, सुभेदार, वीर मावळे आणि वीर मातांच्या स्वराज्यरथांचा सहभाग असतो. यामध्ये सहभागी असलेल्या स्वराज्यरथांचे स्वागत करत सरदारांच्या वारसदारांचा सन्मानपत्र, शाल देत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तर्फे उपाध्यक्ष दत्ताभाऊ सागरे व पदाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## 'भारती सिंपोजियममध्ये साडेचारशे फार्मासिस्ट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाचे पूना कॉलेज ऑफ फार्मसी आणि इंडियन फार्मास्युटिकल असोसिएशन विद्यार्थी मंच पुणे (आयपीएएसएफ पुणे) यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या ६ व्या 'आंतरराष्ट्रीय फार्मा ई-सिम्पोजियम २०२५'चे आयोजन केले. राज्याच्या विविध कोपऱ्यातून ४५० हून अधिक फार्मसी आणि फार्मा मॅनेजमेंट विद्यार्थी उपस्थित राहिले.

सुश्रुत सभागृह (भारती विदयापीठ, धनकवडी) येथे झालेल्या या परिषदेला चांगला प्रतिसाद मिळाला. या फार्मा ई-सिम्पोजियमचे उद्घाटन ब्रिंटन फार्मास्युटिकलचे अध्यक्ष राहुलकुमार दर्डा यांच्या हस्ते करण्यात आले. पूना कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. आत्माराम पवार, डॉ. एल. साथीयानारायणनन, डॉ. चंदकांत कोकरे, सचिव डॉ. रवींद्र कांबळे, आयपीए विद्यार्थी मंच पुणेचे अध्यक्ष देव डांगी या कार्यक्रमात उपस्थित होते. पूना कॉलेज ऑफ फार्मसीचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. अमरजितसिंग राजपूत यांनी या परिषदेचे संयोजन केले. या परिषदेत औषधनिर्माण शास्त्रामध्ये उद्योजकता विकास, स्टार्टअप्स, इन्व्हेस्टमेंट अँड फायनान्स, मार्केटिंग व आर्टिफिशियल इंटेलिजन्स यांसारख्या विषयांवर विचार मंथन करण्यात आले.




पुणे आंतरराष्ट्रीय फार्मा ई-सिम्पोजियम २०२५' उद्घाटन प्रसंगी ब्रिंटन फार्मास्युटिकलचे राहुल कुमार दर्डा आणि मान्यवर

## अमृता जोशी यांचा करमज्योत ने गौरव

**पुणे :** करम प्रतिष्ठानतर्फे गझलकारा अमृता जोशी यांचा सुप्रियास्मृती करमज्योत पुरस्काराने सन्मान केला जाणार आहे. पुरस्कार वितरण समारंभ रविवार, दि. २३ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती करम प्रतिष्ठानचे अध्यक्ष भूषण कटककर आणि प्रज्ञा महाजन यांनी निवेदनाद्वारे कळविली आहे.

सुप्रिया जाधव यांच्या नावे दिल्या जाणाऱ्या सुप्रियास्मृती करमज्योत पुरस्काराचे यंदाचे पाचवे वर्ष असून कार्यक्रम सकाळी ११ वाजता पत्रकार भवन, दुसरा मजला, नवी पेठ येथे आयोजित करण्यात आला आहे. मुक्ता भुजबळे, चिन्मयी चिटणीस यांचा विशेष सहभाग असणार आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.

# कोथरूडकारांसाठी थेट नागपूरच्या बागेतील संत्री




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोथरूड :** विदर्भाचे पीक समजले जाणारे संत्री आता कोथरूडकारांना थेट विदर्भाच्या शिवारातून उपलब्ध होत आहे. उद्यापासून कोथरूडच्या गांधी भवन मध्ये संत्र्यांचे प्रदर्शन आणि विक्री सुरू होईल.

पणन मंत्री जयकुमार रावल यांच्या निर्देशानुसार महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत दरवर्षी 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' संकल्पनेअंतर्गत गांधी भवन, कोथरूड येथे २० ते २६ फेब्रुवारी दरम्यान 'संत्रा महोत्सव-२०२५ चे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली आहे.

संत्रा उत्पादकांची नोंदणी प्रक्रिया ही पणन मंडळाच्या अमरावती व नागपूर विभागीय कार्यालयाकडे करण्यात आलेली असुन यावेळी सुमारे ५० संत्रा उत्पादक सहभागी होणार आहेत. या उत्पादकांना पुणे येथील गांधी भवन, कोथरूड येथे सुमारे २५ स्टॉल उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.


### थेट उत्पादकांकडून ग्राहकांपर्यंत

या उत्पादकांमार्फत उत्तम प्रतिचा मृग बहारातील चवीला गोड असणारा अस्सल नागपूरी संत्रा, संत्र्याचा चवदार ताजा रस, संत्रा बर्फी व इतर संत्रा उत्पादने ग्राहकांना थेट उत्पादकांकडून उपलब्ध होणार आहे. विदर्भातील उच्च प्रतीच्या नागपूरी संत्रा व इतर उत्पादित पदार्थांचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री.कदम यांनी केले.

पिवळ्या-केशरी रंगाच्या संत्री दिसायला मनमोहक, चवीने आंबट-गोड असल्यामुळे मनाला व शरीराला तृप्तीदायक असे हे फळ आहे. त्याच्या अवीट आंबट गोड स्वादामुळे लहान बालकांपासून ते वृद्धापर्यंत सर्वांना ते गुणकारी असते . अशी संत्री आम्हला पुणेकरांना उपलब्ध करून देताना आनंद होत आहे."

**— संजय कदम**
कार्यकारी संचालक

राष्ट्रसंचार
गुरूवार, २० फेब्रुवारी २०२५



# पुण्यात अवतरली शिवशाही



प्रौढ प्रताप पुरंदर महापराक्रमी रणधुरंदर क्षत्रियकुलावतंस् सिंहासनाधीश्वर महाराजाधिराज महाराज श्रीमंत श्री छत्रपती शिवाजी महाराज!

निश्चयाचा महामेरु । बहुत जनांसी आधारु । अखंड स्थितीचा निर्धारु । श्रीमंत योगी ।।

## छत्रपतींच्या जयघोषात शिवजयंती साजरी

### हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टीद्वारे अभिवादन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** शिवजयंती महोत्सव समिती, पुणे तर्फे लालमहाल येथून शिवजन्मोत्सव स्वराज्यरथ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या भव्यदिव्य मिरवणुक सोहळ्याचे उद्घाटन शिवरायांचे वंशज श्रीमंत खासदार छत्रपती उदयनराजे भोसले महाराज, सहकार आणि नागरी विमान वाहतूक केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर, समितीचे संस्थापक अध्यक्ष अमित गायकवाड, पोलीस उपायुक्त विशेष शाखा मिलींद मोहिते, आमदार भीमराव तापकीर, चेतन तुपे, सिध्दार्थ शिरोळे, हेमंत रासने तसेच सर्व स्वराज्यघराण्यांचे प्रतिनिधी यांच्या हस्ते झाले.

यावेळी पोलीस उपायुक्त संदीप गिल्ल, दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने जेष्ठ विधीज्ञ प्रताप परदेशी उपस्थित होते. मिरवणुकीचे यंदा १३ वे वर्ष होते.



छत्रपती शिवाजी महाराज हे युगपुरुष आहेत. शिवाजी महाराजांचा ऐक्याचा विचार आजही पाहायला मिळत आहे. पुण्यात शिवजयंती उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होत असून सर्व जाती धर्माचे लोक एकत्र येत आहेत. यानिमित्ताने शिवरायांसोबत असलेले सरदार, मावळे यांचे स्मरण होत आहे."

**— छत्रपती उदयनराजे भोसले**



छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक होता, त्यावेळी प्रत्येक पायरीवर त्यांना स्वराज्यातील सरदार व मावळ्यांची आठवण झाली. स्वराज्य स्थापनेमध्ये शिवरायांसोबत असलेले सरदार व मावळे यांचे स्मरण या शिवजयंतीच्या सोहळ्याच्या निमित्ताने केले जात आहे."

**— मुरलीधर मोहोळ**

#### ढोल ताशाच्या वादनाने वातावरण मंत्रमुग्ध

भारताच्या इतिहासातील शिवकालीन युध्दकला सादर करणाऱ्या ५१ रणरागिनींच्या औरंगासुर मर्दिनी भद्रकाली महाराणी ताराराणी शौर्य युध्दकला सादर केली. ढोल ताशा पथकाच्या वादनाने झाले. सोहळ्याचे आयोजन संस्थापक अध्यक्ष अमित पायगुडे, रवींद्र कंक, शंकर स्वराज्यबांधवांनी केले

रणरागिनी पथक मर्दानी नादब्रह्म वातावरण मंत्रमुग्ध समितीचे प्रवर्तक गायकवाड, सचिन कडू यांसह असंख्य होते.



#### हेलीकॉप्टर मधून पुष्पवृष्टी

आपल्या महाराष्ट्रात जन्मलेल्या प्रत्येकावर शिवरायांचे संस्कार हे लहानपणीच झाले असतात. शिवाजी महाराज म्हणले की आपसुकच आपण जय म्हणतो. माझे हे परमभाग्य आहे की शिवरायांच्या विश्वातील पहिल्या स्मारकावर मी सलग १४ वर्षे पुष्पवृष्टी करतो आहे, असे ईशान गायकवाड म्हणाले.

## शिवरायांचे विचार, स्वाभिमानाचा जागर!



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून हिंदवी स्वराज्य संस्थापक वंदनीय छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त 'जय शिवाजी-जय भारत' या पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. सीओईपी मैदान ते फर्ग्युसन महाविद्यालयापर्यंत झालेल्या या पदयात्रेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांची प्रमुख उपस्थिती होती.

छत्रपती शिवरायांनी आपल्याला दिलेला स्वाभिमान, एकता, पराक्रम आणि न्यायाचे विचार पुढे नेण्यासाठी एकत्र येणे आणि शिवविचारांचा जागर करणे हा या पदयात्रेचा मुख्य उद्देश होता.

या पदयात्रेत राज्याचे कॅबिनेट मंत्री चंद्रकांत पाटील, केंद्रीय राज्यमंत्री मा. रक्षा खडसे, राज्याचे कॅबिनेट मंत्री दत्तात्रय भरणे, मा. केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर, राज्याचे कॅबिनेट मंत्री ॲड.आशिष शेलार, खासदार मेधा कुलकर्णी, आमदार सिद्धार्थ शिरोळे, आमदार हेमंत रासने यांच्यासह शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी आणि नागरिक मोठया संख्येने सहभागी झाले होते.



'छत्रपती शिवाजी महाराज की जय!' चा जयघोष

## 'एमआयटी एडीटी' विद्यापीठात शिवजयंती जल्लोषात



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सनई-चौघड्यांच्या मंजुळ स्वर, तुतारीच्या गगनभेदी गर्जना, ढोल-ताशांचा निनाद, भगव्या पताका, मर्दानी खेळ 'छत्रपती शिवाजी महाराज की जय!' 'जय भवानी, जय शिवराय!', 'नमो पार्वती पते, हर...हर.. महादेव'... या घोषणांचा जयघोष अशा जल्लोषपूर्ण वातावरणात येथील एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठात महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५वी जयंती साजरी करण्यात आली.

विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारावरील छत्रपती शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याजवळ विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष प्रा.डॉ.मंगेश कराड यांच्या हस्ते हिंदवी स्वराज्याचे प्रतिक असणारा भगवा ध्वज फडकावून जयंती उत्सवास प्रारंभ करण्यात आला. याप्रसंगी एमआयटी 'एडीटी'च्या कार्यकारी संचालक प्रा. डॉ.सुनीता कराड, कुलगुरू प्रा. डॉ.राजेश एस., प्र.कुलगुरू डॉ.मोहित दुबे, कुलसचिव डॉ.महेश चोपडे, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ.सुराज भोयार, परीक्षा विभाग संचालक डॉ. ज्ञानदेव निलवर्ण, डॉ.अतुल पाटील, डॉ.सपना देव आदी मान्यवर उपस्थित होते.

- शेकडो विद्यार्थ्यांकडून शिवरायांवरील कविता व पोवाडा आणि पाहाडी आवाजातील शिवगर्जना - सांस्कृतिक नृत्य व मैदानी खेळांची प्रात्याक्षिके
- शिवरायांची पालखीसह मिरवणूक
- अश्वारूढी पुतळ्याला क्रेनद्वारे पुश्वहार अर्पण

माझ्या ऑफिस मध्ये असणाऱ्या छत्रपती शिवाजीराजांच्या मूर्ती पुढे नतमस्तक होऊन दिनक्रम सुरू करतो. कारण छत्रपती शिवराय हे उर्जेचा प्रचंड मोठा स्त्रोत आहेत. आयुष्यात कितीही मोठ्या समस्या, संकटे आली तरी शिवचरित्र वाचल्यास त्यावर मार्ग सापडतो.

**—प्रा. डॉ. मंगेश कराड,**
**विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष**

#### रक्तदान शिबिराला उत्फुर्त प्रतिसाद

शिवजयंतीच्या पार्श्वभूमिवर विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिर व गडकिल्ले बनविण्याच्या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्फुर्त प्रतिसाद लाभला. रक्तदान शिबिरात तब्बल २१६+ दात्यांनी रक्तदान केल्याने हे शिबिर अत्यंत यशस्वी ठरले. रक्तदान शिबिरासारखे सामाजिक उपक्रम राबवून शिवजयंती साजरी केल्याने परिसरातील नागरिकांकडून कौतुक होत आहे.



## चार वर्षाच्या माणिकची लक्षवेधक तिरंदाजी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शिवजयंतीनिमित्त टिळक रोड वरील डेक्कन एज्युकेशन सोसायटीची मुरलीधर लोहिया मातृमंदिर पूर्व प्राथमिक शाळेत अनोख्या पध्दतीने साजरी करण्यात आली. शाळेतील अवघ्या चार वर्षाचा मुलगा माणिकराव प्रतिक मोहिते या विद्यार्थ्यांने सहजपणे लाठीकाठी, तलवारबाजी, धनुष्यबाणाचे प्रात्यक्षिक सादर केले. तर गंधर्व निर्मल या विद्यार्थ्याने शिवगर्जना म्हटली. या निमित्ताने मुले छत्रपती शिवाजी महाराज यांच्या वेशभुषेत आली होती. रोहिडेश्वराची शपथ या प्रसंगावर नाटिका सादर करण्यात आली. हा उपक्रम माधुरी बर्वे यांच्या संकल्पनेतून उत्साहात पार पडला.



## जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स तर्फे 'जाणता राजा' विषयावरील व्याख्यान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली, स्वराज्याचे रक्षण छत्रपती संभाजी महाराजांनी केले आणि त्याचे साम्राज्य श्रीमंत बाजीराव पेशवे यांनी यांनी उभारले. छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र म्हणजे पाचवा वेद आहे. आपल्या संस्कृतीतील चार वेदांप्रमाणे या वेदाचा देखील अभ्यास प्रत्येकाने करायला हवा, असे मत व्याख्याते पराग ठाकूर यांनी व्यक्त केले.

जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स तर्फे शिवजयंतीनिमित्त 'जाणता राजा' याविषयावरील व्याख्यानाचे आयोजन संस्थेच्या सभागृहात करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष ॲड.शार्दुल जाधवर उपस्थित होते. संस्थेतर्फे शिवजयंतीनिमित्त भव्य मिरवणुकीचे देखील आयोजन करण्यात आले होते.



आमच्या देव्हाऱ्यातील देव शिवरायांमुळे सुरक्षित राहिले. छत्रपती शिवाजी महाराजांची दूरदृष्टी किती असावी, हे आपल्याला पाहायला मिळते. युद्ध हे लढण्यास आणि सरकार हे चालविण्यास असते, ते शिवरायांनी शिकविले. शिवरायांवर कोणीही टीका लिहून ठेवली नाही. परदेशी लेखकांनी देखील नाही. इतिहास वाचल्याशिवाय भविष्य घडणार नाही. देव देश, धर्म आणि स्वराज्याला सोन्याच्या सिंहासनावर बसविण्याकरिता शिवरायांनी कार्य केले. **—पराग ठाकूर**

## १०हजार अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांची शिवजयंतीदिनी अभिवादन मिरवणूक!



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणावळा :** 'महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटन एज्युकेशन सोसायटी'च्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांच्या भव्य अभिवादन मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. बुधवारी सकाळी साडे आठ वाजता आझम कॅम्पस चे वरिष्ठ विश्वस्त डॉ एन वाय काझी यांच्या हस्ते मिरवणुकीस प्रारंभ झाला. संस्थेचे सचिव प्रा. इरफान शेख यांनी मिरवणुकीचे नेतृत्व केले.शाहीद इनामदार,एस. ए. इनामदार, मशकुर शेख, साबीर शेख, सिकंदर पटेल, आसिफ शेख,महमद गौस सय्यद, कुलगुरू डॉ लॉरेन्स,विश्वस्त, पदाधिकारी, प्राध्यापक, शिक्षक, विदयार्थी सहभागी झाले. पुण्यातील अल्पसंख्य, बहुजन समाजातील विद्यार्थी यांचा सहभाग असलेली ही सर्वात मोठी शिवजयंतीदिनाची अभिवादन मिरवणूक ठरली !

मिरवणूकीत शैक्षणिक संस्थांचे सर्व प्राचार्य, पदाधिकारी, कर्मचारी, दरबार ब्रास बॅण्डची दोन पथके, ढोल-ताशांचे पथक, तुतारी, नगारे देखील सहभागी झाले.



## मुस्लिम मावळ्यांची शिवजयंती

### कोंढव्यात राष्ट्रीय एकात्मतेचा आदर्श

**कोंढवा :** पुण्यातील कोढवा येथे मुस्लिम मावळा फाउंडेशनच्या वतीने सर्वधर्मीय शिवजयंती सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या घोषणा देत अतिशय भव्य अशी मिरवणूक काढण्यात आली होती. यामध्ये मुस्लिम समाजातील युवक ,महिला व शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या शिवजयंती सोहळ्याचे आयोजन मुस्लिम मावळा फाउंडेशनचे हाजी गफूर पठाण यांनी केले होते.

सर्व धर्मियांना समान न्याय देणारे छत्रपती शिवाजी महाराजांचे आम्ही मुस्लिम मावळे आहोत. याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. सालाबादप्रमाणे यावर्षीही श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाला वंदन करुया आणि त्यांच्या विचारांना उजाळा देऊया आणि शिवाजी महाराजांची सर्वधर्म समभावाचे विचार समजापर्यंत पोहचणे गरजेचे असल्याचे मत यावेळी आयोजक मुस्लिम मावळा फाउंडेशनचे हाजी गफूर पठाण यांनी व्यक्त केले .



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त 'जय शिवाजी-जय भारत' या पदयात्रेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ सहभागी झाले.

## ६४ लाखांचा गुटखा जप्त

**पुणे :** गुटख्यावर बंदी घातलेली असताना शहरात छुप्या पद्धतीने गुटख्याचे वितरण, तसेच विक्री प्रकरणात काळेपडळ पोलीस, तसेच अन्न आणि औषध प्रशासन विभागाने (एफडीए) कारवाई करुन ६४ लाखांचा गुटखा जप्त केला. गुटख्याची वाहतुकीसाठी वापरण्यात येणारे चार मालवाहू वाहने (पीकअप) पोलिसांनी जप्त केले. याप्रकरणी एकाला अटक करण्यात आली.



**सभासद नोंदणी अभियान :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सभासद नोंदणी अभियानाच्या पार्श्वभूमीवर आज लोकमान्य सभागृह, केसरीवाडा येथे शहराध्यक्ष दीपक मानकर यांच्या अध्यक्षतेखाली आणि निरीक्षक सुरेश पालवे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत सभासद नोंदणी अभियानाचा शुभारंभ झाला. या प्रसंगी सदर प्रसंगी माजी महापौर दत्तात्रय धनकवडे, माजी स्थायी समिती अध्यक्ष बाबुराव चांदेरे, माजी नगरसेवक सुभाष जगताप, माजी विरोधी पक्षनेते दत्ता सागरे, विरोधी पक्षनेत्या दिपाली प्रदीप धुमाळ आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## आता पर्यावरण विषयाची सक्ती

**पुणे :** सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार पर्यावरण विषयाचा पदवी अभ्यासक्रमांमध्ये समावेश करण्यात आला आहे, असे पत्रात नमूद केले आहे. या आदेशानंतर उच्च शिक्षण संस्थांना पदवी अभ्यासक्रमात पर्यावरण विषय समाविष्ट करणे बंधनकारक झाले आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार पर्यावरण विषयाचा पदवी अभ्यासक्रमांमध्ये समावेश करण्याचा निर्णय विद्यापीठ अनुदान आयोग अर्थात यूजीसीने घेतला आहे. या संदर्भात यूजीसीने सर्व राज्यांच्या शिक्षण सचिवांना आणि विद्यापीठांच्या कुलगुरूंना पत्र लिहून पर्यावरण विषयाचा समावेश करण्याबाबत माहिती दिली आहे.




## डीपी रस्त्यावर सोनसाखळी, दुचाकी, तलवार जप्त

**पुणे :** एरंडवणे भागातील डीपी रस्त्यावर धावण्याचा सराव करणाऱ्या तरुणाला तलवारीचा धाक दाखवून लुटणाऱ्या चोरट्यांना अलंकार पोलिसांनी गजाआड केले.सुमीत उर्फ अभिषेक उर्फ डायमंड राजू आसावरे (वय १९), अभिषेक उर्फ कानोळ्या भारत खंदारे (वय २२, दोघे रा. किष्किंदानगर, कोथरूड) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. आरोपींकडून तलवार, दुचाकी, दोन सोनसाखळ्या, पेंडेंट असा दोन लाख ८६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



**स्वराज्यरथ:** शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने आयोजित स्वराज्यरथ उत्सवात पहिल्यांदाच सहभागी झालेला अंजिक्यतारावीर किल्लेदार मानाजीराव साबळे यांचा रथ आकर्षणाचा केंद्र ठरला.

## अभिवादन..!




**पुणे** सिंहगडच्या एरंडवणे कॅम्पस मध्ये छत्रपती शिवरायांचा 25 फुटी भव्य बॅनर लावून शिवजयंतीचा जल्लोष साजरा करण्यात आला

# दीड हजार कोटी खर्च तरी योजना अपूर्ण

### झोपी गेलेल्या प्रशासनाला जाग कधी ?

एकीकडे महापालिकेने जादा पाणी वापरले म्हणून पाटबंधारे विभाग महापालिकेस कोटयवधीचा दंड आकारत आहे. तर, दुसरीकडे पाण्याची गळती रोखून पुणेकरांना समान पाणी योजनेचे पाणी देण्यासाठी पालिकेकडून राबविल्या जाणाऱ्या योजनेचे काम कासवतीने सुरू आहे. २०१८ मध्ये सुरू झालेल्या या योजनेचे काम अद्यापही पूर्ण झालेले नाही.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पाण्याची गळती रोखण्यासाठी आणि शहराच्या सर्व भागांना समान पाणीपुरवठा योजना करण्यासाठी महापालिकेने २४ बाय ७ ही योजना राबविली आहे. या योजनेच्या प्रत्यक्ष कामाला फेब्रुवारी २०१८ मध्ये सुरवात झाली. पाच वर्षांच्या कालावधीत म्हणजे मार्च २०२२ पर्यंत या योजनेचे काम पूर्ण करण्याची मुदत होते. मात्र, मुदत संपूनही काम अपूर्ण असल्याचे सजग नागरिक मंचाने माहिती अधिकारात विचारलेल्या माहितीवरून समोर आले आहे. या योजनेवर आतापर्यंत दीड हजार कोटी रुपये खर्च झाले आहेत. या कामाचा स्कोप २५% नी कमी करूनही हे काम मार्च २०२६ पर्यंत रेंगाळणार असे मिळालेल्या माहितीवरून स्पष्ट होत आहे.

मोठा गाजावाजा करून राबविलेली महापालिकेची चोवीस तास समान पाणीपुरवठा योजनेची मुदत संपून दोन वर्षे उलटूनही या योजनेचे काम अपूर्णच असल्याचे समोर आले आहे. अद्यापही जवळपास २० टक्के काम शिल्लक असून ते पूर्ण होण्यासाठी किमान एक वर्षभराचा कालावधी लागणार आहे.



पुण्यात पाणीगळती ४० टक्के आहे आणि ती कमी करण्यासाठी ही समान पाणीपुरवठा योजना आणण्यात आली आहे. एकीकडे जलसंपदा खाते पुण्यातील जादा पाणी वापरावर दंडात्मक बिल आकारणी करत आहे आणि याला उत्तर म्हणून ज्या समान पाणीपुरवठा योजनेकडे बोट दाखवले जात आहे ती मात्र वर्षानुवर्षे रेंगाळती हे अत्यंत खेदजनक आहे.

**— विवेक वेलणकर**
अध्यक्ष, सजग नागरिक मंच.

### योजनेची सध्या सद्य:स्थिती

- योजनेची सध्या सद्य:स्थिती
- या योजनेतंर्गत बांधण्यात येणाऱ्या एकूण ८६ टाक्यांपैकी सहा वेळा मुदतवाढ दिल्यानंतरही ६० टाक्यांचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरीत २६ टाक्यांची कामे बाकी आहेत.
- मध्यवर्ती पेठांमधील पाणी मीटर बसविण्याचे काम फक्त ६७ टक्के मीटर्स बसले असून पाईप लाईनचे काम ८४ टक्के पूर्ण झाले आहे.
- लोहगाव, धानोरी, कळस या भागातील कामाची सद्यस्थिती बघता ९३% काम पूर्ण झाले आहे.
- वारजे भागात ८२ टक्के मीटर्स बसले असून पाईप लाईनचे काम ९७% पूर्ण झाले आहे.
- कॅन्टोन्मेंट भागात फक्त ५१ टक्के मीटर्स बसले असून पाईप लाईनचे काम फक्त ११ टक्के पूर्ण झाले आहे.
- वडगाव भागात ८७ टक्के मीटर्स बसले असून ९७ टक्के पाईप लाईनचे काम पूर्ण झाले आहे.
- ट्रान्समिशन लाईन्सचे काम ८७ टक्के पूर्ण झाले आहे.

# प्रेरणादायी प्रवास घडवणार 'आता थांबायचं नाय !'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** झी स्टुडिओजने मराठी सिनेसृष्टीला आणि प्रेक्षकांना आजवर अनेक दर्जेदार आणि मनोरंजनात्मक चित्रपट दिले आहेत. असाच एक जबरदस्त चित्रपट घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला येण्यासाठी झी स्टुडिओज पुन्हा एकदा सज्ज झाले आहे. 'आता थांबायचं नाय' असे या चित्रपटाचे नाव असून झी स्टुडिओज, चॉक अँड चीज फिल्म्स आणि फिल्म जॅझ निर्मित हा चित्रपट येत्या महाराष्ट्र दिनी म्हणजेच १ मे रोजी हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. शिवराज वायचळ दिग्दर्शित या चित्रपटात भरत जाधव, सिद्धार्थ जाधव, प्राजक्ता हनमगर, किरण खोजे,




प्रवीण डाळिंबकर, ओम भुतकर, पर्ण पेठे आणि आशुतोष गोवारीकर यांच्या प्रमुख भूमिका आहेत. तर उमेश कुमार बन्सल, बवेश जानवलेकर, निधी हिरानंदानी आणि धरम वालिया निर्माते आहेत. नुकताच या चित्रपटाचा फर्स्ट लूक 'झी गौरव पुरस्कार' सोहळ्यात लाँच करण्यात आला. एकंदरच पहिली झलक पाहाता आणि चित्रपटाच्या नावातही लेखणी दिसत असल्याने हा चित्रपट शिक्षणावर आधारित आहे, हे नक्की ! चित्रपटाबद्दल दिग्दर्शक शिवराज वायचळ म्हणातात, " हा चित्रपट सत्यघटनेवर आधारित असून आयुष्यातील संघर्ष आणि पुढील वाटचालीसाठी एक प्रेरणादायी संदेश देण्याचा प्रयत्न या चित्रपटातून करण्यात आला आहे. या प्रवासात आम्हाला झी स्टुडिओजची साथ लाभली. त्यांच्याशिवाय हे शक्यच नव्हते आणि यासाठी मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. १ मे हा दिवस महाराष्ट्रातील सांस्कृतिक वारसा आणि आत्मविश्वासाचा दिवस म्हणून साजरा केला जातो आणि 'आता थांबायचं नाय' हा चित्रपट याच भावनेला उजाळा देणार आहे."

# रंगावलीतून शिवचरित्र

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राजमाता जिजाऊंचे तुळजाभवानी मातेला साकडे... शिवबांचा जन्म... शिवरायांचे पहिले सूर्यदर्शन... शिवरायांचे शस्त्र शिक्षण... अफजल खान वध... बाजीप्रभूंचे शौर्य... भक्ती शक्ती संगम अशा विविध रंगावलीतून कलाकारांनी अतिशय सुंदर आणि प्रभावी शिवचरित्र साकारले.



पुण्यात पहिल्यांदाच रंगावलीतून शिवचरित्र साकारण्यात आले आहे. लक्ष्मी रस्त्यावरील श्री गजानन मंडळाच्या वतीने शिवजन्मोत्सव सोहळ्यानिमित्त श्रीरंग कला दर्पण फाउंडेशनच्या सहयोगाने भव्य रांगोळी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. स्वराज्याची शपथ, रांझ्याच्या पाटलाला कठोर शिक्षा, सुरत स्वारी, पुरंदरचा तह, जिजाऊंना सती जाण्यापासून रोखण्याचा प्रसंग, आग्रा दरबारातील सिंहगर्जना, आग्र्याहून गरुडभरारी, गड आला पण सिंह गेला, आरमाराचे बळकटीकरण, समर्थ रामदास आणि शिवराय, शिवराज्याभिषेक या कथा प्रसंगावर रांगोळ्या पाहण्याची संधी पुणेकरांना मिळाली.

# जैन पिता-पुत्रांना राष्ट्रीय सावरकर पुरस्कार जाहीर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या आत्मार्पण दिनानिमित्त निगडी प्राधिकरणातील स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळाच्या वतीने स्वातंत्र्यवीर सावरकर पुरस्कार प्रदान सोहळा होणार आहे. बुधवारी २६ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी ६:३० वाजता ग. दि. माडगूळकर नाट्यगृह, निगडी येथे हा कार्यक्रम होणार आहे.



ज्येष्ठ विधिज्ञ पद्मश्री उज्वल निकम यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान होणार आहे. यामध्ये सर्वोच्च न्यायालयातील ज्येष्ठ विधिज्ञ अ‍ॅड. हरि शंकर जैन आणि विधिज्ञ अ‍ॅड. विष्णु शंकर जैन या पितापुत्रांना स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय पुरस्कार २०२५ प्रदान करून गौरविण्यात येईल. तसेच हिंदुत्ववादी सामाजिक कार्यकर्त्या मीरा अ. कडबे यांना स्वातंत्र्यवीर सावरकर राज्यस्तरीय पुरस्कार २०२५ प्रदान करून सन्मानित करण्यात येणार आहे.

पुरस्काराचे हे सतरावे वर्ष असून हिंदुत्व आणि हिंदू धर्मासाठी अनेक वर्षांपासून कायदेशीर संघर्ष करणारे अ‍ॅड. हरि शंकर जैन आणि अ‍ॅड. विष्णु शंकर जैन या पितापुत्रांना रुपये एक लक्ष आणि सन्मानचिन्ह प्रदान करून राष्ट्रीय पुरस्काराच्या माध्यमातून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात येणार आहे

## मद्यपी टोळक्याकडून पोलीस कर्मचाऱ्याला मारहाण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पोलीस ठाण्यातील काम संपवून घरी निघालेल्या पोलीस कर्मचाऱ्याने सेनापती बापट रस्त्यावर गोंधळ घालणाऱ्या मद्यपी टोळक्याला हटकले. मद्यपी टोळक्याने थेट पोलीस कर्मचाऱ्यावर हल्ला करुन त्याला बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. या घटनेनंतर चतु:श्रृंगी पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेलेल्या पोलीस कर्मचाऱ्याची तक्रार घेण्यास टाळाटाळ करण्यात आली. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी तत्काळ याप्रकरणात गुन्हा दाखल करुन आरोपींना अटक करण्याचे आदेश दिले. घिंना अटक करण्यात आली.

# टाळे काढले : देखरेखीची जबाबदारी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शुद्ध पाणी पुरविण्याचा दावा करणाऱ्या आरओ प्रकल्पांमध्ये गुलियन बॅरी सिंड्रोमसाठी (जीबीएस) कारणीभूत असणारा जिवाणू आढळून आल्याने महापालिकेने ३० प्रकल्पांना टाळे ठोकले होते. या प्रकल्पांसाठी महापालिकेने नियमावली तयार केली आहे. त्यातील अटींची पूर्तता करण्याच्या भरवशावर या प्रकल्पांचे टाळे काढून टाकले आहे.



तसेच आता या प्रकल्पांवर देखरेख ठेवण्याची जबाबदारी पाणी पुरवठा विभागाऐवजी क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आली आहे.

महापालिकेने धायरी, नांदेड, किरकटवाडी परिसरातील ३० आरओ प्रकल्पांतील पाणी पिण्यास अपायकारक असल्याने महापालिकेने त्यांना टाळे ठोकले होते. हे टाळे महापालिकेने काढावे यासाठी राजकीय दबाव आणला होता, पण महापालिकेने त्यास दाद दिली नाही.

त्यानंतर प्रकल्प चालकांची अधिकाऱ्यांनी महापालिकेत बैठक घेतली होती. त्यात प्रकल्पचालकांचे म्हणणे घेऊन घेण्यात आले. त्यानंतर महापालिकेने जर आरओ प्रकल्प पुन्हा सुरू करायचे असल्यास ज्या कंपनीची यंत्रणा आहे ती पुन्हा तपासून घ्यावी, तसेच प्रकल्पाच्या ठिकाणी पाणी शुद्ध करण्यासाठीची (क्लोरिनेशन) स्वतंत्र यंत्रणा उभारावी.

# 'पोस्ट डॉक फेलोशिप' चा सावळा गोंधळ




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सर्वसाधारणपणे पीएच. डी. पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी पुढील संशोधनासाठी परदेशातील विद्यापीठांमध्ये प्रवेश घेतात. ही बाब लक्षात घेऊन पीएच. डी.नंतरच्या संशोधनाला चालना देण्यासाठी डॉ. नितीन करमळकर यांनी त्यांच्या कुलगुरू पदाच्या काळात पुढाकार घेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात पोस्ट डॉक फेलोशिप सुरू करण्याचा निर्णय घेतला. पोस्ट डॉक फेलोशिप सुरू करणारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ बहुधा राज्यातील एकमेव विद्यापीठ आहे. त्यानुसार २०१९मध्ये पहिल्यांदा फेलोशिपची प्रक्रिया राबवून पात्र उमेदवारांची निवड करण्यात आली. फेलोशिप सुरू केल्यानंतर दर वर्षी प्रक्रिया राबवणे आवश्यक होते. मात्र, २०२०मध्ये करोना प्रादुर्भाव सुरू झाल्याने चार वर्षे ही फेलोशिप प्रक्रिया राबवण्यातच आली नाही. यंदा सप्टेंबरमध्ये पुन्हा फेलोशिपची प्रक्रिया सुरू करण्यात आली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे देण्यात येणाऱ्या 'पोस्ट डॉक फेलोशिप'ची रखडपट्टी झाली आहे. सप्टेंबरमध्ये अर्ज प्रक्रिया सुरू केल्यानंतर फेब्रुवारीमध्येही फेलोशिपधारकांची नावे जाहीर करण्यात आलेली नाहीत.

### प्रक्रिया शिथिल

**'सावित्रीबाई फुले पुणे युनिव्हर्सिटी - पोस्ट डॉक्टरल फेलोशिप' विज्ञान, तंत्रज्ञान, वाणिज्य, मानव्यविज्ञान, भाषा अशा विद्याशाखांसाठी दिली जाते. त्यात पीएच.डी. प्राप्त असलेल्या एकूण वीस उमेदवारांची निवड करण्यात येते. यंदा या फेलोशिपसाठी ७९ उमेदवारांनी अर्ज केला आहे. मात्र, सप्टेंबरमध्ये अर्ज प्रक्रिया सुरू केल्यानंतर विद्यापीठाकडून पुढील प्रक्रियाच राबवण्यात आलेली नाही.**



'पोस्ट डॉक्टरल फेलोशिप'ची उर्वरित प्रक्रिया येत्या काही दिवसांत पूर्ण करण्यात येईल. तसेच पात्र उमेदवारांची यादी जाहीर करण्यात येईल,

**— डॉ. पराग काळकर**
प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

» Selected

## शिवरायांसारखे आदर्श व्यक्ती राष्ट्र आणि समाजाचा पाया



**पुणे :** तब्बल ३५० वर्षांपूर्वी शेकडो वर्षाच्या गुलामगिरीत अडकलेला आपला देश, संस्कृती आणि समाजाला छत्रपती शिवाजी महाराज यांनी मुक्त केले. जिजाऊंनी शिवरायांसारखे आदर्श निर्माण केले. कोणत्याही एका धर्म आणि पंथांसाठी नाही तर मानवतेच्या कल्याणासाठी शिवरायांनी स्वराज्य निर्माण केले. शिवरायांसारखे आदर्श व्यक्ती हे राष्ट्र आणि समाजाचा पाया असतात. असे मत ज्येष्ठ इतिहास अभ्यासक पांडुरंग बलकवडे यांनी व्यक्त केले.

श्री शिवाजी मराठा सोसायटीच्या वतीने भव्य शिवजयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. शुक्रवार पेठेतील श्री शिवाजी मराठा सोसायटीच्या प्रांगणातून मिरवणूकीला प्रारंभ झाला. यावेळी तब्बल १००० पेक्षा अधिक विद्यार्थी पांरपारिक वेशात रॅलीमध्ये सहभागी झाले होते. यावेळी श्री शिवाजी मराठा सोसायटीचे उपाध्यक्ष राजेंद्र जगताप, मानद सचिव अण्णा थोरात, सहसचिव विकास गोगावले, खजिनदार जगदीश जेधे, नियामक मंडळ अध्यक्ष सत्येंद्र कांचन, कारभारी मंडळ अध्यक्ष सुरेश देसाई, कमल व्यवहारे उपस्थित होते. छत्रपती शिवराय असलेला रथ मिरवणूकीत होता यासोबतच नगारा, शिवगर्जना पथकाचे ढोल ताशा वादन आणि गंधर्व बँडचे वादन मिरवणूकीत झाले. श्री शिवाजी मराठा सोसायटीच्या सर्व शाखांचे विद्यार्थी आणि शिक्षक उत्सवात सहभागी झाले होते. यावेळी महिला सबलीकरण पर्यावरण जागृती, राष्ट्रीय एकात्मता, स्वच्छ भारत आदी संदेश विद्यार्थ्यांनी दिले.

## योगिता गोसावी शिवरकर यांचा शिवपूजन सोहळ्यात गौरव



**पुणे :** आम्ही पुणेकर या संस्थेचे अध्यक्ष हेमंत जाधव व संस्थेचे पदाधिकारी छत्रपती शिवाजी महाराजांची किर्ती जगभर पोहचवण्यासाठी शिवस्मारक निर्मितीच्या माध्यमातून शिवचरित्राचा जगभर प्रसार करण्याचे महान कार्य करत आहेत. जपानची राजधानी टोकियो येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक उभारण्यात येणार आहे. या भव्य स्मारकाचे पूजन व आरती सोहळा गणेश कला क्रिडा मंच येथे आयोजित करण्यात आला होता. या ऐतिहासिक सोहळ्यात शिवप्रेमी व्यक्तींचा गौरव करण्यात आला. यामध्ये वसुंधरा परिवार ग्रुपच्या संस्थापिका योगिता गोसावी यांचा शाल व छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिमा देऊन गौरव करण्यात आला.

## शिवराय हे लोकशाहीचे उद्गाते : घावटे

**निगडी :** "अठरापगड समाजाला एक करून लोकाभिमुख प्रशासनाचा आदर्श शिवरायांनी निर्माण केला. स्वत्व आणि स्वाभिमान यांची पेरणी करत छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेचे राज्य निर्माण केले. लोककल्याणकारी राज्य व्यवस्थेचा आदर्श निर्माण करणारे छत्रपती शिवाजी महाराज हे लोकशाही समाज व्यवस्थेचे उद्गाते ठरतात." असे प्रतिपादन जेष्ठ व्याख्याते राजेंद्र घावटे यांनी केले आहे. दुर्गा टेकडीवरील सर्वोच्च ठिकाणी असलेल्या सुप्रभात योग मंदिर या ठिकाणी आयोजित शिवजयंती कार्यक्रमात घावटे यांचे "युगप्रवर्तक छत्रपती शिवराय" या विषयावर व्याख्यान झाले. सुप्रभात मित्र मंडळ व सूर्यनमस्कार ग्रुप च्या वतीने शिवजयंतीच्या सूर्योदयाला कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

## समाजवादी पार्टी तर्फे महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास अभिवादन




**पुणे :** 'ना जातीचे ना पतीचे; छत्रपती शिवराय रयतेचे', छत्रपती शिवाजी महाराज की जय...आदी जय घोषणा देत रयतेचा राजा छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठा उत्साहात पुणे शहरात साजरी झाली. समाजवादी पार्टी पुणे शहराच्या वतीने ए.आय.एस.एस. एम.एस कॉलेज, शिवाजी नगर येथील अश्वारूढ छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी समाजवादी पक्षाचे पुणे शहराध्यक्ष जांबुवंत मनोहर, अनिस अहमद (प्रदेश सरचिटणीस), दत्ता पाकिरे (शहर सरचिटणीस), विनायक लांबे, (प्रदेश कार्यकारिणी सदस्य), अनिरुद्ध सुर्यवंशी ( शहर उपाध्यक्ष), शहाजहान झारी, (चिटणीस पुणे शहर), वसंतराव कोळी (अध्यक्ष: खडकवासला ), जावेद शेख (अध्यक्ष : छ.शि.म.मतदारसंघ), अशोक गायकवाड इब्राहिम यवतमाळवाले (शहर कार्यकारिणी), अतिक शेख (संघटक : छ.शि.म.न. मतदारसंघ) आदी उपस्थित होते.

# फुटपाथ अतिक्रमणाच्या विळख्यात

## ग्राहक आणि नागरिक हैराण

मागील काही वर्षांमध्ये शहराचा झपाट्याने विकास झालेला आहे. यानुसार महापालिकेच्या वतीने विविध प्रकारच्या सुखसुविधा देखील उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न झाला आहे. मात्र देण्यात आलेल्या अनेक प्रकारच्या सुविधांचा लाभ सामान्य नागरिकांना मिळताना दिसत नाही. याचाच एक भाग म्हणून शहरातील जवळपास सर्व भागातील पदपथावर सध्या अतिक्रमणाचा विळखा पडला आहे. त्यामुळे नागरिकांना पायी चालणे देखील कठीण झाले आहे.



ए आय निर्मित छायाचित्र

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी बाजारपेठेतील अतिक्रमणात दिवसेंदिवस वाढ होत आहे. दुकानासमोर वाहन पार्क करू नये म्हणून पूर्वी लोखंडी जाळ्या ठेवत असे. आता मात्र त्याची जागा सिमेंटच्या कट्ट्यांनी घेतली आहे. पदपथावरच नव्हे तर रस्त्यावर थेट फर्निचर विक्री केली जात आहे. मात्र महापालिकेचे अधिकारी या सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष करीत आहेत. त्यामुळे पिंपरी बाजारपेठेला लागलेले अतिक्रमणाचे ग्रहण कधी सुटणार, याकडे ग्राहक आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे.

पिंपरी बाजारपेठेत दिवसभरात हजारो ग्राहक येतात. येथील दुकानदारांना ग्राहक हवे असतात. मात्र त्यांची वाहने नको असतात. आपल्या दुकानासमोर वाहने पार्क करू नयेत म्हणून यापूर्वी दुकानदार आपल्या दुकानासमोर लोखंडी जाळ्या ठेवत असे. आजही काही दुकानासमोर लोखंडी जाळ्या दिसून येतात. मात्र महापालिकेचे अतिक्रमण विरोधी पथक या लोखंडी जाळ्या उचलून नेत असे. यावर दुकानदारांनी नामी शक्कल लढविली आहे. दुकानासमोर रस्त्यावर थेट सिमेंटचे कट्टे बसविले आहेत. जरी महापालिकेचे अतिक्रमण विरोधी पथक आले तरी ते सिमेंटचे कट्टे उचलून नेऊ शकत नाहीत. हे कट्टे काढण्यासाठी महापालिकेला थेट जेसीबी आणावा लागणार आहे.

- दुकानदारांनी थाटले पदपथावरच दुकान दुकानातील साहित्याचे फलक पदपथे आणि रस्त्यावरही उभारलले
- दुकानाजवळ असलेल्या महावितरणच्या डीपीचा फायदा घेत संपूर्ण पदपथावर शोरूममधील पुतळे आणून ठेवले आहेत.
- ग्राहकांना जीव मुठीत धरून रस्त्यावरून चालावे लागते.
- फेरीवाले, दुकानदार, टपरीधारक आणि काही नागरिकांनी फुटपाथवर अतिक्रमण वाढती चिंता
- पालिकेला फुटपाथची साधी देखभाल करण्यासाठी वेळ नाही.
- पालिकेच्या ढेपाळलेल्या कारभारामुळे शहरातील पादचाऱ्यांची गैरसोय होते.

" शगुन चौक ते साई चौक या दरम्यान नेहमीच वाहतूक कोंडी होते. तसेच या भागात नेहमीच वाहने पार्किंग केली जातात. यामुळे महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना साफसफाई करता येत नाही. जर महापालिका आणि वाहतूक पोलीस यांनी या रस्त्यावर समविषम पार्किंग केली तर साफसफाईचा प्रश्न सुटेल आणि वाहतूक कोंडीही होणार नाही."
— **विद्या परदेशी,** रहिवाशी

### भाजपा चित्रपट कामगार आघाडी

# पुणे शहर अध्यक्षपदी राजीव पाटील

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** खडकवासला : भाजपा चित्रपट कामगार आघाडीमध्ये पुणे पिंपरी चिंचवड शहरातील चित्रपट, कला, सांस्कृतिक क्षेत्रातील विविध पक्षातील पदाधिकारी, कलाकार, निर्माते,तंत्रज्ञ यांचा पक्ष प्रवेश आणि नियुक्ती पत्र प्रदान कार्यक्रम भाजपा पुणे शहर कार्यालय येथे पार पडला. या प्रसंगी राजीव दत्तात्रय पाटील यांची चित्रपट कामगार आघाडीच्या पुणे शहर अध्यक्ष पदी निवड करण्यात आली. तसेच प्रदेश उपाध्यक्ष केतन महामुनी यांची सरचिटणीस पदी पदोन्नती करण्यात आली.

राष्ट्रवादी काँग्रेस सांस्कृतिक सेलचे पुणे शहर कार्याध्यक्ष, चित्रपट निर्माते तसेच सामाजिक कार्यकर्ते राजीव पाटील यांच्यासह निर्माता शरद पाटील, सहाय्यक दिग्दर्शक रोशनी नागदेवते, कला दिग्दर्शक योगेश इंगळे, दिग्दर्शक नितीन भास्कर, अभिनेता करण दौंड, संकलक विनोद राजे, कार्यकारी निर्माते अमित शेरखाने, पिंपरी चिंचवड शहरातून दिग्दर्शक तसेच संभाजी ब्रिगेड चित्रपट विभागाचे रोहित नरसिंगे, ॲड.अमोल पाटील, अभिजित मोहिते, संदीप कांबळे, चंद्रकांत सुतार, संतोष मोहिते यांनी यावेळी भाजपा चित्रपट कामगार आघाडीमध्ये प्रवेश केला. चित्रपट आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष तसेच पश्चिम महाराष्ट्र प्रभारी केतन महामुनी यांच्या माध्यमातून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# रुग्ण हक्क परिषदेकडून शिव जयंती उत्साहात

### शिवाजीनगर शाखेच्या नामफलकाचे अनावरण



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** रयतेचे राजे, स्वराज्य संस्थापक, कुळवाडी भूषण छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९४ व्या जयंतीनिमित्त रुग्ण हक्क परिषद पुणे शहर कमिटीच्या वतीने परिषदेचे अध्यक्ष उमेश चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली अभिवादन सभा पार पडली. शिवाजीनगर येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अध्यक्ष उमेश चव्हाण यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौक या ठिकाणी झालेल्या अभिवादन सभेमध्ये मुख्य संयोजक इक्बाल शेख, दलित पँथर ऑफ इंडियाचे बापूसाहेब भोसले, सुनील शिरोळे, पुणे शहराध्यक्ष अपर्णा मारणे साठ्ये, प्रभा अवलेलू, शारदा लडकत, संतोष गायकवाड, अशोक बहिरट, अजय वीरकर, सत्यवान गायकवाड प्रमुख उपस्थित होते.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौक येथे रुग्ण हक्क परिषद पुणे शहर कमिटीच्या शिवाजीनगर शाखेच्या नामफलकाचे अनावरण करण्यात आले.

# प्रदक्षिणेसह भगवे ध्वज उंचावत पदयात्रा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**वाघोली :** वाडेबोल्हाई(ता.हवेली) येथे संत तुकाराम शिक्षण संस्थेच्या जोगेश्वरी माता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात भव्य शिवजयंत्ती सोहळा उत्साहात व जल्लोषात साजरा करण्यात आला.याप्रसंगी वाडेबोल्हाई गावाला वळसा घालीत बोल्हाई देवी मंदिराला वळसा घालून भगवे ध्वज हाती घेऊन वाद्याच्या गजरात पदयात्रा काढण्यात आली.

# विद्यार्थ्यांची पारंपारिक वेशभूषा लक्षवेधी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भोसरी :** राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली महाविद्यालयामध्ये शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले .याप्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व भोसरी विधानसभेचे प्रथम आमदार विलास लांडे, संस्थेचे सचिव सुधीर मुंगसे, खजिनदार अजितभ गव्हाणे, विश्वस्त विक्रांत लांडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के.जी. कानडे, उपप्राचार्य प्रा. किरण चौधरी, रजिस्ट्रार अश्विनी भोसले, एमबीएचे डायरेक्टर डॉ. धनंजय बागुल, प्राचार्य डॉ. लक्ष्मण चौधरी, डॉ .श्रेया दाणी, डॉ. नेहा बोरसे, प्रा. सारिका जगताप, प्रा. गोपीचंद करंडे, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

अभिवादन

राजमाता जिजाऊ महाविद्यालयापासून ते लांडेवाडी शिवाजी पुतळ्यापर्यंत भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते . त्यामध्ये विविध पारंपारिक वेशभूषेमध्ये विद्यार्थी व प्राध्यापक सहभागी झाले होते .

## शिवजयंती

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



# घोड व चासकमान दोन्ही नवं प्रकल्पांचा लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना फायदा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाघोली :** घोड आणि चासकमान या दोन्ही प्रकल्पांच्या सुधारणा व देखभाल कार्यात गती येणार असून,लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना अधिकाधिक फायदा मिळणारं असल्याचे आमदार ज्ञानेश्वर कटके यांनी सांगीतले.यावेळी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. कालव्यांची दुरुस्ती करावी घोड प्रकल्पाच्या कालव्यांची सध्या दुरवस्था झाल्याने त्याच्या दुरुस्तीची गरज असल्याचे आमदारांनी नमूद केले.त्यासाठी आम्ही प्रयत्नशील असल्याचे आमदार कटके यांनी माहिती देताना सांगितले.

### १४ वर्षांनंतर सुप्रमा मंजूर

- चासकमान प्रकल्पाच्या अस्तरीकरणाच्या कामासाठी १४ वर्षांनंतर सुप्रमा मंजूर करण्यात आली आहे.०-७२ ते ७२-१४६ किमी अस्तरीकरण मंजुरी प्रक्रियेत, एप्रिल महिन्याच्या शेवटपर्यंत ०-७२ ते ७२-१४६ किमी अस्तरीकरण कामास मंजुरी मिळणार आहे. के.डी.ब्रँच कालव्याच्या अस्तरीकरणाचे काम मंजूर झाले असून, निविदा प्रक्रिया तातडीने सुरू होईल. शासनाने घेतलेल्या जमिनींच्या मोबदल्यासाठी भूभाडे देण्याची मंजुरी प्रक्रिया सुरू आहे. कालव्यातील गळती रोखण्यासाठी अस्तरीकरण व स्ट्रक्चरल कामांना प्राधान्याने सुरुवात केली जाईल. पुढील आवर्तन टेल टू हेड पद्धतीने चालवण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, त्यासाठी आवश्यक प्रशासकीय यंत्रणा आणि साधनसामग्री पुरवली जाणार आहे.

घोड व चासकमान प्रकल्पांच्या सुधारणा,देखभाल व दुरुस्तीविषयी आमदार ज्ञानेश्वर कटके यांनी कार्यकारी संचालक अतुल कपोले यांच्यात बैठक संपन्न झाली.

बैठकीतील महत्व घोड प्रकल्पाच्या सुधारणा बाबत अनेक विषयांवर चर्चा झाली.धरणातील गाळ हटवण्याची मागणी आमदार कटके यांनी केली. घोड प्रकल्प १९६० साली पूर्ण झाल्याने आता त्याला ६० वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. गाळ सर्वेक्षण अहवालानुसार धरणात सुमारे १ टीएमसी गाळ साठलेला आहे. त्यामुळे धरणाची पाणी साठवण्याची क्षमता वाढवण्यासाठी हा गाळ काढण्याची मागणी आमदारानी केली. शासन स्तरावर याबाबत धोरणात्मक निर्णय घेतला जाणार असल्याचे कार्यकारी संचालकांनी सांगितले.



- १) डिंभे धरणाचा उजवा कालवा ११३ किमी लांबीचा असून,त्यातील शेवटच्या १२-१३ किमी लांबीत अस्तरीकरण नाही.
- २) या कालव्याच्या शेवटच्या भागाच्या काँक्रीट अस्तरीकरणासाठी शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला
- ३) लवकरच त्यास मंजुरी मिळेल.
- ४) अनधिकृत पाणी उपसा व कालवा फोडनाऱ्यावर कारवाईची मागणी
- ५) घोड व डिंभे उजव्या कालव्यांच्या आवर्तना दरम्यान होणारा अनधिकृत पाणी उपसा तसेच कालवा फोडण्याच्या घटनांवर कठोर कारवाई करावी.

यावर महाराष्ट्र सिंचन सुधार प्रकल्पांतर्गत ७६ कोटी रुपये मंजूर झाले असून,काही महिन्यांतच कालव्यांच्या दुरुस्तीचे काम सुरू होणार असल्याचे कार्यकारी संचालकांनी सांगितले.घोड नदीवरील कोल्हापुर पद्धतीच्या बंधाऱ्यांची गळती दुरुस्ती करा अशासूचना आमदारांनी केल्या. आवश्यक लोखंडी बर्गे देण्यात येतील आणि दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्याचे कार्यकारी संचालकांनी सांगितले.कालव्यातील गाळ काढून पाणी वाहतुकीची क्षमता वाढविण्याची सूचना केल्यानंतर यांत्रिकी विभागाच्या यंत्र सामग्रीद्वारे हे काम हाती घेतले जाईल, असे कार्यकारी संचालकांनी सांगितले.

संपादकीय विशेष

# नियोजनशून्यतेचे बळी

नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर शनिवारी रात्री चेंगराचेंगरी झाली. प्रयागराजच्या महाकुंभला जाण्यासाठी प्लॅटफॉर्म क्रमांक १३ आणि १४ वर गर्दी इतकी वाढली, की चेंगराचेंगरीत गुदमरून १८ जणांचा मृत्यू झाला. हे सरकारी आकडे आहेत. प्रयागराजला जाणाऱ्या ट्रेनचा शेवटच्या क्षणी बदललेला प्लॅटफॉर्म आणि गर्दीचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी पोलिस किंवा वरिष्ठ अधिकारी उपस्थित नसणे हे या अपघातामागील प्रमुख कारण आहे. सुटीच्या दिवशी कुंभाच्या शेवटच्या टप्प्यात आंघोळीसाठी जाणाऱ्यांची गर्दी वाढत राहिली आणि शेवटी झालेल्या गोंधळामुळे हा भीषण अपघात झाला. प्रथमदर्शनी रेल्वे मंत्रालयाची अकार्यक्षमता, असंवेदनशीलता, गर्दीचा न आलेला अंदाज आणि प्रचंड गर्दी उसळली असताना अचानक दोन ट्रेन रद्द करणे आणि अचानक जादा गाडीचा प्लॅटफॉर्म बदलल्यामुळे हा अपघात झाला. त्याहून चीड आणणारी बाब म्हणजे रेल्वेच्या जनसंपर्काधिकाऱ्याची असंवेदनशीलता. या अपघाताला रेल्वे जबाबदार नाही आणि चेंगराचेंगरी झाली नाही, असे सांगत त्यांनी हात वर केले. वास्तविक मुंगी शिरायलाही जागा नाही, एवढी गर्दी फलाटांवर झाली असताना रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी तिथे नसणे, रेल्वे पोलिसांची कमी उपलब्धता आणि आपत्ती निवारण दलाची व्यवस्था न करणे याबरोबरच इतक्या गर्दीच्या काळात अवघ्या एका रुग्णवाहिकेची व्यवस्था यात रेल्वेला आपले काही चुकले आहे, असे वाटत नसेल, तर तिला जबाबदारीची जाणीव नाही, असे म्हणावे लागेल. आता रेल्वेमंत्री इतके कोडगे झाले आहेत, की त्यांचा राजीनामा मागूनही उपयोग नाही. 'रेवडी संस्कृती'वर १७ लाख कोटी रुपयांची उधळण करणारे सरकार रेल्वेसाठी दोन लाख ५५ हजार कोटी रुपये दिल्याची टिमकी वाजवते. त्यात पगारासाठी किती आणि पायाभूत सुविधांसाठी किती याचा विचारच करीत नाही. प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, स्थानकावर पुरेशा संख्येने पोलिस किंवा रेल्वे अधिकारी उपस्थित नव्हते, तर वीकेंड आणि कुंभाचा शेवटचा टप्पा पाहता शुक्रवारी संध्याकाळपासून स्थानकावर गर्दी वाढत होती. बिहारींचेही दरवर्षी छठपूजेच्या निमित्ताने अशाच प्रकारच्या अपघातांना बळी जात आहेत. त्याची आपल्याला इतकी सवय झाली आहे की आपण त्याकडे लक्षही देत नाही. रेल्वेच्या पायाभूत सुविधांचा आणि सुरक्षांचा एरव्ही एवढा डांगोरा पिटला जात असताना रेल्वेचे अपघात आणि त्यातील मृत्यू थांबत नाहीत. सरकारने रेल्वेचे सुशोभीकरण, 'वंदे भारत' सारख्या गाड्या चालवणे, बुलेट भारतात आणणे, रेल्वेचे विद्युतीकरण, ट्रॅकचे दुहेरीकरण, नवीन गाड्या सुरू करणे इत्यादी कितीही काम केले असले, तरी रेल्वेच्या सुरक्षेबाबत कमीत कमी काम केले आहे.

दिल्ली स्टेशनवरील अपघाताला रेल्वे मंत्रालय आणि धर्माला राजकीय हत्यार बनवण्याची मानसिकता जबाबदार आहे. दोनच दिवसांपूर्वी 'स्वतंत्र सेनानी एक्स्प्रेस'ची ज्या प्रकारे तोडफोड झाली (तेही प्रयागच्या गर्दीमुळेच असे बोलले जात आहे), जामा मशीद मेट्रो स्टेशनवर एका विशिष्ट समाजाच्या लोकांनी ज्या प्रकारे अराजक माजवले, ती सुरक्षेच्या दृष्टिकोनातून मोठी घटना होती. या सर्व प्रकाराची दखल घ्यायला हवी. रेल्वेमंत्र्यांनी प्रथमतः ज्या अधिकाऱ्यांनी शेवटच्या क्षणी रेल्वे फलाट बदलला त्यांच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता आहे. सरकारच धार्मिक संवेदना वाढवत असताना आणि त्याचे मार्केटिंग करीत असताना भाविकांच्या सुविधांकडे मात्र दुर्लक्ष करते. अन्य ठिकाणच्या घटनांचा बोध घेऊन किमान पुढे अशा घटना होणार नाहीत, हे पाहायला हवे; परंतु तसे होत नाही. अपघात, चेंगराचेंगरीच्या घटनांचे अहवाल येतात आणि त्यावरील शिफारशी धूळखात पडतात. तसे नसते, तर घाटकोपरनंतर रेल्वेस्टेशनवरच्या चेंगराचेंगरीच्या घटना झाल्याच नसत्या. दिल्लीच्या अपघाताला एकच नाही. तर अनेक आयाम आहेत. काही लोक दिल्लीतील दुर्घटनेसाठी प्रयागराजमध्ये होणारा कुंभ आणि उत्तर प्रदेश प्रशासनाला जबाबदार धरत आहेत. रेल्वे मंत्रालयाने गर्दीचा अंदाज घेऊन अतिरिक्त दहा-बारा गाड्या चालवल्या नाहीत हे समजण्यासारखे आहे; पण या अपघाताशी कुंभाच्या व्यवस्थेचा संबंध जोडणे कितपत न्याय्य आहे? १९९८-९९ पर्यंत दिल्लीहून दरभंगापर्यंत थेट ट्रेन नव्हती. पाटण्यापर्यंत फक्त दोन-तीन ट्रेन होत्या, तरीही तिकीट १५ दिवस आधीच मिळू शकत होते. आता दरभंग्याहून थेट दिल्लीला किमान तीन गाड्या धावतात, त्याशिवाय दरभंगातून जाणाऱ्या, समस्तीपूर-मुझफ्फरपूर, पाटणाहून दिल्लीला येणाऱ्या गाड्या जोडल्या तर प्रकरण डझनभर पोहोचते, तरीही आता दोन महिने आधीही तिकीट मिळू शकत नाही. ही स्थिती देशभराची आहे. याचा अर्थ लोकसंख्या आणि रेल्वेच्या वाढलेल्या प्रवाशांची संख्या विचारात घेऊन तेवढ्या गाड्यांचे नियोजन अजून करता आलेले नाही. गाड्यांची संख्या वाढवायला मर्यादा असल्याचे सांगितले जाते. त्यावर मग काहीच उपाय नाही का, असा प्रश्न निर्माण होतो. साधे मुंबई-पुण्याचे उदाहरण घेतले, तर शंभर वर्षांत एकही ट्रॅक वाढवता आलेला नाही. लोकांची क्रयशक्ती वाढल्याने लोक आता सहलीसारखे धार्मिक पर्यटन साजरे करत आहेत. सध्या प्रयागराजच्या मार्गावर असलेल्या लाखो गाड्यांमुळे प्रचंड ट्रॅफिक जाम होत आहे, हे प्रयागराजच्या लोकांना कसे समजावून सांगणार? याचे एकच स्पष्टीकरण आहे, की भारतात हिंदू मध्यमवर्ग वाढला आहे, सुविधा वाढल्या आहेत आणि लोक आता त्यांच्या धार्मिक स्थळांकडे वळू लागले आहेत.

भारतीय मानसिकतेची अराजकताही याला कारणीभूत आहे. एक्स्प्रेस गाडीवर झालेली दगडफेक काय दाखवते, जामा मशीद मेट्रो स्थानकावरची अराजकता काय दाखवते, नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर भिंत पाडून जबरदस्तीने केलेला प्रवेश काय दाखवतो, याची उत्तरे आपल्या झुंडशाहीच्या मानसिकतेत आहे. एकाच दिवशी धार्मिक स्थळी जाण्याचा अट्टहास कशासाठी याचे उत्तर पुन्हा आपल्या धर्ममार्तंडांनी ठराविक दिवसाला दिलेल्या महत्त्वात आहे. याशिवाय आणखी एक मोठी गोष्ट आहे ज्याचा आपण सर्वांनी विचार केला पाहिजे. कुंभला आपण गेलो नाही, तर समाज काय म्हणेल, आपण मागे राहू, ही मानसिकताही या चेंगराचेंगरी आणि मृत्यूला कारणीभूत आहे. कोणत्याही धार्मिक तीर्थक्षेत्रावर अशा प्रकारची चेंगराचेंगरी होणे नित्याचेच झाले आहे. कधी आंध्रात, कधी महाराष्ट्रात, कधी बिहार तर कधी गुजरातमध्ये अशा चेंगराचेंगरी होतात? आमची तीर्थक्षेत्रे पूर्वी आमच्या आवाक्याबाहेर होती, ती दुर्गम होती. पूर्वीची पिढी सांगते, की त्यांच्या गावातून कोणी तीर्थयात्रेला गेले, तर संपूर्ण गाव त्याला आलिंगन देत असे. पुन्हा भेटू की नाही, असा त्याचा अर्थ असे. आता चार धामचा प्रवास असो की कुंभचा; तंत्रज्ञान आणि विज्ञानाने आपला प्रवास सुकर केला आहे. त्याचबरोबर आपल्यातील अराजकता वाढवली आहे.

# तापमानवाढीचा शिक्षणालाही फटका

**हवामानबदलामुळे केवळ वातावरणच बदलत नाही, तर शिक्षणावरही गंभीर परिणाम होत आहे. 'युनिसेफ'च्या ताज्या अहवालानुसार २०२४ मध्ये अत्यंत प्रतिकूल हवामानामुळे ८५ देशांमधील २४२ दशलक्ष मुलांचे शिक्षण विस्कळीत झाले. याचा अर्थ जगभरातील दर सातपैकी एका विद्यार्थ्याच्या शिक्षणावर तापमानवाढीचा परिणाम झाला. हवामानबदलाच्या या अनपेक्षित परिणामाचा खास मागोवा.**

पर्यावरण रा

मिलिंद बेंडाळे

पर्यावरण अभ्यासक



ग्लोबल वॉर्मिंग'ने आपले दार ठोठावले आहे, ही वस्तुस्थिती कोणापासूनही लपलेली नाही. विक्रमी उष्णतेमुळे जनजीवन विस्कळीत होत असतानाच शेतीवरही नवे संकट उभे ठाकले आहे; विशेषतः भारतासारख्या देशात, जिथे बहुतांश शेती मॉन्सूनच्या पावसावर अवलंबून आहे. सर्वात मोठे संकट आपल्या कृषी क्षेत्रापुढे उभे ठाकले आहे, जिथे घटत्या उत्पादकतेमुळे आपली अन्नसुरक्षा धोक्यात आली आहे; मात्र आता 'नेचर क्लायमेट चेंज' या नियतकालिकात प्रसिद्ध झालेला अहवाल धक्कादायक असून त्यात भारतातील सुमारे साडेपाच कोटी मुलांचे शिक्षण उष्णतेच्या लाटेमुळे विस्कळीत झाल्याचे समोर आले आहे. हे संकट जगभर असले, तरी दक्षिण आशियातील इतर देशांच्या तुलनेत जगात सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या भारतात त्याचा परिणाम अधिक दिसून आला आहे. 2024 मध्ये उष्णतेच्या लाटेमुळे भारतातील शिक्षण व्यवस्थेवर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम झाला. हा धक्कादायक गौप्यस्फोट 'युनायटेड नेशन्स चिल्ड्रेन्स फंड (युनिसेफ)'च्या 'लर्निंग इंटरप्टेड: ग्लोबल स्नॅपशॉट ऑफ क्लायमेट-रिलेटेड स्कूल डिसरप्शन इन 2024' या अहवालात करण्यात आला आहे. उल्लेखनीय आहे की आजपर्यंत 'ग्लोबल वॉर्मिंग'चा शेतीवर आणि हवामानाच्या चक्रावरील परिणामांबाबत अभ्यासाचे निष्कर्ष बाहेर आले आहेत; परंतु मुलांसाठी असा कोणताही संवेदनशील अभ्यास समोर आला नव्हता. या अहवालाने एकीकडे पालकांची चिंता वाढवली, तर दुसरीकडे हवामानबदलाचा मुलांवर आणि शिक्षणावर होणारा परिणाम कमी करण्यासाठी लवकरात लवकर प्रभावी धोरणे आखण्यासाठी सरकारवर दबाव आणला.

निःसंशयपणे, हा अभ्यास देशाच्या धोरणकर्त्यांना इशारा देतो की हवामान बदलाच्या परिणामांपासून मुलांचे संरक्षण करण्यासाठी केवळ शिक्षणच नव्हे, तर आरोग्य इत्यादीसारख्या इतर क्षेत्रांमध्येही मोठ्या प्रमाणावर काम करण्याची गरज आहे. शिक्षणतज्ज्ञांसोबतच वैद्यकीय क्षेत्रातील लोकांनीही या ज्वलंत मुद्द्यावर विचारमंथन करणे आवश्यक आहे. कारण २०५० पर्यंत मुलांवर उष्णतेच्या लाटांचा प्रभाव आठपटीने वाढेल, असा या अभ्यासाचा अंदाज आहे. गेले वर्ष शतकाहून अधिक काळातील सर्वात उष्ण वर्ष म्हणून घोषित करण्यात आले आहे. २०२४ हे वर्ष १९०१ नंतरचे सर्वात उष्ण वर्ष ठरले असल्याची माहिती हवामान खात्यानेही दिली होती. देशातील तसेच जगातील हरितगृह वायूंवर नियंत्रण ठेवण्यासाठी लवकरच जागतिक सहमती झाली नाही, तर येत्या काही वर्षांमध्ये तापमानात आणखी वाढ होऊ शकते. त्याचा मुलांच्या शिक्षणावरच नव्हे, तर आरोग्यावरही विपरीत परिणाम होईल.

जागतिक तापमानवाढीच्या संकटामुळे मुलांच्या शिक्षणात व्यत्यय आल्यास त्यांच्या भविष्यावर घातक परिणाम होईल, असा इशारा संयुक्त राष्ट्रांच्या बाल निधीने दिला आहे. उष्णतेच्या लाटेत लहान मुलांना शाळेत जाणे शक्य होत नाही. पालकही अभ्यासापेक्षा आरोग्याला प्राधान्य देतात. अशा परिस्थितीत शाळेच्या वेळेत बदल करून आणि वाढत्या उष्णतेशी संबंधित खबरदारीबद्दल जागरूकता वाढवून या संकटाचा मुकाबला करता येईल. याशिवाय, तापमानवाढीच्या आपल्या जीवनावर होणाऱ्या परिणामांचे मूल्यमापन करण्यासाठी देशात व्यापक अभ्यास आणि संशोधन करण्याची गरज भासू लागली आहे. वेळीच पावले न उचलल्यास दीर्घकालीन होऊ शकतात. 'युनिसेफ'ने उद्धृत केलेला अभ्यास हा ओस्लो विद्यापीठातील संशोधकांचा निष्कर्ष आहे. भारतीय विद्यापीठे आणि संशोधन संस्थांनीही असा प्रयत्न केला पाहिजे; जेणेकरून, स्थानिक अभ्यासामुळे भारतीय परिस्थितीनुसार अधिक प्रामाणिक निष्कर्ष पुढे येऊ शकतील. ओस्लो विद्यापीठाच्या अभ्यासातील उल्लेखनीय तथ्य म्हणजे भारत जागतिक तापमानवाढीच्या परिणामांबाबत अधिक संवेदनशील असल्याचे म्हटले आहे. गेल्या वर्षी तापमानवाढीच्या परिणामांमुळे जगभरातील २४ कोटी मुलांचे शिक्षण विस्कळीत झाले आहे. हवामानातील व्यत्ययामुळे मोठ्या संख्येने मुले शाळेत जाऊ शकली नाहीत. परीक्षेच्या निकालांच्या परिणामामुळे मुलांच्या भविष्यावर दीर्घकालीन प्रतिकूल परिणाम होऊ शकतो.

गेल्या वर्षी उष्णतेच्या लाटेमुळे शिक्षणात सर्वात मोठा अडथळा निर्माण झाल्याचे अहवालात म्हटले आहे. याचा १७.१ कोटी मुलांच्या शिक्षणावर परिणाम झाला. 'युनिसेफ'च्या कार्यकारी संचालक कॅथरीन रसेल म्हणतात, 'मुलांना उष्णतेचा जास्त त्रास होतो. त्यांचे शरीर लवकर गरम होते. त्यांना कमी घाम येतो आणि शरीर थंड होण्यास जास्त वेळ लागतो. मुले वर्गात लक्ष केंद्रित करू शकत नाहीत. तिथे थंड वातावरण नाही. वाटेत पूर आला किंवा शाळा उद्ध्वस्त झाली तर मुले शाळेत जाऊ शकत नाहीत.' एप्रिल महिन्यात भारत, बांगलादेश आणि फिलीपिन्स सारख्या देशातील ११.८ कोटी मुलांचे शिक्षण प्रचंड उष्णतेमुळे प्रभावित झाले होते. फिलीपिन्समध्ये वातानुकूलित नसलेल्या हजारो शाळा बंद कराव्या लागल्या. दक्षिण आशियातील हवामानामुळे १२८ दशलक्ष मुलांवर परिणाम झाल्याने शिक्षण सर्वाधिक विस्कळीत झाले. भारतात उष्णतेमुळे ५.४ कोटी मुलांच्या शिक्षणावर परिणाम झाला, तर बांगलादेशमध्ये ३.५ कोटी मुलांच्या शिक्षणावर परिणाम झाला. २०२२ मध्ये पाकिस्तानमध्ये आलेल्या भयावह पुरानंतर कोट्यवधी मुलांवर शिक्षणाचे संकट आले होते. गेल्या सप्टेंबरमध्ये 'यागी'सारख्या चक्रीवादळामुळे पूर्व आशिया आणि पॅसिफिक प्रदेशात मोठ्या प्रमाणावर विद्ध्वंस झाला. १८ देशांमध्ये वर्ग पुढे ढकलावे लागले. तज्ज्ञांच्या मते, पूर ही एक सामान्य हवामान आपत्ती बनली आहे. यामुळे मुलांना शाळेत जाण्यापासून रोखले जाते. ओस्लो विद्यापीठातील मानसशास्त्रातील पोस्ट डॉक्टरल फेलो डॉ. कॅटलिन एम. प्रेंटिस आणि त्यांच्या सहलेखकांनी यावर तपशीलवार संशोधन केले आहे.

'नेचर क्लायमेट चेंज' या जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या या संशोधनानुसार पुरामुळे मुलांना शाळेत जाण्यात अडथळा येतो, शाळेच्या इमारती आणि साहित्याचे नुकसान होते. अभ्यास आणि परीक्षांच्या निकालावर त्याचा परिणाम होतो. तापमानवाढीमुळे आधीच उपेक्षित समुदायांवर अधिक परिणाम होतो. डॉ. प्रेंटिस आणि त्यांच्या सहकाऱ्यांना संशोधनात आढळून आले की असुरक्षित समुदायांना हवामान संकटाचा सर्वाधिक त्रास होतो. अमेरिकेत, कमी उत्पन्न असलेल्या जिल्ह्यांमधील आणि अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या निकालांवर उष्णतेचा वाईट परिणाम झाला. फिलीपिन्समध्ये आलेल्या सुपर टायफूननंतर, श्रीमंत मुलांपेक्षा गरीब कुटुंबातील मुलांनी शाळा सोडण्याचे प्रमाण जादा होते. मुलींच्या शिक्षणावरही या संकटाचा खोलवर परिणाम झाला आहे. मुलींच्या शिक्षणाला आधीच कमी प्राधान्य मिळते. त्यामुळे अनेक ठिकाणी हवामानाच्या संकटामुळे त्यांचे शिक्षण आणखी विस्कळीत झाले आहे. 'युनिसेफ'च्या आकडेवारीनुसार, जगातील दोन तृतीयांश मुले दहा वर्षांच्या वयापर्यंत एकत्र अभ्यास करू शकत नाहीत. हवामानाच्या आपत्तींमुळे हे शैक्षणिक संकट आणखी वाढले आहे. हवामान आपत्तींचा मुलांच्या शिक्षणावर दीर्घकालीन परिणाम होतो. उष्णतेचा प्रभाव केवळ शाळेच्या दिवसांपुरता मर्यादित नाही.

संशोधनात असेही आढळून आले की जास्त प्रमाणात गरम दिवस अनुभवावे लागल्याने चाचणी परिक्षांचे निकाल खराब होतात. आश्चर्याची बाब म्हणजे वातावरणीय आपत्तीमुळे गर्भधारणेदरम्यानही मुलांवर परिणाम होतो. उदाहरणार्थ, सँडी या चक्रीवादळाच्या संपर्कात आलेल्या गरोदर महिलांना 'एडीएचडी' हा विकार जडण्याची शक्यता जास्त होती. युनिसेफ आणि तज्ज्ञांनी हवामानबदलाच्या परिणामांपासून शिक्षण व्यवस्थेचे रक्षण करण्याचे आवाहन केले आहे. 'शिक्षण ही सर्वात जास्त प्रभावित झालेल्या सेवांपैकी एक आहे; परंतु धोरणात्मक चर्चांमध्ये त्याकडे दुर्लक्ष केले जाते. मुलांचे भविष्य सर्व हवामान नियोजन आणि कृतीच्या केंद्रस्थानी असणे आवश्यक आहे. डॉ. प्रेंटिस आणि त्यांच्या टीमने त्यासाठी उपाय सुचवले आहेत. शाळांमध्ये थंड हवेची व्यवस्था, पूररोधक संरचना आणि आपत्ती व्यवस्थापन योजना लागू केल्या पाहिजेत. याशिवाय सामाजिक आणि आर्थिक विषमताही दूर करावी लागेल. हरितगृह वायू उत्सर्जन कमी करून 'ग्लोबल वार्मिंग' थांबवणे आज सर्वात महत्त्वाचे आहे. शिक्षण केवळ हवामान बदलाशी लढा देण्यास मदत करत नाही, तर मुलांना संकटांचा सामना करण्यास सक्षम बनवते, असे संशोधकांनी म्हटले आहे.

खेचाखेची

## अर्थ कळला...

शेजारीपाजारी याचा खरा अर्थ
आता समजला...
.
.
.
अडीनडीत असताना
डाळ-तांदूळ, तेल आदी
साहित्य देणारे ते शेजारी.
आणि...
.
अडीनडीच्या वेळी वाइन आदी
देणारे ते पाजारी...!

वेगळे काही


चीनने जगतल्या सर्वात उंच पुलाची निर्मिती केलीये. या पुलाची लांबी ५६५ मीटर आहे. नीझू नदीवर हा पूल बांधण्यात आलाय. हा पूल युनान आणि गुईझू या चीनच्या दक्षिण-पश्चिम प्रांतांना जोडतो. हा चीनमधला डोंगराळ भाग असून येथे हा पूल बांधण्यासाठी १० अब्ज रूपये खर्च केले आहेत. जमिनीच्या पृष्ठभागापासून पूल २०० मजले उंच असलेल्या इमारतीच्या उंची एवढा आहे. याआधी चीनमधलाच सी डू रिव्हर हा पूल सर्वात उंच मानला जात असे. त्याची जागा या नव्या पुलाने घेतली आहे. बेनपानजियांग असं या पुलाचं नाव आहे. जगभरातल्या उंच पुलांची यादी केली तर चीनमधल्या अनेक पुलांचा यात प्रामुख्याने समावेश होईल.

जाणून घ्या

## व्हा व्यावसायिकांचे सल्लागार

मैत्रिणींनो, आजकाल कारकिर्दीचे विविध पर्याय उपलब्ध झाले आहेत. त्यामुळे निवडीला वाव मिळत असून घरच्या जबाबदाऱ्या सांभाळत उत्तम कारकिर्दीचं स्वप्न पूर्ण करणं शक्य होत आहे. त्यादृष्टीने 'प्रोफेशनल व्हर्च्युअल कन्सल्टींग' अर्थात 'पीव्हीसी'चा पर्याय विचारात घ्यायला हवा. काही कारणांमुळे पूर्णवेळ नोकरी पत्करू न शकणाऱ्या व्यावसायिक आणि अनुभवी महिला पीव्हीसीची निवड करू शकतात. यात फोन किंवा स्काईपच्या माध्यमातून कंपन्या किंवा संबंधित क्षेत्रातल्या नवख्या व्यावसायिकांचे सल्लागार म्हणून काम करायचं असतं. समुपदेशन, ठराविक विषयांचे प्रशिक्षक, कायदा, अर्थ, मालमत्ता आदी क्षेत्रातल्या तज्ज्ञ महिलांना इथं संधी आहेत. या क्षेत्रात प्रगती करण्यासाठी सोशल मीडियावर अस्तित्त्व निर्माण करा. लोकांपर्यंत पोहोचा, तुमच्या कामाला सुरूवात करा. सुरूवातीच्या टप्प्यात जाहिरात करण्याचा पर्याय निवडू शकता. नंतर 'माउथ पब्लिसिटी'च्या बळावर पुढे जायचं असतं. शैक्षणिक समुपदेशकांनी शाळा, महाविद्यालयं, शैक्षणिक संस्था, पालक संघटना यांच्याशी संपर्क साधावा. आर्थिक सल्लागारांनी काही ब्लॉग्जवर जाहिराती करायला हरकत नाही. यात विविध माध्यमांची निवड करून लोकांपर्यंत पोहोचता येतं.






राशीभविष्य

- मेष : नव्या कामाबाबत उत्साह राहील. व्यवसायात चांगली उलाढाल होईल. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल.
- वृषभ : उगाच विचार करत बसू नका. आलेल्या अडचणींना सामोरं जा. मुलांच्या कल्पकतेला वाव मिळेल.
- मिथुन : कौटुंबिक वाद-विवाद संभवतात. नोकरीत कामाचा ताण राहील. यांत्रिक क्षेत्रात संधी लाभतील.
- कर्क : उत्पन्नाचे नवे पर्याय समोर येतील. उपजत कला-गुणांचा विकास होईल. स्वमताग्रह टाळायला हवा.
- सिंह : सरकारी कामं विलंबानं होतील. नव्या ओळखींचा लाभ घ्यावा. अनुभवींचा सल्ला कामी येऊ शकेल.
- कन्या : वैद्यकीय कारणांसाठी खर्च होईल. महत्त्वाचे करार लांबणीवर पडतील. स्पर्धांमध्ये यश प्राप्त होईल.
- तूळ : नववर्षाच्या संकल्पांची आखणी होईल. विवाहाचे प्रश्न मार्गी लागतील. जुन्या ओळखींचा लाभ घ्या.
- वृश्चिक : आर्थिक प्रश्नांबाबत समाधान लाभेल. डोळ्यांच्या विकाराबाबत काळजी घ्या. विचाराने रहावं.
- धनु : कौटुंबिक प्रश्नांचा ताण राहील. घर दुरूस्तीवर खर्च करावा लागेल. अपेक्षित प्राप्तीत अडचणी येतील.
- मकर : सुवार्ता कानी येईल. चैनीवर अधिक खर्च होईल. स्थापत्य, कला क्षेत्रात संधींचा लाभ घ्यावा.
- कुंभ : उत्साहवर्धक घटना घडतील. नोकरीत कामाचं योग्य मोल होईल. जबाबदाऱ्यांमध्ये वाढ होत जाईल.
- मीन : कार्य विस्ताराला चालना मिळेल. गेलेल्या संधी पुन्हा लाभणार आहेत. मानसिक स्वास्थ लाभेल.

सल्ला मोलाचा

## धोका ओळखायला हवा

सौंदर्यवृद्धीसाठी प्रसाधने वापरली जात असली तरी अतिवापरामुळे काही धोकेही उद्भवतात. म्हणूनच याविषयीची जाण असणे गरजेचे ठरते. जसे की, काजळामुळे त्वचेचं नुकसान होऊ शकतं. डोळे खराब होऊ शकतात. डोळे येण्यापासून ॲलर्जीपर्यंत बऱ्याच समस्या निर्माण होतात. त्यामुळे केमिकलविरहित काजळ वापरा.

✻ लाल किंवा काळा असे गडद रंग बराच काळपर्यंत ठेवले तर नखं खराब होऊ लागतात, पिवळी पडतात. नेल पॉलिशमधल्या ॲसिटोनमुळे नखं कमकुवत होतात आणि तुटू लागतात. ✻ टाल्कम पावडरमध्ये सिलिकॅट्स नावाचा विषारी घटक असतो. पावडर कितीही सुगंधी वाटत असली तरी या विषारी घटकामुळे त्वचा खराब होऊ शकते. या घटकामुळे फुफ्फुसाचे विकार जडू शकतात. त्यामुळे पावडर विकत घेताना त्यात हा घटक नाही ना याची खात्री करून घ्या. ✻ ब्लीच क्रीम वापरत असाल तर सावध व्हा. यामुळे त्वचा लाल होणं, पुरळ उठणं, जळजळणं अशा समस्या निर्माण होऊ शकतात. शक्यतो ब्लीचचा वापर टाळा.

दिनविशेष

## २० फेब्रुवारी

१९५० : सुभाषचंद्र बोस यांचे थोरले बंधू, संयुक्त समाजवादी संघटनेचे अध्यक्ष शरदचंद्र बोस यांचं निधन.
२०१३ : कामगार संघटनांच्या देशव्यापी संपाला उत्तम प्रतिसाद.
२०१४ : स्वतंत्र भारतात तेलंगण हे नवे २९ वे राज्य जन्माला घालणारे आंध्र प्रदेश पुनर्रचना विधेयक-२०१४ राज्यसभेत मंजूर.
२०१८ : अनियंत्रित आणि अनियमित स्वरुपाच्या बचत योजनांना बंदी घालणाऱ्या विधेयकाला केंद्रीय मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

महत्त्वपूर्ण काही...

## रोचक आणि रंजक

✻ आपली पृथ्वी खूप विशाल आहे. या पृथ्वीवर अनेक संस्कृती नांदतात. जगातील प्रत्येक देश कोणता ना कोणता देव मानतो. ग्रहांनाही देवतास्वरुप मानण्याची अनेकांची संस्कृती असते. वेगवेगळ्या देशांमध्ये ग्रहांना वेगवेगळी नावं असतात आणि त्याच नावाच्या देवताही असतात. मात्र पृथ्वी असा एकच ग्रह आहे ज्याच्या नावे अन्य देवता नाही. ✻ हाडांच्या सापळ्यावर देह उभा असतो. म्हणूनच हाडं अगदी बळकट कणखर असतात. त्यातही जांघेची हाडं सर्वात मजबूत असतात. यांच्या मजबुतीची तुलना काँक्रिटशी होऊ शकते. ✻ पोटॅशियम हा घटक शरीरासाठी महत्त्वपूर्ण असतो. मात्र अमेरिकेतील दर दहा नागरिकांमधील नऊजणांच्या शरीरात पोटॅशियमची कमतरता आहे. ✻ कोकाकोला या पेयामध्ये कृत्रिम रंग मिसळला नाही तर याचा मूळ रंग हिरवा असतो. ✻ कुत्री जवळपास २५० शब्दांचे अर्थ आणि भाव ओळखू शकतात. ✻ तंदुरुस्त राहण्यासाठी उष्मांकाची आवश्यकता असते हे तुम्ही जाणताच. आपण काम करतो, हालचाल करतो तेव्हा उष्मांक जळतात. पण हे माहितीये, टेलिव्हिजन बघताना उष्मांक जळतात त्यापेक्षा अधिक उष्मांक झोपलेल्या अवस्थेत जळतात.

पंचांग

**गुरुवार, २० फेब्रुवारी २०२५**
क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६,
माघ कृ. ७, नक्षत्र : विशाखा,
चंद्रराशी : वृश्चिक, ध्रुव योग,
सूर्योदय : ७.०६, सूर्यास्त १८.३९

फॉरवर्ड्स

एक कटू सत्य मांडताना कवी म्हणतो...
**ऐ मेरे पाँव के छालो...**
**जरा लहू उगलो,**
**सिरफिरे मुझसे सफ़र के**
**निशान माँगेंगे।**

आरोग्यमंत्र

## दातदुखी दूर करा

विविध कारणानं दातदुखीच्या समस्या डोकं वर काढतात. अचानक सुरु झालेल्या दातदुखीनं हैराण झालेले अनेकजण आपण पाहतो. हा त्रास आपल्याला होऊ नये अशी इच्छा असेल तर काही नैसर्गिक उपाय करून पहायला हवेत. याविषयी माहिती घेऊ.

✻ दातदुखी दूर करण्याचा सर्वात प्रभावी नैसर्गिक उपाय म्हणजे लवंगेचं तेल लावणं. हे तेल काळ्या मिऱ्यामध्ये मिसळा आणि कापसाच्या बोळ्यावर घेऊन दुखणाऱ्या दातावर ठेवा.



✻ मोहरीतेलाच्या वापरानंही दातदुखी कमी होते. हे तेल आणि मीठ असं मिश्रण हिरडीच्या दुखणाऱ्या भागावर चोळल्यानं आराम मिळतो.

✻ लिंबाच्या रसाचे थेंब दातदुखी कमी करण्याची कामी गुणकारी सिद्ध होतात.

✻ दुखणाऱ्या दातावर किंवा हिरडीवर कांद्याचा ताजा कापलेला तुकडा ठेवल्यानं दातदुखी कमी होते.

✻ दुखणाऱ्या दातावर बाहेरील बाजूनं (गालावर) बर्फाचा खडा दाबून धरावा. यानंही दातदुखीपासून थोडा आराम मिळू शकतो.

✻ अचानक दातदुखी सुरू झाल्यास अति गरम, अति गार तसंच अति गोड पदार्थ खाणं कटाक्षाने टाळायला हवं. अन्यथा दातांचं दुखणं वाढेल.

✻ घरगुती उपायांनी दातदुखी थांबली नाही तर त्वरित तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

वाचा तर खरं

स्मार्टफोन मनोरंजनाचं साधन झालंय. पण चित्रपट डाउनलोड करणं थोडं कठीण असतं. मात्र तुम्ही मूव्ही डाउनलोड साईटवरून चित्रपट मोफत डाउनलोड करता येतील. ✻ या साईटवर चित्रपटाचं विविध विभाग करण्यात आले आहेत. इंडिया मूव्हीज या विभागात जाऊन बॉलिवूडपट डाउनलोड करता येतील. ✻ मोस्ट पॉप्युलर मूव्हीज या विभागात २५० चित्रपटांची यादी आहे. अर्काईव्हमध्ये जाऊन हॉलिवूडपट डाउनलोड करता येतील. ✻ ड्युअल ऑडिओ विभागात हिंदी आणि इंग्रजी अशा दोन्ही भाषांमध्ये चित्रपट पाहता येतील.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## At a Glance

### जो निर्णय झालाच नाही त्याचा निधी जारी

**मुंबई :** धनंजय मुंडे यांनी कृषी खात्यात महाघोटाळा केला असून त्यांनी मंत्रिमंडळात जो निर्णय झालाच नाही त्याचा आदेश काढून २०० कोटींचा निधी जारी केल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केला. जो निर्णय झालाच नाही त्याचा खोटा आदेश त्यांनी काढला आणि नंतर अतिरिक्त ५०० कोटींची मागणी केल्याचा आरोपही त्यांनी केला. अशा व्यक्तीला मंत्रिमंडळात राहण्याचा कोणताही अधिकार नाही असंही त्या म्हणाल्या.

धनंजय मुंडे यांनी कृषिमंत्री असताना त्या खात्यात मोठा घोटाळा केल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केला. धनंजय मुंडे यांनी मंत्रिमंडळात निर्णय झाल्याचं दाखवून त्यांच्या सहीनिशी खोटे आदेश काढले, त्यातून सरकारचा निधी घेतला. त्याचा जीआर काढला असा आरोप त्यांनी केला. हा मंत्री कुठल्या थराला जाऊ शकतो याचं हे उत्तम उदाहरण आहे. त्यांच्यावर तातडीने कारवाई करावी आणि मंत्रिपदावरून हकलून द्यावं अशी मागणी अंजली दमानिया यांनी केली.

### बीड प्रकरणात मोठे डील : संजय राऊत

**मुंबई :** बीडमधील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात आवाज उठवणारे भाजपाचे आमदार सुरेश धस यांचे चंद्रशेखर बावनकुळे आणि देवेंद्र फडणवीस बॉस आहेत, असे ते म्हणतात, म्हणजे बावनकुळे यांनीच त्यांना ट्रॅपमध्ये पकडलंय. धस यांनी जेव्हा आकाचे आका आले, तेव्हा बैठकीतून बाहेर पडायला हवे होते

# हे छत्रपती शिवरायांच्या विचारांचे सरकार

## किल्ल्यांसाठी निधी कमी पडू देणार नाही : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस





छाया- सुरेश वाणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नारायणगाव :** रयतेचा राजा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांचा राज्य सरकार असून या सरकारकडून शिवनेरी किल्ल्यासह इतर किल्ल्यांच्या संवर्धनाला निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवनेरी किल्ल्यावर शिवभक्तांना संबोधताना दिली. राज्यामधील किल्ले व किल्ल्यांच्या परिसरामध्ये अतिक्रमण होत असून हे अतिक्रमण राज्य सरकार होऊ देणार नाही व ज्यांनी अतिक्रमण केले ते सुद्धा तात्काळ काढून टाकले जाईल असेही यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

शिवाजी महाराजांची ३९५ वी जयंती बुधवारी किल्ले शिवनेरी येथे पार पडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सांस्कृतिकमंत्री आशिष शेलार, आमदार शरद सोनवणे, माजी आमदार अतुल बेनके, बापूसाहेब पठारे, विघ्नहरचे अध्यक्ष सतीश शेरकर, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, पोलीस अधीक्षक डॉक्टर पंकज देशमुख, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मिलिंद बारभाई, भाजप नेत्या आशाताई बुचके आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शिवनेरी किल्ले व परिसरात विकासासंदर्भामध्ये आमदार शरद सोनवणे यांनी केलेल्या तेराही मागण्या पूर्ण करण्यासाठी हे सरकार कटीबद्ध आहे. शिवनेरीवर आल्यावर इथली माती कपाळाला लावल्यावर स्वराज्याची स्फूर्ती मिळते. हीच स्फूर्ती उराशी बाळगून आम्ही राज्यकारभार करीत आहोत.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, शिवाजी महाराज हे जगाचे प्रेरणास्थान आहेत. त्यांनी अठरापगड जातीला सोबत घेऊन हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. या गडकिल्ल्यांमुळे आम्हाला ऊर्जा मिळते. आणि म्हणूनच खऱ्या अर्थाने शिवाजी महाराजांच्या विचारांचे रयतेचे राज्य करण्याचा आमचा नेहमी प्रयत्न राहतो.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, शिवाजी महाराजांचे गड किल्ले हे आपले प्रेरणास्थान आहेत. दरवर्षी शिवजयंती सरकारच्या वतीने शिवनेरी किल्ल्यावर शिवजयंती साजरी होते. शिवाजी महाराजांच्या विचारांचा वारसा सर्वांना प्रेरणादायी ठरत आहे. यावेळी आमदार शरद सोनवणे माजी आमदार अतुल बेनके यांची ही भाषणे झाली.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवजन्मस्थळी शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यात आले व महिलांनी पाळणा म्हटला. जिल्हा परिषदेच्या काही शाळांनी यावेळी साहसी खेळाचे सादरीकरण केले.

शिवनेरी भूषण पुरस्काराचे वितरण देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पार पडले. मराठा सेवा संघाच्या वतीने शिवनेरी किल्ल्यावर आणलेली शिवाजी महाराजांची पालखी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांनी खांद्यावर घेऊन मिरवणुकीत सहभागी झाले. शिवनेरी किल्ल्यावर कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांनी चूक बंदोबस्त ठेवला होता. मुख्यमंत्री अजित पवार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार एकाच हेलिकॉप्टरने आठ वाजता शिवनेरी किल्ल्यावर आले, शिवजयंती सोहळा दीड तास शिवनेरी किल्ल्यावर पार पडला.

# तो खड्डा बांधकाम आणि जाळीने झाकणार

## दै. राष्ट्र संचारच्या वृत्ताची बांधकाम विभागाकडून दखल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** राजगुरुनगर शहरात वाडा रस्त्यावर मोठा निधी खर्च करण्यात आला आहे. मात्र नुकतेच काम केलेल्या बंदिस्त गटाराचा काही भाग उघडा राहिला असल्याने नागरिकांच्या त्यातही ज्येष्ठ नागरिक आणि महीला, मुलांच्या जीविताला धोका निर्माण झाला. बंदिस्त गटाराच्या कामात दोन ठेकेदार नेमले आणि त्या दोघांच्या मतभेदाचा फटका म्हणुन वर्दळीच्या ठिकाणी गटर उघडे पडले असल्याचा प्रकार घडला होता. सार्वजनिक बांधकाम विभाग आणि नगरपरिषदेच्या दुर्लक्षाने असे प्रकार घडत असल्याने नागरिकांमध्ये संताप जनक प्रतिक्रीया होत्या. तसे वृत्तांकन दै. राष्ट्र संचारने केले होते. दोन दिवसां पासून या खड्ड्याचे सर्व बाजूने



बांधकाम करण्यात येत असून त्यावर लोखंडी जाळी बसवण्यात येणार असल्याचे सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे शाखा अभियंता नितीन दाणे यांनी सांगितले.

राजगुरुनगर शहरातील वाडा रस्त्यावर काही महिन्यापूर्वी सिमेंट कॉंक्रिट करण्यात आले आहे. दीड किलोमिटर अंतर रस्त्यासाठी माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या माध्यमातून १५ कोटी रुपयांचा निधी प्रस्तावित करण्यात आला होता.त्या पैकी जवळपास १३ कोटी रुपयांचा निधी खर्च झाला आहे. रस्त्यालगत असलेल्या दोन्ही बाजूच्या बंदिस्त गटर काम करण्यात आले आहे. त्यासाठी शासनाचा ४ कोटी,९९ लाख,७१ हजार १९ रुपये निधी खर्च झाला आहे.सार्वजनिक बांधकाम उपविभाग खेड आणि नगरपरिषदच्या माध्यमातून हे काम झाले. त्यासाठी रस्त्याच्या उत्तर बाजुच्या गटारासाठी अर्धे अर्धे असे काम करणारे दोन ठेकेदार नेमले होते. दोघांच्या कामाचा शेवट पंचायत समिति चौकात आणि तिन्हेवाडीकडे जाणाऱ्या प्रमुख रस्त्या लगत झाला. येथे चेंबर बनवुन तीन बाजूने आलेल्या दोन ते तीन फूट व्यासाच्या सिमेंट पाईप मधुन गटाराचे पाणी जमा होऊन पुढे जाते. हे गटर दर्शनी भागात आणि वर्दळीच्या ठिकाणी आहे. पाईप लाईन मोठ्या व खोल असल्याने खोल उकरण्यात आले. मात्र काम न करता हा खड्डा आणि गटार उघडे राहिले. या खड्यात पादचारी, दुचाकी वाहने घसरून अपघात होण्याचेप्रकारघडतराहिले. लगतच महात्मा गांधी विद्यालय असुन येथे लहान मोठ्या इयत्तेतले सहा हजार विद्यार्थी शिकतात. काही पायी तर अनेक मुले सायकल घेऊन शाळेत येतात. मात्र येथील गर्दीतून वळण घेताना धोका पोहोचू शकतो अशी स्थिती निर्माण झाली होती.शाळा सुरू असताना एका सकाळी अशाच पध्दतीने सायकल प्रवास करताना एक विद्यार्थी गटाराच्या खड्ड्यात पडला. एक दुचाकी घसरून पडली. सुदैवाने कोणालाही मोठी दुखापत झाली नाही. मात्र दोन ठेकेदार आणि त्यांच्यावर नियंत्रण ठेवणारी सार्वजनिक बांधकाम उपविभाग व राजगुरुनगर नगरपरिषद यांनी खड्डा प्रश्नावर कोणतीही कारवाई केली नव्हती.


राष्ट्रसंचार
दोन ठेकेदार नेमले तगडे... मात्र मध्यावर गटर उघडे..!

राष्ट्रसंचार IMPACT

● दोन ठेकेदार नियुक्त केले. मात्र राहीलेल्या उघड्या गटाराची जबाबदारी कुणावर टाकायची? यावरून नगरपरिषद आणि बांधकाम उपविभाग संभ्रम होता. येथील वावर नागरिकांच्या दृष्टीने धोकादायक बनला होता. उघड्या गटाराची दुर्गंधी परिसरात पसरली होती. निर्णय घेऊन काम करण्यासाठी अधिकाऱ्यांनी दिरंगाई केली. काम सुरू झाले असुन समस्या सुटणार असल्याने समाधान वाटते.

● शिवाजी मांदळे, माजी नगराध्यक्ष, राजगुरुनगर नगरपरिषद

पान १ वरून

# शिवसृष्टीच्या तिसऱ्या टप्प्यासाठी ५० कोटींचा निधी

विश्वस्त जगदीश कदम, अमृत पुरंदरे, डॉ विनय सहस्त्रबुद्धे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ अजित आपटे यांनी केले तर प्रतिष्ठानचे विश्वस्त विनीत कुबेर यांनी आभार मानले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकताच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला ही आपल्यासाठी आनंदाची बाब आहे, असे सांगत देवेंद्र फडणवीस म्हणाले, “भाषेचे महत्त्व छत्रपती शिवाजी महाराजांनी जाणले होते आणि म्हणूनच त्यांनी स्वराज्यात मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा देऊ केला होता. त्या काळी अरबी, फारसी भाषेत चालणारा राज्यकारभार महाराजांनी मराठीमध्ये चालू केला होता. त्याकाळी महाराजांनी आज्ञापत्रे, राजकारभारातील अनेक शब्द देखील मराठीमध्ये आणले.”

लढवय्ये महाराज सर्वांनाच माहित आहेत, मात्र त्या पलीकडे जात स्वराज्य, स्वधर्म आणि स्वभाषेचा पुरस्कार करणारे महाराज, पर्यावरणप्रेमी, युध्दकौशल्याचा अभ्यास असलेले महाराज, योग्य प्रशासक असलेले महाराज असे महाराजांचे अनेक पैलू पुढे आणण्याचे काम शिवसृष्टी नक्की करेल असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

शिवसृष्टीला राज्य सरकारने महत्त्वाच्या पर्यटन स्थळाचा दर्जा दिला असला तरी शिवसृष्टी हे निव्वळ एक पर्यटन केंद्र नसून छत्रपती शिवरायांवरील अभ्यासाचे आणि त्यांच्या व्यक्तीमत्त्वापासून प्रेरणा घेण्याचे केंद्र आहे असे स्पष्ट मत फडणवीस यांनी मांडले.

राष्ट्राभिमानी आणि इतिहास जाणणारी पिढी जोवर तयार होत नाही तोवर देशाचा विकास होणार नाही हे लक्षात घेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ‘विकास भी, विरासत भी’ ही संकल्पना देशासमोर मांडली. त्यालाच अनुसरून वारसा, विरासत जपणारी राष्ट्राभिमानी पिढी निर्माण व्हावी यासाठी शिवसृष्टी प्रकल्प महत्त्वाचा ठरेल, असे फडणवीस म्हणाले. आपला समाज आपला वैभवसंपन्न वारसा विसरला होता, तो लक्षात आणून देण्याचे काम छत्रपती शिवाजी महाराज यांनी केले. आता शिवसृष्टीच्या माध्यमातून आपण ते पुढील पिढीपर्यंत नेऊ असेही फडणवीस यांनी सांगितले.

मी देशविदेशात अनेक ऑम्युझमेंट प्रकल्पांना भेट दिली आहे मात्र शिवसृष्टीमध्ये जो विचार जी प्रेरणा मिळाली ती शब्दांत वर्णन करता येणार नाही असे सांगत देवेंद्र फडणवीस म्हणाले, “या प्रकल्पाला भेट दिली नाही तर तुम्ही स्वर्गीय आनंदाला मुकाला असे मला वाटते. देशातील आणि राज्यातील प्रत्येक विद्यार्थ्याने शिवसृष्टीला भेट द्यायलाच हवी.” आज साकारत असलेली ही शिवसृष्टी पाहून पद्मविभूषण बाबासाहेब पुरंदरे हे देखील स्वर्गातून शुभाशीर्वाद देत असलील असे फडणवीस म्हणाले. ही शिवसृष्टी हे राष्ट्रकार्य आहे हीच भावना आमच्या मनात असल्याचेही त्यांनी नमूद केले.

एक ते दीड हजार वर्षांत आपणा सर्वांना स्वराज्य, स्वधर्म आणि स्वभाषेचा विसर पडला होता. आपले हजारो वर्षाचे स्वत्व यामुळे संपते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली असताना छत्रपती शिवाजी महाराजांनी हे स्वत्व टिकविले आणि एकाच छताखाली शिवरायांची प्रेरणा मिळावी या कल्पनेतून बाबासाहेब पुरंदरे यांनी शिवसृष्टीची कल्पना मांडली असे गौरवोद्गार नाना जाधव यांनी काढले.

प्रास्ताविक करताना जगदीश कदम यांनी शिवसृष्टीमध्ये साकारण्यात आलेल्या आणि नजीकच्या भविष्यात साकारल्या जाणाऱ्या गोष्टींची माहिती उपस्थितांना दिली. शिवसृष्टीच्या दुसऱ्या टप्प्याच्या निर्मितीमध्ये सुमारे रुपये ८७ कोटी इतकी गुंतवणूक करण्यात आली असून स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा ही शिवाजी महाराजांना जवळची असणारी महत्वाची ३ तत्वे यावर या टप्प्याच्या निर्मितीमध्ये विशेष लक्ष केंद्रित करण्यात आल्याचे कदम यांनी सांगितले.

शिवसृष्टीच्या दुसऱ्या टप्प्यात उभारण्यात आलेल्या गंगासागर तलावात रायगड, राजगड, प्रतापगड, सिंहगड या किल्ल्यावरून आणलेले पाणी आज मान्यवरांच्या हस्ते अर्पण करण्यात आले. याशिवाय उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी प्रयागराज येथून पाठविलेल्या पाण्याचा कलश, तुळापूर त्रिवेणी संगमांवरील पाणी आणि नर्मदा नदीचे पाणी देखील यावेळी गंगासागरता अर्पण करण्यात आले. यापैकी रायगडावरील पाणी हे घोडेस्वरांनी आणले आहे हे विशेष.

## त्रिवेणी संगमाचे पाणी योग्यच -योगी आदित्यनाथ



**प्रयागराज :** उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी महाकुंभ दरम्यान त्रिवेणी संगमावरील पाण्याच्या गुणवत्तेवर उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तर दिले आहे. विधानसभेत बोलत असताना योगी आदित्यनाथ म्हणाले, संगमावरील पाणी फक्त आंघोळीसाठीच नाही तर पिण्यासाठीही योग्य आहे. पाण्याच्या गुणवत्तेवर उपस्थित केलेले प्रश्न हे महाकुंभला बदनाम करण्यासाठी उपस्थित केले आहेत, असा आरोप त्यांनी केला.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने संगमावरील पाण्याच्या गुणवत्तेबाबत धक्कादायक अहवाल दिला होता. संगमावरील पाण्यात फेकल कॉलीफॉर्मचा स्तर खूपच वाढला असल्याचे अहवालात म्हटले होते.

योगी आदित्यनाथ म्हणाले, यूपी प्रदूषण नियंत्रण मंडळ पाण्याची गुणवत्ता कायम राहावी, यासाठी अथक प्रयत्न करत आहे. आजच्या ताज्या चाचणीनुसार संगमावरील पाण्यात बीओडीची मात्रा ३ पेक्षा कमी आहे. तसेच त्यात डिझॉल्व्ह ऑक्सिजनची पातळी ८-९ च्या आसपास आहे. याचा अर्थ संगमावरील पाणी केवळ आंघोळीसाठीच नाही तर पिण्यासाठीही योग्य आहे, असा दावा त्यांनी केला.

## नक्षल्यांच्या मुसक्या आवळल्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**यवतमाळ :** झारखंड राज्यातील नक्षल दलम कमांडरच्या मुसक्या आवळण्यात यवतमाळ पोलिसांना यश आलय. दिलीप उर्फ तुलसी मेहतो असं या नक्षलवाद्याचं नाव आहे. तुलसी हा १९९३ मध्ये झारखंडमधील नक्षली गटात भरती झाला होता. १९९७ मध्ये ‘भितीया दलम’ चा विभागीय कमांडर म्हणून नियुक्ती मिळाली. त्यानं बारा सशस्त्र नक्षलवाद्यांचं नेतृत्व केलय. सुरक्षा दलावर हल्ले, खंडणी, सरकारी मालमत्तेची तोडफोड अशा अनेक हिंसक कारवायांमध्ये त्याचा सहभाग आहे. झारखंड पोलिसांच्या नोंदीनुसार त्याच्यावर सहा गुन्हे दाखल आहेत. गेल्या तेरा वर्षापासून नाव बदलून तो यवतमाळ जिल्ह्यात वास्तव्यास होता अशी माहिती, जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी दिली.

झारखंड राज्यातील नक्षल दलम कमांडरच्या मुसक्या आवळण्यात आल्या आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखा पोलीस पथकानं तब्बल दीड महिन्याच्या मागोव्यानंतर यवतमाळ शहरातील लकडगंज परिसरात केली. या कारवाईनं पुन्हा एकदा वणी तालुकाच नव्हे तर जिल्ह्याचे केंद्र असलेल्या यवतमाळ मुख्यालय नक्षल्यांचे 'रेस्ट झोन' आहे का? हा सवाल उपस्थित होत आहे.


महाराष्ट्र शासन वन विभाग
**वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, सुधागड**
ता. सुधागड, जि. रायगड ४११०२०५
**निविदा सुचना क्र. ०५ सन २०२४-२५**

खालील कामांच्या सीलबंद निविदा वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय सुधागड ता. सुधागड, जि. रायगड ४११०२०५ हे महाराष्ट्र शासनाच्या बांधकाम खात्याकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून मागवित आहेत. को-या निविदा या वनपरिक्षेत्र सुधागड कार्यालयामध्ये मिळतील. सदरच्या निविदा दिनांक १८-०२-२०२५ ते २५-०२-२०२५ या कालावधीमध्ये भरून हार्ड कॉपीचे स्वरुपात भरावयाच्या आहेत. सदरच्या भरलेल्या निविदा वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय सुधागड यांचे कार्यालयामध्ये दिनांक २५.०२.२०२५ रोजी दुपारी ०४:०० वा पर्यंत स्विकारणेत येतील व त्याच दिवशी सायंकाळी ०५:०० वा उघडणेत येतील. निविदा स्विकृतीचे अधिकार वन परिक्षेत्र अधिकारी, सुधागड यांनी राखुन ठेवलेले आहेत.

अटी व शर्ती :

१) निविदा धारकांनी सावधानता बाळगून निविदा सादर करण्याच्या किमान १ दिवस आधी सर्व प्रक्रिया पूर्ण करण्याची दक्षता घ्यावी. निविदा धारकांनी निविदा संदर्भात सर्व दस्तावेज संबंधित कार्यालयात सादर करणे अनिवार्य राहिल अन्यथा निविदा स्विकारण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

२) सदर कामाबाबत बी १ फॉर्म वन परिक्षेत्र कार्यालय सुधागड येथून निविदा धारक यांनी प्राप्त करुन घ्यावा. ३) ज्या निविदा धारकांची निविदा मंजूर झालेली आहे, त्या कामाचे आदेश प्राप्त होताच ३ दिवसाच्या आत काम सुरु करण्यात यावे अन्यथा सदर निविदा रद्द करण्यात येईल.

४) सदर कामाचा कालावधी ३१/०३/२०२५ पर्यंत असल्याने सदर काम हे ३१/०३/२०२५ पुर्वीच पुर्ण करणे बंधनकारक राहील.

५) शासन निर्णयान्वावे शासनाने नमुद करण्यात आलेल्या अटी व शर्ती सदर निविदेस लागु असतील.

६) सदर कामांची सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखुन ठेवलेला आहे.

**वन परिक्षेत्र अधिकारी**
**सुधागड**


## तब्बल १०० कोटींपेक्षा जास्त तरतूद

# अनेक तीर्थस्थानांचा होणार विकास

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पीएमआरडीएचे भौगोलिक क्षेत्रफळ ६ हजार २४६.२६ चौरस किलोमीटर एवढे असून त्यामध्ये नऊ तालुके आणि ६९७ गावांचा समावेश आहे. जिल्ह्यात अनेक तीर्थस्थळे असून तेथे भाविकांची मोठी गर्दी होत असते. ही बाब लक्षात घेऊन पीएमआरडीएच्या अर्थसंकल्पात धार्मिक स्थळांच्या विकासाला प्राधान्य देण्यात आले आहे.


पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) जिल्ह्यातील तीर्थक्षेत्रांचा आणि पर्यटन ठिकाणांचा आराखडा करण्यात येणार आहे. ११४ कोटी रुपयांचा हा आराखडा आहे.या ठिकाणी वाहनतळासह अन्य पायाभूत सुविधांचा विकास केला जाणार आहे.

हवेली तालुक्यातील थेऊर येथील श्री चिंतामण गणपती मंदिर, पुरंदर तालुक्यातील हिवरे येथील महादेव मंदिर आणि कोडीत येथील श्रीनाथ म्हस्कोबा मंदिर, शिरूर तालुक्यातील रांजणगाव येथील श्री महागणपती मंदिर आणि भांबुर्डे येथील मळाईदेवी मंदिर, भोर तालुक्यातील नसरापूर येथील बनेश्वर महादेव मंदिर आणि दौंड तालुक्यातील डाळींबे येथील श्री विठ्ठल मंदिर यांचा पहिल्या टप्प्यात समावेश करण्यात आला आहे. या आठ तीर्थस्थळांमध्ये विविध पायाभूत सुविधांचा विकास केला जाणार आहे. त्यामध्ये सोलर व्यवस्था, वाहनतळ, निवारा शेड, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, स्वच्छतागृहे आणि पोहोच रस्ते विकसित केले जाणार आहेत. पोहोच रस्ते विकसित केल्यामुळे तीर्थस्थळांच्या विकासालाही चालना मिळेल, असा दावाही पीएमआरडीए प्रशासनाकडून करण्यात आला आहे.

याशिवाय जिल्ह्यातील पर्यटनाला चालना देण्यासाठी ६७ कोटी रुपये खर्च केले जाणार असून त्याअंतर्गत रस्त्यांचे जाळे विकसित केले जाणार आहे. त्यासाठी नऊ ठिकाणे पहिल्या टप्प्यात निश्चित करण्यात आली आहेत. त्यामध्ये मावळ, हवेली, मुळशी तालुक्यातील पर्यटन स्थळांचा समावेश असून यातील पाच ठिकाणे ही मावळ तालुक्यातील आहेत.

> पीएमआरडीएचा हा महत्त्वाचा उपक्रम आहे. जिल्ह्यातील समृद्ध सांस्कृतिक वारशाला आधुनिक पायाभूत सुविधांची जोड या माध्यमातून देण्यात येणार आहे. त्यातून पर्यटन स्थळे आणि तीर्थक्षेत्र एकमेकांशी जोडण्याला प्राधान्य असेल.
> **- डॉ. योगेश म्हसे,** महानगर आयुक्त, पीएमआरडीए

#रा



काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष राहुल गांधी यांनी आज शिवजयंतीच्या निमित्ताने , शिवप्रतिमा उंचावून दाखवत असल्याचे त्यांच्याकडे संग्रहित छायाचित्र एक्स वर प्रसारित केले आहे.

## भिवंडीत अग्नीतांडव सुरूच

**ठाणे :** जिल्ह्यात सतत लागणाऱ्या आगीच्या दुर्घटनांमुळे ज्वालामुखीचा तालुका म्हणून ओळख निर्माण झालेल्या भिवंडीत तालुक्यात अग्नीतांडवचे सत्र सुरुच आहे. बुधवारी पहाटेच्या सुमारास लागलेल्या आगीत तीन गोदाम जळून खाक झाली आहेत. मिळालेल्या माहितीनुसार भिवंडी तालुक्यातील मुंबई-नाशिक महामार्ग लगत असलेल्या येवई गावच्या हद्दीत आर.के. लॉजिस्टीक गोदाम संकुलात बॅकारोझ परफ्युमस अँड ब्युटी प्रॉडक्टस् प्रा ली , इन्टरक्राफ्ट ट्रेडिंग प्रा. लि, फ्रेगरेंस शॉप प्रा. लि या तीन कंपन्यांचे गोदाम आहेत. या गोदामात मोठ्या प्रमाणात परफ्यूमचा साठा साठवून करून ठेवला होता. त्यातच बुधवारी पहाटे चार वाजल्याच्या सुमारास अचानक एका गोदामाला आग लागली. काही क्षणात आगीनं रौद्ररूप धारण केलं. ही आग पसरत जवळच्या गोदामांना लागली. या आगीच्या कचाट्यात सापडल्यानं तीन कंपन्यांचे गोदाम जळून खाक झाली आहेत. अचानक लागलेल्या भीषण आगीमुळे कोट्यवधींचे नुकसान झाल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे.



आळंदी नगरपरिषद तर्फे छत्रपती शिवाजी महाराज यांचे जयंती निमित्त पुष्पहार अर्पण करून मुख्याधिकारी कैलास केंद्रे, नगरपरिषद बांधकाम अभियंता सचिन गायकवाड यांनी अभिवादन केले.

## ज्ञानेश कुमार यांनी पदभार स्वीकारला

**नवी दिल्ली :** ज्ञानेश कुमार यांनी बुधवारी २६ वे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून पदभार स्वीकारला. राष्ट्र उभारणीचे पहिले पाऊल म्हणजे मतदान आहे, असे यावेळी ते म्हणाले. तसेच डॉ. विवेक जोशी यांनी निवडणूक आयुक्त म्हणून पदभार स्वीकारला. पदभार स्वीकारल्यानंतर ज्ञानेश कुमार म्हणाले की, वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या भारतातील प्रत्येक नागरिकाने मतदार बनले पाहिजे आणि नेहमी मतदान केले पाहिजे. भारताची राज्यघटना, निवडणूक कायदे, नियम आणि त्यामध्ये जारी केलेल्या सूचनांनुसार भारत निवडणूक आयोग मतदारांच्या पाठीशी होता, आहे आणि नेहमीच राहील, असे ते म्हणाले. ज्ञानेश कुमार यांनी १७ फेब्रुवारी २०२५ रोजीच्या केंद्रीय कायदा आणि न्याय मंत्रालयाच्या राजपत्र अधिसूचनेनुसार भारताचे २६ वे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून पदभार स्वीकारला आहे, असे केंद्रीय निवडणूक आयोगाने म्हटले आहे.



किल्ले रायगडावर छावा चित्रपटाचे अभिनेते विकी कौशल यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचे आशीर्वाद घेतले.

## शरद पवार आणि संजय राऊत एका मंचावर

**मुंबई :** शरद पवार आणि संजय राऊत गुरुवारी एका पुस्तक प्रकाशनानिमित्त एकाच मंचावर येणार आहेत. साहित्य संमेलनाच्या निमित्ताने एकनाथ शिंदे यांना दिलेल्या पुरस्कारावरून संजय राऊत यांनी थेट पवारांना सल्ला दिला होता. साहित्य संमेलन आयोजकांवरही टीकेचे बाण सोडले होते. यानंतर पहिल्यांदाच शरद पवार आणि संजय राऊत एकाच मंचावर असणार आहेत. दिल्लीस्थित ज्येष्ठ पत्रकार नीलेशकुमार कुलकर्णी यांनी लिहलेल्या 'संसद भवन ते सेंट्रल विस्टा' या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या निमित्ताने ही नेतेमंडळी एकत्र असणार आहेत. माजी लोकसभा अध्यक्ष शिवराज पाटील चाकूरकर हे देखील या कार्यक्रमाला उपस्थितीत असणार आहेत. ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या पूर्वसंध्येला हा कार्यक्रम दिल्लीत होत आहे.

### अमेरिकेने बदलली भूमिका : सर्वांना दिला आश्चर्याचा धक्का

# युक्रेनच युद्धाला जबाबदार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** राडोनाल्ड ट्रम्प सत्तेवर आल्यापासून युक्रेन आणि रशियायांच्यात सुरू असलेल्या युद्धाबाबत अमेरिकेची भूमिका बदललेली दिसते. नुकतेच त्यांनी युक्रेनसह सर्वांना आश्चर्याचा धक्का देत युक्रेन युद्धाला जबाबदार असल्याचे म्हटले होते. आतापर्यंत जो बायडेन सरकार युक्रेनला पाठिंबा देत होते आणि रशियाला या युद्धाचे कारण सांगत होते. अशा तऱ्हेने डोनाल्ड ट्रम्प यांनी आता युक्रेनवर युद्धाचा ठपका ठेवत आपल्या बदललेल्या धोरणाचे संकेत दिले आहेत.



ट्रम्प म्हणाले की, रशिया आणि युक्रेनमधील युद्धासाठी युक्रेन जबाबदार आहे. युक्रेनमधील युद्ध पुढील आठवड्यात चौथ्या वर्षात प्रवेश करणार आहे. दरम्यान, युक्रेन आणि रशियासाठी अमेरिकेचे विशेष दूत कीथ केलॉग कीव्हमध्ये दाखल झाले आहेत. ते येथे राष्ट्राध्यक्ष व्होलोदिमीर झेलेन्स्की आणि लष्करी कमांडर्सशी चर्चा करतील.

अमेरिकेने रशियाला एकटे पाडण्याच्या आपल्या वर्षानुवर्षे जुन्या धोरणात बदल केले असतानाच केलॉग यांचा युक्रेन दौरा होत आहे. सौदी अरेबियात अमेरिका आणि रशियाच्या वरिष्ठ राजनैतिक अधिकाऱ्यांमध्ये चर्चा झाली. यात युक्रेन आणि त्याच्या युरोपियन समर्थकांना डावलण्यात आले. ट्रम्प यांच्या या वक्तव्यामुळे युक्रेनच्या अधिकाऱ्यांसाठी अडचणी निर्माण होण्याची शक्यता असून त्यांनी युरोपियन देशांना रशियन आक्रमणाशी लढण्यासाठी मदत करण्याचे आवाहन केले आहे. रशिया-युक्रेन युद्धाला २४ फेब्रुवारी २०२२ रोजी सुरुवात झाली. दरम्यान, युक्रेनच्या पूर्व भागात रशियन सैन्याकडून सातत्याने सुरू असलेल्या हल्ल्यांमुळे युक्रेनचे सैन्य कमकुवत होत असून, एक हजार किलोमीटरच्या फ्रंट लाईनमधील काही आघाड्यांवर हळूहळू पण सातत्याने मागे ढकलले जात आहे.

युक्रेनने युद्ध सुरू करायला नको होते आणि ते थांबवण्यासाठी करार करू शकतो, असे ट्रम्प यांनी मंगळवारी फ्लोरिडा येथील निवासस्थानी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

केलॉग म्हणाले की, त्यांची ही भेट "काही अर्थपूर्ण, ठोस संभाषण करण्याची संधी आहे." झेलेन्स्की यांनी बुधवारी आपला नियोजित सौदी अरेबिया दौरा रद्द केला, ज्याकडे काही विश्लेषकांनी आपल्या देशाच्या भवितव्याबद्दल अमेरिका-रशिया चर्चेला कायदेशीर मान्यता न देण्याचा प्रयत्न म्हणून पाहिले. संभाव्य शांतता करार झाल्यानंतर रशियाचे आक्रमण रोखण्यासाठी उत्तर अटलांटिक ट्रीटी ऑर्गनायझेशनमध्ये (नाटो) सामील होण्याची युक्रेनची आशा पूर्ण होणार नाही, असे संकेत अमेरिकी अधिकाऱ्यांनी दिले आहेत.



> आम्हाला सुरक्षा हमीची आवश्यकता समजते. युक्रेनचे सरकारी प्रसारक सुस्पिल नोविनी यांनी त्यांच्या वक्तव्याचे प्रसारण केले. आमच्यासाठी या देशाच्या सार्वभौमत्वाचे आणि स्वातंत्र्याचे महत्त्व स्पष्ट आहे. डोनाल्ड ट्रम्प स्वत:ला व्लादिमीर पुतिन यांचे मित्र म्हणत आहेत. अशा परिस्थितीत सौदी अरेबियाच्या मध्यस्थीने मार्ग निघू शकतो, असे मानले जात आहे. सौदी अरेबियाचे अमेरिका आणि रशिया या दोन्ही देशांशी घनिष्ठ संबंध आहेत.
>
> **- कीथ केलॉग,** अमेरिकेचे दूत

# लष्कराला राजकारणात ओढू नये

## लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांचा राहुल गांधींना सल्ला

लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी काँग्रेस खासदार राहुल गांधी यांना सल्ला दिला आहे. लष्कराला राजकारणात ओढू नये, असे ते बुधवारी म्हणाले. तसे झाले तर ती चिंतेची बाब ठरेल. एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते. द्विवेदी म्हणाले की, आम्ही चीनसोबत चर्चेचा मार्ग पुढे नेला आहे. आम्ही सीमा वादावर चीनसोबत चर्चेला प्रोत्साहन दिले आहे. एकमेकांशी बोललो तर अनेक शंकांचे निरसन होईल. कोणत्याही मार्गाने संशय दूर व्हायला हवा, असे आमचे मत आहे. त्यासाठी आम्ही कोअर कमांडर्सना शक्य तिथे निर्णय घेण्याचे अधिकार दिले आहेत. एखादा प्रश्न चर्चेतून सुटला असेल तर तो होऊ द्या. त्यांच्या स्तरावर कोणतेही प्रकरण सोडवता येत असेल तर ते करू शकतात, असा अधिकार त्यांना देण्यात आला आहे. त्यासाठी कोणत्याही प्रकारच्या मंजुरीची वाट पाहण्याची गरज नाही.



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी राहुल गांधी यांच्या वक्तव्यावर भाष्य करताना म्हटले की, लष्कराला राजकारणात ओढले जाऊ नये. त्याचवेळी त्यांनी पुन्हा एकदा काली देवीप्रमाणे महिलांना सैन्यात सामावून घेण्याबाबत केलेल्या वक्तव्यावर भाष्य केले. जनरल द्विवेदी म्हणाले की, माझी भावना अशी होती, जी झाशीची राणी लक्ष्मीबाईंसाठी होती. लष्करात महिलांचा समावेश व्हावा, यासाठी ते आग्रही आहेत.

लष्करप्रमुखांनी या काळात शस्त्रास्त्रांच्या विक्रीबाबतही भाष्य केले. ते म्हणाले की, आज आपल्या देशातून परदेशात शस्त्रे पाठवली जात आहेत. याचे कारण म्हणजे आता शस्त्रास्त्र उत्पादक कंपन्यांना परवाने सहज मिळत आहेत आणि सवलती मिळत आहेत. भारत बऱ्याच काळापासून सांगत आहे की, आम्हाला चर्चा हवी आहे. पण गरज पडल्यास आम्ही युद्धातून मागे हटणार नाही.

लष्करात कोणी शहीद झाले तर घरच्यांना कसे सांगाल, असा प्रश्न विचारला असता तुम्ही कसे सांगाल? आमच्यासाठी हा खूप वेदनादायी अनुभव आहे. पण आम्ही कुटुंबासारखं काम करतो. सैन्यात इंजिनीअर, आर्टी, इन्फंट्री अशी सगळी माणसं एका कुटुंबासारखी असतात. आजही आपण कोणताही कार्यक्रम केला तर शहिदांच्या विधवा मोठ्या संख्येने येतात. यावरून आपण एक कुटुंब म्हणून काम करतो हे दिसून येते, असे ते म्हणाले.



> पाकिस्तानने काही आगळीक काढली, तर भारत त्याला चोख प्रत्युत्तर देईल. २०१४ पासून भारताने गरज भासल्यास तो आक्रमक होऊ शकतो, हे दाखवून दिले आहे. काश्मिरमधील कलम ३७० रद्द करण्यात आल्यानंतर, दहशतवाद्यांची भरती कमी झाली आहे.
>
> **- जनरल उपेंद्र द्विवेदी,** लष्करप्रमुख

# बल्गेरियातही होतोय टोरेस घोटाळा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** टोरेस गुंतवणूक घोटाळ्याची चौकशी करणाऱ्या मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेच्या हाती महत्त्वाची माहिती लागली आहे. टोरेस घोटाळा प्रकरणातील फरार आरोपींनी बल्गेरियातही अशाच प्रकारच्या गुंतवणूक योजना सुरू केली असून, त्यांची चौकशी सुरू असल्याचं एका पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले. टोरेस फसवणूक प्रकरणात पोलिसांनी आतापर्यंत सहा जणांना अटक केली असून, तर नऊ जण फरार आहेत. यातील आठ जण युक्रेनचे आणि एक जण तुर्कीचा रहिवासी आहे. घोटाळ्याचा तपास करताना आरोपींनी १२,७८३ गुंतवणूकदारांना १३० कोटी रुपयांना फसवल्याचे समोर आलंय.

आर्थिक गुन्हे शाखेचे अधिकारी आता बल्गेरियात फरार आरोपींनी वेगळ्या कंपनीच्या नावाखाली सुरू केलेल्या गुंतवणूक योजनांची चौकशी करण्याचा प्रयत्न करीत आहेत, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. "माहितीची खातरजमा झाल्यानंतर ती अधिकृत माध्यमाद्वारे बल्गेरियातील कायदा अंमलबजावणी संस्थांबरोबर शेअर केली जाणार आहे," अशीही माहिती त्यांनी दिलीय. टोरेस गुंतवणूक घोटाळ्याशी संबंधित आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागाने ३५ कोटी




रुपयांची मालमत्ता जप्त केलीय, ज्यामध्ये रोख रक्कमदेखील समाविष्ट आहे.

तपास करणाऱ्या यंत्रणेकडून मिळालेल्या माहितीनुसार, कंपनीने वापरलेल्या कार, फर्निचर, इलेक्ट्रिकल उपकरणांचा लिलाव करण्यासाठी न्यायालयाकडून परवानगी मागितल्याचं एका अधिकाऱ्याने सांगितलंय. "जर या गोष्टी सुरळीत पार पडल्या तर गुंतवणूकदारांचे सुमारे ४० कोटी रुपये परत मिळू शकतात," असंही त्यांनी अधोरेखित केलंय. टोरेस ज्वेलरी ब्रँडचे मालक प्लॅटिनम हर्न प्रायव्हेट लिमिटेडवर पॉन्झी आणि मल्टी-लेव्हल मार्केटिंग योजनांच्या आमिषानं गुंतवणूकदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. गुंतवणुकीवर आकर्षक परताव्याचे आश्वासन देऊन या कंपनीनं अनेकांना गंडा घातला.

# बंदूकधाऱ्याकडून बसमधील प्रवाशांवर गोळीबार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लाहोर :** पाकिस्तामधील बलुचिस्तान प्रांतात लाहोरला जाणाऱ्या बसवर अज्ञात बंदूकधाऱ्यांनी हल्ला केला आहे. हल्लेखोरांनी आधी बस थांबवली आणि बसमधील सर्व प्रवाशांचे ओळखपत्र तपासली. त्यानंतर सात प्रवाशांची गोळी घालून हत्या केली. नैऋत्य बलुचिस्तानमधील बरखान जिल्ह्यात हा हल्ला झाला.

बलुचिस्तानमधील बरखान जिल्ह्यात सुमारे ४० सशस्त्र पुरूषांच्या गटाने अनेक बस आणि वाहने थांबवली, ओळखपत्रे तपासली आणि त्यानंतर बसमधून सात प्रवाशांना बाहेर काढले आणि त्यांच्यावर गोळ्या झाडल्या.या हल्ल्यात मृत्यू झालेल्यांमध्ये सर्व सातही पंजाब प्रांतातील आहेत.

या भागाचे सहाय्यक आयुक्त खादिम हुसेन यांनी सांगितले की, बरखानला दक्षिण पंजाबमधील डेरा गाझा खान शहराशी जोडणाऱ्या महामार्गावर हा हल्ला झाला. या हल्ल्याची जबाबदारी कोणत्याही गटाने स्वीकारलेली नाही आणि हत्येमागील कारण अद्याप अस्पष्ट आहे.



**लेबनॉन** तणाव कायम: लेबनॉनमध्ये माघार घेण्यासाठी दिलेल्या अंतिम मुदतीनंतरही इस्रायल दक्षिण लेबनॉनमधील अनेक चौक्यांवर सैन्य ठेवणार असल्याचे इस्रायलने स्पष्ट केले असून, त्यामुळे मध्य पूर्वेतील तणाव कायम आहे.

# तब्बल १८ हजार रेल्वे प्रवाशांचे आरक्षण रद्द




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नाशिक :** कुंभमेळ्यासाठी प्रयागराज तसंच दिल्ली रेल्वे स्थानकात झालेल्या चेंगराचेंगरीमुळे प्रवाशांची गर्दी कमी करण्यासाठी रेल्वेनं २१ ते २७ फेब्रुवारी दरम्यान प्रयागराजकडे जाणाऱ्या १२ रेल्वे गाड्या रद्द केल्यात. यात नाशिकमार्गे धावणाऱ्या आठ गाड्यांचा समावेश आहे. यामुळे तब्बल १८ हजार प्रवाशांचे आरक्षण रद्द होणार आहे. आरक्षण केलेल्या प्रवाशांना ऑनलाइन तसंच खिडकी या

### रिफंड दिला जाणार

● आरक्षण रद्दचा मेसेज सर्व संबंधित प्रवाशांना पाठवण्यात आला आहे. ऑनलाइन आरक्षण करणाऱ्यांना ऑनलाईन रिफंड दिला जात आहे. ज्यांनी खिडकीवर मॅन्युअल आरक्षण केली आहेत, त्यांची कोणतीही रक्कम वजा न करता पूर्ण रिफंड देण्याच्या सूचना देण्यात आल्याचं रेल्वे प्रशासनानं सांगितलं आहे.

दोन्ही पद्धतीने रिफंड देण्यात येईल असं रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं.

प्रयागराजला सुरू असलेल्या कुंभमेळ्यात करोडोच्या संख्येनं भाविक दाखल होत आहेत. अशात याचा सर्वाधिक ताण रेल्वे प्रशासनावर आला आहे.

काही दिवसांपूर्वी दिल्ली रेल्वे स्थानकावर चेंगराचेंगरीत अनेक प्रवाशांचा बळी गेला. मात्र त्यानंतरही भाविकांची गर्दी कमी होताना दिसत नाही. प्रयागराज येथे महाकुंभनिमित्त प्रवाशांच्या सोयीसाठी रेल्वे गाड्यांची संख्या वाढवली होती.

### नाशिक मार्गे धावणाऱ्या आठ गाड्या रद्द

- १) बलिया-दादर साप्ताहिक एक्सप्रेस २१ फेब्रुवारी
- २) दादर-गोरखपूर एक्सप्रेस - १८ ते २७ फेब्रुवारी
- ३) दादर-बलिया साप्ताहिक एक्सप्रेस - १८ ते २७ फेब्रुवारी
- ४) गोरखपूर - लोकमान्य टिळक टर्मिनस एक्सप्रेस - २१ फेब्रुवारी
- ५) लोकमान्य टिळक टर्मिनस - छपरा एक्सप्रेस - १८ ते २७ फेब्रुवारी
- ६) लोकमान्य टिळक टर्मिनस - गोरखपूर एक्सप्रेस - १८ ते २७ फेब्रुवारी
- ७) गोरखपूर - दादर एक्सप्रेस - २० फेब्रुवारी
- ८) छपरा - लोकमान्य टिळक टर्मिनस एक्सप्रेस - २० फेब्रुवारी

» Selected

## उरुळीकांचनमध्ये शासन आपल्या दारी

**उरुळी कांचन :** हवेली पंचायत समितीचे गटविकास अधिकारी भूषण जोशी यांच्या अध्यक्षतेखाली उरुळी कांचन येथे ग्रामपंचायत सभागृहात हवेली तालुक्यातील सर्व खाते प्रमुखांची व प्रतिनिधींची बैठक पार पडली. यामध्ये आमदार ज्ञानेश्वर कटके यांच्या मार्गदर्शनाखाली, हवेली तालुक्यातील सर्व गावांमधील सर्वसामान्य नागरिकांच्या महसूल, पुरवठा, आरोग्य, कृषी, वन विभाग, ग्रामविकास, पशुसंवर्धन, महिला व बालविकास आदी विभागांतर्गत असलेल्या अडी अडचणी सोडवण्यासाठी शासन आपल्या दारी हा उपक्रम गुरुवारी सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत जिजाऊ सभागृह या ठिकाणी राबविण्यात येणार आहे, अशी माहिती भूषण जोशी यांनी दिली. या संधीचा लाभ हवेली तालुक्यातील तमाम नागरिकांनी घ्यावा असे आवाहन हवेलीचे गटविकास अधिकारी भूषण जोशी यांनी केले आहे. याप्रसंगी सरपंच अमितबाबा कांचन, माजी सरपंच संतोष हरिभाऊ कांचन, राजेंद्र बबन कांचन मंडल अधिकारी सय्यद, तलाठी सुधीर जायभाय, ग्रामविकास अधिकारी प्रकाश गळवे आदींसह अनेक विभागांचे खाते प्रमुख व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## रानमळा येथे बिबट्याच्या हल्यात एक जखमी

**लोणी-धामणी :** रानमळा (ता. आंबेगाव ) येथे सोमवारी (दि. १७) साधारण नऊ ते साडेनऊ वाजण्याच्या सुमारास गणेश दत्तात्रय मुखेकर



या व्यक्तिवर बिबटयाने हल्ला करून त्यांना गंभीर जखमी केले. त्याच्यावर मंचर येथील उपजिल्हा रुणालयात उपचार सुरू आहेत, अशी माहिती या विभागाच्या वनपाल सोनल भालेराव यांनी दिली. या संदर्भात मिळालेली माहिती अशी की, सोमवारी गणेश दत्तात्रय मुखेकर (४७, कवठे येमाई, ता. शिरूर) हे आपल्या मुलाला आणण्यासाठी कवठे येमाई येथून आपल्या मित्रासमवेत लोणी या ठिकाणी चालले असताना, रानमळा परिसरात आले असता, रस्त्याच्या कडेला दबा धरून बसलेल्या बिबट्याने गणेश दत्तात्रय मुखेकर याच्या डाव्या पायावर हल्ला केला. यात दोन तीन ठिकाणी गंभीर जखमा झाल्या. मुखेकर यांच्या याच पायाचा तीन वर्षांपूर्वी अपघात झाला होता. ऑपरेशन झाले होते. या घटनेची माहिती मिळताच वनपाल सोनल भालेराव व गावडेवाडी येथील बिबट शीघ्र कृती दलाचे सदस्य यांनी घटनास्थळी भेट दिली व पहाणी केली. मुखेकर यांना पुढील उपचारासाठी मंचर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. तेथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. त्यांची तब्येत-प्रकृती ठिक असल्याचे वनपाल सोनल भालेराव यांनी सांगितले.

## बावडा येथील युवकांचे एमपीएससीत यश





**इंदापूर :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षेत बावडा (ता. इंदापूर ) येथील ३ युवक उत्तीर्ण झाले आहे. सदरची स्पर्धा सन २०२३ मध्ये झाली होती. या परीक्षेमध्ये यश संपादन केल्याने ऋतुज राजेंद्र कवडे देशमुख, समीर इब्राहिम मुकेरी, पुजा पांडुरंग सातपुते या तिघांची महाराष्ट्र शासनामध्ये महसूल सहाय्यक या पदी निवड झाली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी स्पर्धा परीक्षेत यश संपादन करीत असल्याने नागरिकांमधून आनंद व्यक्त केला जात आहे.

## डॉ. आंबेडकरांचा आदर्श घ्या



**रांजणी :** शालेय विद्यार्थ्यांनी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श डोळ्या समोर ठेऊन आपल्या धेय्या कडे वाटचाल करावी. यश नक्कीच तुमच्या ओंजळीत येईल, असे गौरोदगार महाराष्ट्र युगप्रवर्तक प्रतिष्ठाणचे संस्थापक अध्यक्ष गौतम खरात यांनी काढले. पेठ (ता. आंबेगाव) येथे सोमवारी महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाची अनु जाती व नवबौद्ध मुलांची निवासी शाळेत इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभात खरात बोलत होते. अध्यस्थानी मुख्याध्यापिका विमल खाडे, यावेळी पंचशील प्रतिष्ठाणचे अध्यक्ष संतोष देठे ,रमाकांत जाधव, राहुल टाव्हरे, जितेंद्र खोसे , गुरुनाथ कोयते, आदी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी युगप्रवर्तक प्रतिष्ठाण च्या वतीने एस एस सी च्या विद्यार्थ्यांना कंपास पेटी, पेन आणि गुलाबपुष्प देऊन सन्मानित केले.

# खेडमधील प्रशासक आजही कायम

## निवडणुकीचा बिगुल केव्हा वाजणार याचीच सामान्यांना प्रतिक्षा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**खेड :** स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार अधिक पारदर्शी आणि गतिमान व्हावा, यासाठी शासनाने जनतेतून निवडणूक घेऊन लोकप्रतिनिधी जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषदेत पाठविते. दर पाच वर्षांनी निवडणूक घेण्यामागचा मुख्य हेतू सत्तेचे विकेंद्रीकरण होता. मात्र डिसेंबर २०२१ मध्ये कार्यकाळ संपलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका (राजगुरूनगर, चाकण नगरारिषद सोडून यांचा कार्यकाल संपून पाच वर्षांपेक्षा अधिक काळ लोटला आहे) चार वर्षे उलटत असतानाही जाहीर झालेल्या नाही. त्यामुळे नगरपरिषद, जिल्हा परिषदेवर प्रशासकराज कायम असून निवडणुकीचा बिगुल कधी वाजणार असा सवाल उपस्थित केला जात आहे.

शहराच्या विकासासाठी स्थानिक स्वराज्य संस्था अर्थात नगरपरिषद महत्त्वाची दुवा मानली जाते. राजगुरूनगर, चाकण नगरपरिषदेतील पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ २०१९ च्या दरम्यानच संपला. तसेच आळंदी नगरपरिषद जिल्हा परिषद व पंचायत समिती पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ मार्च २०२१ मध्येच संपलेला आहे. त्यावेळी महाविकास आघाडी सरकार राज्यात विराजमान होते. करोना, पावसाळा आदी कारणांमुळे निवडणूक वेळेत घेणे शक्य नसल्याने नगरपालिका बरखास्त करून प्रशासक नेमण्यात आले. खेड तालुक्यातील तिनही नगरपरिषदांवर मुख्याधिकारी यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली, प्रशासक नेमलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक किमान सहा महिन्यांत होणे अपेक्षित आहे. मात्र प्रभाग रचना, वॉर्ड फॉरमेशन, आरक्षण आदी प्रक्रिया पूर्ण होऊनही निवडणुका जाहीर झाल्या नाही.

पालिकांच्या निवडणुका जाहीर होत नसतानाच राज्यात जून-जुलैदरम्यान मोठा राजकीय भूकंप झाला. शिवसेनेत मोठी बंडखोरी होऊन महाविकास आघाडीचे सरकार पायउतार झाले. शिवसेनेचे एकनाथ शिंदे राज्याचे मुख्यमंत्री तर भाजपचे देवेंद्र फडणवीस, राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार उपमुख्यमंत्री झाले होते; नव सरकार स्थापन होऊन अडीच वर्षांचा कालावधी पूर्ण होऊन लोकसभा व विधानसभेच्या निवडणुका झाल्या. मात्र अद्यापही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा बिगूल वाजला नसल्याने विकासकामे रखडली असून समस्यांचा डोंगर वाढतच असल्याने नागरिक हैराण झाले आहेत.

### इच्छुकांची धावपळ थांबली

● राज्यात नोव्हेंबर २०२४ मध्ये महायुतीचे सरकार स्थापन झाले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे, अजित पवार यांनी डिसेंबर २०२४ मध्ये स्वीकारून तीन महिने उलटले तरी अद्यापही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची घोषणा झालेली नाही. कारण जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषदांचा कार्यकाळ संपल्यानंतर इच्छुक उमेदवारांनी आपापल्या प्रभागांमध्ये जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली; मात्र अनेक वर्षे उलटत असतानाही प्रशासकराज कायम असल्याने इच्छुकांचीही धावपळ थांबली असून शहरांसह गावागावांत समस्यांचे डोंगर उभे राहत राहिले असून ते कधी सुटणार असा प्रश्न पुढे येत आहे.

## शहा ग्लोबल स्कुलमध्ये शिव जन्मोत्सव साजरा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** शहा ग्लोबल स्कूलमध्ये शिवजन्मोत्सव साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे निवेदन श्रुतिका खटावकर यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेच्या पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

कार्यक्रमाचे प्रमुख उपस्थिती मालती शहा, अंकिता शहा, वैशाली शहा, मुकुंद शहा, भरत शहा, अंगद शहा यांच्या हस्ते प्रतिमा पूजन झाले. त्यानंतर केर वर्गातील विद्यार्थ्यांनी पाळणा घेऊन शिवजन्मोत्सव साजरा केला आणि स्वराज्य शपथ सोहळा सादर केला.

नर्सरीतील विद्यार्थ्यांनी भाषण केले. प्ले ग्रुपच्या विद्यार्थ्यांनी आई व मुलाचे आतुर नाते कसे असावे याचे सादरीकरण केले. के१च्या विद्यार्थ्यांनी गीत सादर केले तसेच विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देऊन पालकांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली. शिवगर्जनेने अगदी जल्लोषात कार्यक्रमाची सांगता झाली.

# डॉ. आंबेडकर यांचा पुतळा उभारणार

## जिल्हाधिकारी कार्यालयाने दिली परवानगी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**जेजुरी :** महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीतील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरणावेळी हटविण्यात आला होता. नव्याने हा पुतळा उभारण्यासाठी जेजुरी पालिकेच्या वतीने परवानगी मागण्यात आली होती. जिल्हाधिकारी कार्यालयाने डॉ आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी परवानगी दिली आहे.

आळंदी ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्गाचे रुंदीकरणाचे काम सुरू असताना जेजुरी नगरपरिषदेच्या समोरील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा सात महिन्यांपूर्वी हटविण्यात आला होता. डॉ आंबेडकर चौकात हा पुतळा उभारण्याची मागणी आरपीआय व डॉ आंबेडकर अनुयायांनी केली होती. जेजुरी नगरपरिषदेच्या वतीने हा पुतळा व सुशोभीकरणासाठी जागा उपलब्ध करून दिली आहे. तसेच या पूर्णाकृती पुतळ्यासाठी शासनाकडे मागणीसाठी पाठपुरावा केला होता.

पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाने जेजुरी नगरपरिषदेच्या गट क्रमांक ११३ मधील जागेत डॉ आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी परवानगी दिली आहे. हा पुतळा उभारणी करण्यामुळे भविष्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवणार नाही याची जबाबदारी, तसेच देखभाल, मांगल्य, पावित्र्य राखण्याची जबाबदारी डॉ आंबेडकर पुतळा समितीची राहील आदी सूचना या पत्रात करण्यात आल्या आहेत.

डॉ आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा परवानगी बाबत सहकार्य केल्याबद्दल जेजुरी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले यांनी समिती व नागरिकांचे आभार मानले.

तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पुतळा उभारण्याबाबत मिळालेल्या परवानगीची प्रत समितीकडे सुपूर्द केली. या वेळी समितीचे पंकज धीवर,गौतम भालेराव,प्रशांत नाझरेकर,संदीप जगताप,दादा भालेराव,बाळासाहेब थेवूरकर उपस्थित होते.

## शरचंद्र पवार फार्मसी महाविद्यालयाच्या क्रिकेट संघाचे यश



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**ओतुर :** दिनांक १३ ते १५ फेब्रुवारी २०२५ दरम्यान प्रवरा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स कॉलेज ऑफ फार्मसी लोणी अहिल्यानगर या ठिकाणी झालेल्या द्वितीय राष्ट्र पातळीवरील फार्मा - कप - २०२५ स्पर्धेत श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री शरचंद्र पवार कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयातील मुलींच्या क्रिकेट संघाने १४ संघांमधून प्रथम क्रमांक पटकाविला. त्याचप्रमाणे मुलांच्या क्रिकेट संघाने ३६ संघांमधून तृतीय क्रमांक पटकाविले असून महाविद्यालयाच्या दृष्टीने ही अतिशय अभिमानास्पद बाब आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश दामा यांनी दिली.

मुलीच्या क्रिकेट संघाच्या संघनायका सारण्या यांच्या नेतृत्वात सृष्टी विश्वकर्मा, पूजा हांडे, वैशाली मोजाद, अनिशा पठारे , प्राजक्ता गडदे, अंजली वाघमारे, शितल जोशी, मीनाक्षी सोनवणे, गायत्री वाघ, सृष्टी गाढवे, एकता शिगवण या खेळाडूंनी अतिशय उत्तम कामगिरी केली. तृतीय क्रमांक पटकाविणाऱ्या मुलांच्या क्रिकेट संघाचे संघनायक सलमान शेत संधी यांच्या नेतृत्वात उज्वल नलावडे, अथर्व रेडकर, वेदांत गाडेकर, आदित्य चलवाड, तिलक जाधव, ओम थोरात, ओम कांबळे, अभिषेक यादव, अभिषेक नानगुडे, आशिष घावटे, मनीष पाटील, प्रणव राऊत, ब्रह्मचैतन्य तांबे, साहिल उंडे या खेळाडूंनी अतिशय उत्तम कामगिरी केली. दोन्ही संघांवर विजय अभिनंदनचा वर्षाव सर्व स्तरांतून होत असून संस्थेचे अध्यक्ष विशाल तांबे व संस्थेचे मानद सचिव वैभव तांबे यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा प्रदान केल्या आहेत.

## नागापूरच्या रोहन पोहकरची महसूल सहायकपदी नियुक्ती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणी :** नागापूर (ता. आंबेगाव ) येथील शेतकरी कुटुंबातील रोहन शिवशंकर पोहकर याची महसूल सहाय्यक पदी नियुक्ती झाली आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परिक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. यामध्ये नागापूर येथील शेतकरी कुटुंबातील रोहन शिवशंकर पोहकर याने चौथ्या प्रयत्नात यश मिळविले. त्याची महसूल सहाय्यक पदी नियुक्ती झाली. रोहनचे प्राथमिक शिक्षण नागापूर गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतच झाले.

त्यानंतर दहावीपर्यंतचे शिक्षण रांजणी येथे नरसिंह विद्यालयात झाले. नरसिंह विद्यालयात शिक्षण घेत असताना, त्याने खोखो खेळात चमक दाखवली. तो अनेक राज्यस्तरिय खो-खो स्पर्धा खेळला. महाविद्यालयीन शिक्षण शिक्षण मंचर येथील महात्मा गांधी विद्यालयात घेतल्यानंतर पुण्यातील एचव्ही देसाई महाविद्यालयात पदवी पर्यंतचे शिक्षण पुर्ण केले.

त्यानंतर २०२० च्या लॉकडाऊनच्या काळात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षेचा आभ्यास सुरू केला. दररोज सहा तास अभ्यास करून चौथ्या प्रयत्नात त्याने यश मिळवले. त्याची महसूल सहाय्यक पदी नियुक्ती झाली. रोहनच्या यशाबद्दल नागापूर गावातून वाजत गाजत त्याची भव्य मिरवणूक काढण्यात आली. वडील शिवशंकर पोहकर, आई कविता पोहकर यांनी त्याला पेढा भरविला.

## कौतुक सोहळा...

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**रांजणी** नागापूर येथिल रोहन पोहकर याची महसूल सहाय्यक पदी नियुक्ती झाल्याबद्दल भव्य मिरवणूक काढण्यात आली.

# एसटीचे चाक पायावरून गेल्याने महिला जखमी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अवसरी :** मंचर (ता. आंबेगाव) येथील एसटी बस स्थानकात एसटी बसमध्ये चढताना शांताबाई काशिनाथ राजगुरू (वय ७३, रा. अवसरी खुर्द, ता. आंबेगाव) या जेष्ठ महिलेच्या पायावरून एसटीचे चाक गेल्याने या महिलेला गंभीर दुखापत झालेली आहे.

त्यांच्यावर ठाणे येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याबाबत मंचर पोलिसांनी एसटी चालक अशोक बारकू भापकर (वय - ४४, रा. म्हसोबा राकागण, जि. अहिल्यानगर) यांच्यावर गुन्हा दाखल केला असल्याचे मंचर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत कंकाळ यांनी सांगितले.

याबाबत मंचर पोलिसांनी दिलेल्या आधिक माहितीनुसार ठाणे येथे मुलीकडे कार्यक्रमासाठी शांताबाई राजगुरु या रविवारी निघाल्या होत्या.

सकाळी मंचर बस स्थानकावर एसटीची वाट पहात त्या उभ्या होत्या. बस स्थानकावर एसटी बस आल्यानंतर शांताबाई यांनी एसटीला हात केला पण चालक अशोक भापकर यांनी एसटी थांबवली नाही, निष्काळजीपणे एसटी चालविली. त्यामुळे एसटीचे पुढील चाक शांताबाई यांच्या डाव्या पायावरून गेले.

त्यामुळे त्या गंभीर जखमी झाल्या. बस स्थानकावर उपस्थित प्रवाशांनी त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले.

याबाबत शांताबाई राजगुरू यांनी मंचर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. शांताबाई राजगुरू या वृद्ध तमाशा कलावंत असून धुणी-भांडी करून आपला उदरनिर्वाह करतात.

त्यांना पोटी मुलबाळ नसल्याने त्यांची आर्थिक परिस्थिती अतिशय गरिबीची आहे. एसटी महामंडळाने त्यांना मदत करावी व त्यांच्यावर मोफत आर्थिक उपचार करावेत. उपचाराचा आर्थिक भार सोसावा, अशी मागणी अवसरी खुर्द येथील श्री म्हाळसाकांत खंडोबा काठी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी व समस्त राजगुरू मंडळींनी केली आहे.

### मराठी वाङमय परिषद, बडोदा या संस्थेकडून गौरव

# डॉ नारायण टाक यांच्या 'कोलाज'ला पारितोषिक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**जेजुरी :** गुजरात राज्यातील वडोदरा येथे १९३१ मध्ये स्थापन झालेल्या मराठी वाङमय परिषद, बडोदा या संस्थेने अखिल भारतीय पातळीवर विविध साहित्यकृतींची स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत 'कोलाज' या लेखसंग्रहाला द्वितीय क्रमांक मिळाला. त्यानिमित्त कोलाजचे लेखक प्रा. डॉ. नारायण टाक यांचा परिषदेच्या अधिवेशनात डॉ. उदय निरगुडकर यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

मराठी वाङमय परिषद, बडोदा ही संस्था ज्येष्ठ साहित्यिक चिं. वि. जोशी यांच्या पुढाकाराने स्थापन झालेली संस्था आहे. संस्थेचे ७४ वे अधिवेशन नुकतेच पार पडले. अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी डॉ उदय निरगुडकर हे होते. वाङमय परिषद ही गुजरात राज्यात मराठी भाषेचे संवर्धन आणि विकासासाठी प्रयत्न करत असलेली महत्त्वाची संस्था असून, संस्थेच्या अधिवेशनाला ऐतिहासिक महत्त्व आहे. अधिवेशनाचे अध्यक्षपद भूषविणाऱ्या साहित्यिकांमध्ये न. ची. केळकर, प्र. के अत्रे, वि. दा. सावरकर, कवी अनिल, वसंत कानेटकर, कुसुमाग्रज, डॉ भालचंद्र नेमाडे, डॉ अरुणा ढेरे, विश्वास पाटील इत्यादी दिग्गज साहित्यिकांचा समावेश आहे.

परिषदेच्या वतीने दरवर्षी कथा संग्रह, कादंबरी, कविता संग्रह, ललित लेखसंग्रह यांची स्पर्धा आयोजित केली जाते. तसेच कथा व ललित लेखसंग्रह स्पर्धा आयोजित केली जाते. स्पर्धेचे स्वरूप अखिल भारतीय असते. स्पर्धेला संपूर्ण देशातील साहित्यिकांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळतो. तज्ज्ञ परीक्षकांच्याकडून उत्तम साहित्य कृतीची निवड केली जाते. डॉ टाक यांच्या 'कोलाज' या ललित लेखसंग्रहाला दुसरे पारितोषिक मिळाले तसेच त्यांच्या 'सरोवर' या लेखाला तृतीय पारितोषिक मिळाले. डॉ टाक यांचा कोलाज हा व्यक्तिचित्रण व जेजुरीवर आधारित लेखांचा संग्रह आहे. 'सरोवर' हा काश्मीरमध्ये केलेल्या प्रवास वर्णनावर आधारित लेख आहे.

#रा

# उजनीचे पाणी पुन्हा पेटणार?

## पुणे विरुद्ध सोलापूर असा वाद चिघळला, पिण्याच्या नावाखाली पाण्याचा गैरवापर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**लोणी देवकर :** रापुणे, सोलापूर व अहिल्यानगर या तीन जिल्ह्यांना "वरदायिनी "ठरलेले उजनी धरणातून भीमा नदी पात्रात पिण्यासाठी पाणी सोडण्यात आले आहे. सोलापूर महानगरपालिका, पंढरपूर, सांगोला, मंगळवेढा येथील नगरपालिका, तसेच ग्रामीण भागातील पाणीपुरवठा योजनांसाठी १६०० क्यूसेक पाण्याचा विसर्ग भीमा नदी पात्रात सोडण्यात आला आहे; मात्र पिण्याच्या पाण्याच्या नावाखाली उजनी धरणातून पाणी सोडले जात असल्याचा आरोप इंदापूर तालुक्यातील उजनीच्या पाणलोट लगतच्या भूमिहीन शेतकऱ्यांनी केला आहे.

उजनीच्या पाण्यावरून पुन्हा एकदा पुणे जिल्हा विरुद्ध सोलापूर जिल्हा असा रणकंद पेटण्याची शक्यता आहे. उजनी धरणाची निर्मिती जरी सोलापूर जिल्ह्यात असली तरी, संपूर्ण पाणलोट क्षेत्र मात्र इंदापूर तालुक्यात आहे. त्यामुळे पिण्याच्या नावाखाली उजनी धरणातून पाणी सोडून प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचा प्रताप सुरु असल्याची प्रतिक्रिया उजनी धरणग्रस्त बचाव कृती समितीचे अध्यक्ष अरविंद जगताप यांनी दिली. उजनीतील पाणीसाठा झपाट्याने कमी होऊ लागला आहे. त्यात उन्हाळा अधिकच कडक होत असल्याने इंदापूर तालुक्यातील उजनीतलगतचा शेतकरी हवालदिल झाला आहे.

> **३० जूनपर्यंतचा डेड वॉटर स्टॉक सोडून वरील पाणलोट क्षेत्रातील पाण्याचे समनियोजन झाले पाहिजे, अन्यथा उजनी काठावरील शेतकऱ्यांना हक्काच्या पाण्यापासून वंचित राहावे लागणार आहे . तरी लोकप्रतिनिधींनी केवळ मतदान मिळवण्यापुरते काम न करता उजनीच्या पाण्याचे ठोस नियोजन करावे.**
> **-अरविंद जगताप,** अध्यक्ष उजनी धरणग्रस्त बचाव कृती समिती

कुठल्याही धरणातून पिण्याच्या नावाखाली पाणी सोडले जात नाही. फक्त उजनी धरणातून हे पाणी सोडले जात आहे. पिण्यासाठी पाणी देण्यास इंदापूरकरांची हरकत नाही; परंतु सोलापूर महानगरपालिका, सांगोला, पंढरपूर, मंगळवेढा या नगरपालिकांना समांतर जलवाहिनी टाकून पाणी देण्यात यावी, अशी मागणी होती; ती जाणीवपूर्वक पूर्ण केली जात नाही . उजनी धरणाच्या निर्मिती वेळी इंदापूरकरांनी जमिनी दिल्या, ते भूमिहीन झाले. असे असताना आमच्या हक्काचे पाणी राखीव ठेवले जात नाही. तसेच पाण्याचे योग्य नियोजन करण्याची गरज आहे.

### लोकप्रतिनिधींनी आवाज उठवण्याची गरज

● उजनी धरणाच्या पाण्यावरती ज्या तालुक्यांची शेती अवलंबून आहे, अशा दौंड, इंदापूर, माढा, करमाळा, कर्जत, श्रीगोंदा या तालुक्यातील लोकप्रतिनिधींनी आवाज उठवण्याची गरज आहे; मात्र लोकप्रतिनिधी जाणीवपूर्वक याकडे दुर्लक्ष करत आहेत . उन्हाची तीव्रता वाढत असल्याने पाणी पातळीत घट होणार हे निश्चित आहे; परंतु सतत पिण्याच्या नावाखाली सोलापूरला भीमा नदीपात्रातून पाणी सोडले जात असल्याने नक्की समजायचे काय, हा प्रश्न आमच्यासमोर निर्माण झाल्याच्या प्रतिक्रिया अनेकांनी दिल्या.

✓ » Selected

## कोयता घेऊन दहशत माजवणारे तिघे जेरबंद




**शिक्रापूर :** शिरुर शहरात एका हॉटेल कामगाराला दुचाकीहून सोडण्यासाठी कोयत्याचा धाक दाखवून हॉटेल समोर जाऊन हॉटेल मॅनेजरला कोयता दाखवून मुंडके तोडण्याची धमकी देऊन दहशत माजवणाऱ्या तिघांना पोलिसांनी जेरबंद केले असून शाहिद गफुर शेख, सोनु उर्फ अश्पाक गफुर शेख व प्रदिप भाउसाहेब गायकवाड असे पोलिसांनी जेरबंद केलेल्या आरोपींची नावे आहे. शिरुर शहरातील पाबळ फाटा येथून शिवम हॉटेलचा हकिक खान हा दुचाकीहून जात असताना प्रदीप गायकवाड याने त्याला अडवून प्रीतमनगर येथे सोडण्यासाठी दबाव टाकला असताना, हकिक हा घाबरून शिवम हॉटेलकडे गेला. त्यानंतर शहीद शेख, सोनू उर्फ अशपाक शेख व प्रदीप गायकवाड यांनी कोयता घेऊन शिवीगाळ, दमदाटी करत हॉटेल कामगारांना धमकी देत हॉटेल मॅनेजर पवन बिच्चेवार याला कोयत्याने मुंडके तोडण्याची धमकी दिली. याबाबत हॉटेल चालक सुरेश शंकरराव भांगे (६१, रा. गुरुकुल सोसायटी, प्रितम प्रकाश नगर, शिरूर ता. शिरूर) यांनी शिरुर पोलिसात फिर्याद दिल्याने पोलिसांनी शाहिद गफुर शेख, सोनु उर्फ अश्पाक गफुर शेख व प्रदिप भाउसाहेब गायकवाड या तिघांवर भारतीय हत्यार कायदा कलम नुसार गुन्हे दाखल केले. पोलिसांनी सापळा रचून शिरुर शहरातील रेणुका माता मंदीर परिसरात शाहिद गफुर शेख, सोनु उर्फ अश्पाक गफुर शेख व प्रदिप भाउसाहेब गायकवाड (तिघे रा. प्रितम प्रकाश नगर शिरूर) यांना ताब्यात घेत त्यांच्या जवळील कोयता जप्त करुन अटक केली.

## वाहतूक नियंत्रक दिवे, झेब्रा क्रॉसिंग, स्पीड ब्रेकर बसवा

**जेजुरी :** आळंदी ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग हा मार्ग जेजुरी शहरातून गेला असून, तीर्थक्षेत्र असणाऱ्या जेजुरी नगरीत भाविक, नागरिक, शालेय मुले यांच्या सुरक्षिततेसाठी या रस्त्यावर वाहतूक नियंत्रक दिवे, झेब्रा क्रॉसिंग पट्टे तसेच रब्लिंग स्पीड ब्रेकर बसवण्यात यावेत, अशी मागणी जयमल्हार ज्येष्ठ नागरिक संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. आळंदी ते पंढरपूर हा सहा पदरी राष्ट्रीय महामार्ग जेजुरी शहरातून गेल्याने या मार्गावरून सुसाट वेगाने वाहने जात असतात. या मार्गावर शहरात कोठेही वाहतूक दिवे, झेब्रा क्रॉसिंग पट्टे, राबलिंग स्पीड ब्रेकर नसल्याने नागरिक, शालेय विद्यार्थी, भाविक, कामगार यांना जीव मुठीत घेवून रस्ता ओलांडावा लागतो. हा महामार्ग सुरू झाल्यापासून अनेक अपघात होवून जीवित हानी देखील झाली आहे. तीर्थक्षेत्र नगरी बरोबरच जेजुरी हे औद्योगिक क्षेत्र असल्याने जड वाहनांची वाहतूक मोठ्या प्रमाणात होत असते. या महामार्गावरील जेजुरी शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी वाहतूक सिग्नल, झेब्रा क्रॉसिंग पट्टे, राबलींग स्पीड ब्रेकर बसवावेत अशी मागणी जिल्हाधिकारी, तहसीलदार, जेजुरी नगर परिषदेकडे निवेदनाद्वारे केली असल्याचे संघटनेचे अध्यक्ष शामकाका पेशवे यांनी सांगितले.

## शिक्रापुरात पोलीस वाहनाच्या धडकेत इसम ठार

**शिक्रापूर :** शिक्रापूर ता. शिरुर येथील पुणे आहील्यानगर महामार्गालगत बजरंगवाडी येथे रस्ता ओलांडताना जालना राज्य राखीव पोलीस दलाच्या वाहनाची धडक बसून झालेल्या अपघातात जनक सुभाष माने या इसमाचा मृत्यू झाल्याची घटना घडली असून शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे जालना राज्य राखीव पोलीस दलातील गणेश रमेश साठेवाड या पोलिसावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिक्रापूर येथील पुणे आहील्यानगर महामार्गालगत बजरंगवाडी येथे जनक माने रस्ता ओलांडत असताना पुणे बाजूने अहिल्यानगरच्या दिशेने जालना राज्य राखीव पोलीस दलाची बस भरधाव वेगाने आली आणि तिची धडक जनक माने यांना बसून त्यात ते गंभीर जखमी झाले, दरम्यान पोलीस व नागरिकांनी सदर जखमीला उपचारासाठी जवळील रुग्णालयात दाखल केले असता त्यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. सदर अपघातात जनक सुभाष माने (४०, रा. बजरंगवाडी शिक्रापुर ता. शिरुर) यांचा मृत्यू झाला असून, याबाबत जीवन गणपतराव खोसे यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली. पोलिसांनी जालना राज्य राखीव पोलीस दलातील पोलीस कर्मचारी गणेश रमेश साठेवाड याचे विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## लग्नाच्या आमिषाने महिलेवर अत्याचार

**शिक्रापूर :** कारेगाव ता. शिरुर येथील एका महिलेची शिवाजी आंबोरे याच्यासोबत ओळख झाल्यानंतर शिवाजी याने महिलेशी जवळीक निर्माण करत महिलेला तिला लग्नाचे आमिष दाखवत तिच्यावर अत्याचार केला. या प्रकाराबाबत पिडीत महिलेने रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली असून, पोलिसांनी शिवाजी दत्तराव आंबोरे याचे विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### पिंपळे जगताप येथील सेवाधाम मतिमंद निवासी विद्यालयात

## विशेष विद्यार्थ्यांकडून शिवजयंती साजरी



पिंपळे जगताप ता. शिरुर येथील सेवाधाम मतिमंद निवासी विद्यालयात विशेष विद्यार्थ्यांनी साजरी केलेली शिवजयंती.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** पिंपळे जगताप ता. शिरुर येथील सेवाधाम मतिमंद निवासी विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात विशेष विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांसह मावळ्यांची वेशभुषा साकारून छत्रपतींना अभिवादन करत शिवजयंती साजरी केली.

पिंपळे जगताप येथील सेवाधाम मतिमंद निवासी विद्यालय येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त मुख्याध्यापक पवन कट्यारमल यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमात विद्यालयातील नवरतन चौधरी याने छत्रपती शिवाजी महाराज तर देवराज पवार याने छत्रपती संभाजी महाराज यांची आणि उत्कर्ष पारोदे, मानस बहीरट, संकेत दाभाडे, श्रावण खेडेकर, संचित कागणे, सौरव पांढरे व आदित्य दळवी यांनी मावळ्यांची वेशभुषा साकारली, दरम्यान मुख्याध्यापक पवन कट्यारमल यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करत उपस्थितांना शिवरायांबाबत माहिती दिली. यावेळी मानसशास्त्रज्ञ नृसिंह कुलकर्णी, अधिक्षिका भाग्यश्री चिलात्रे, सोनाली शिनगारे, शुभांगी पायमोडे यांसह आदी उपस्थित होते, सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोनाली शिनगारे यांनी केले तर प्रास्ताविक मानसशास्त्रज्ञ नृसिंह कुलकर्णी यांनी केले आणि शुभांगी पायमोडे यांनी आभार मानले.

## जेजुरी नगरपरिषदेने दिवसाआड पाणीपुरवठा करावा



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीत गेली तीन वर्षे पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे. नाझरे धरणात भरपूर पाणीसाठा असून किमान दिवसाआड जेजुरी शहराला पिण्याचे पाणी पुरवठा करावे अशी मागणी जयल्हार ज्येष्ठ नागरिक संघटनेच्या वतीने जेजुरी नगरपरिषद प्रशासनाकडे करण्यात आली आहे.

जेजुरीचा खंडोबा महाराष्ट्राचे कुलदैवत आहे. दररोज हजारो भाविक येथे देवदर्शनासाठी येत असतात. तसेच जेजुरीमध्ये कारखानदारी असल्याने मोठ्या संख्येने कामगार वर्ग येथे स्थायिक झाला आहे. जेजुरी शहराची लोकसंख्या पंचवीस हजारहून अधिक आहे. या सर्व बाबींचा विचार करता येथील नागरिक व भाविकांना पुरेसा पाणी पुरवठा होत नाही.

गेली दोन ते तीन वर्षे दुष्काळी परिस्थितीत आठ ते चार दिवसाआड पाणी पुरवठा केला जात होता. त्यामुळे पाणी टंचाईला नागरिकांना सामोरे जावे लागले होते.

या वर्षी नाझरे धरण भरले असून तातडीच्या मांडकी योजनेत ही भरपूर पाणी उपलब्ध आहे. असे असताना तीन दिवसातून एकदा पाणी पुरवठा केला जात असल्याने पाणी टंचाईची समस्या कायम आहे. ही समस्या लक्षात घेवून पालिकेने शहराला दिवसाआड पाणी पुरवठा करावा अशी मागणी संघटनेने केली आहे. याबाबत तहसीलदार यांना ही निवेदन देण्यात आले आहे

## आंबेगाव तालुक्यात होतेय जिवाची काहिली...

**रांजणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात गेली पंधरा दिवसांपासून उन्हाचा कडाका अतिशय वाढला आहे. दिवसभर कडाक्याचे ऊन व तर रात्री व पहाटे कडाक्याची थंडी सध्या पडत आहे. सध्याच्या उन्हाळ्याच्या दिवसातही घोड व मीना नद्यांच्या पात्रातून सकाळच्या प्रहारी वाफा निघत असल्याचे चित्र सध्या दिसत आहे. यामुळे नागरिक बेजार झाले आहेत. यंदा उन्हाळ्याची चाहूल सर्वत्र लवकरच सुरू झाली. गेल्या पंधरा दिवसांपासून उन्हाचा कडाका अतिशय वाढला आहे.सकाळी अकरा वाजल्यापासूनच प्रखर ऊन पडते. सायंकाळी पाच वाजेपर्यंत ऊन जाणवते. त्यानंतर रात्री सात नंतर थंड हवा सुरू होते. रात्रीच्या वेळी कडाक्याची थंडी पडते. पहाटे थंडीचा कडाका आधिक वाढतो.सकाळपर्यंत थंडी जाणवते. त्यामुळे नागरी त्रस्त झाले आहेत. दिवसा कडक उन्हाने, तर रात्री कडाक्याच्या थंडीने नागरिक बेजार झाले आहेत.



वळती (ता. आंबेगाव) येथील मीना नदीच्या पात्रात सकाळच्या वेळी निघत असलेल्या वाफा. (छाया : रोहीत खुडे)

### राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी शिबीर उत्साहात

## देहूत स्वच्छ भारत सुंदर भारतचा संदेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** येथील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व अजिंक्य डी वाय पाटील स्कूल ऑफ इंजीनियरिंग लोहगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी शिबिर श्री क्षेत्र देहूगाव येथे उत्साहात सामाजिक बांधिलकीतून विविध उपक्रमांचे आयोजनात पार पडले. स्वच्छ भारत सुंदर भारतचा संदेश गावकऱ्यांपर्यंत या शिबिरातून देण्यात आला.

या विशेष शिबिराचे उद्‌घाटन देहू देवस्थानचे अध्यक्ष हभप पुरुषोत्तम महाराज मोरे यांचे हस्ते करण्यात आले. याप्रसंगी देहू नगरपंचायत मुख्याधिकारी निवेदिता घार्गे, विश्वस्त श्री संत तुकाराम महाराज संस्थान, देहू नगरपंचायत पदाधिकारी तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. महाविद्यालयाच्या संचालिका डॉ कमलजीत कौर व प्राचार्य डॉ एफ बी सय्यद यांच्या मार्गदर्शनात शिबिराचे संयोजन रासेयो कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक दिलीप घुले यांनी केले.

रासेयो स्वयंसेवकांनी ग्रामस्थांना सोबत घेऊन वृक्षारोपण, प्राथमिक आरोग्य केंद्र स्वच्छता, तुकाराम महाराज संस्थान शिळा मंदिर तसेच गावातील सार्वजनिक परिसर स्वच्छ करून स्वच्छ भारत सुंदर भारत चा संदेश गावकऱ्यांपर्यंत पोहोचवला. स्वयंसेवकांनी जलसंवर्धन अभियानांतर्गत गावालगतच्या इंद्रायणी नदी घाट परिसर स्वच्छ करून तीर्थक्षेत्र विकास अभियानाचे महत्त्वपूर्ण काम केले. श्रम संस्कारा सोबतच स्वच्छता फेरी, पथनाट्य, सांस्कृतिक कार्यक्रम प्रस्तुत करून ग्रामस्थां पर्यंत स्वच्छतेची जनजागृती स्वयंसेवका मार्फत करण्यात आली. देहू नगरपंचायत नगराध्यक्ष पूजा दिवटे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एफ बी सय्यद, विभाग प्रमुख डॉ पंकज आगरकर, डॉ भाग्यश्री ढाकुलकर, डॉ नागेश शेळके आदींनी शिबिर सांगता प्रसंगी स्वयंसेवकांना मार्गदर्शन करून त्यांना पुढील वाटचालीस असेच समाज उपयोगी काम करण्यास शुभेच्छा दिल्या. शिबिर कालावधीत सोमनाथ आबा मसुगडे, उत्कर्ष पाटील, सनी पाटील, महेश गिरी, दिनेश नगरे, गायत्री पाटील, प्राध्यापिका अमृता मोरे, प्राध्यापिका जयश्री सूर्यवंशी, प्राध्यापिका श्रद्धा खंदारे यांचे सहकार्य लाभले. शिबिर कालावधीत विठ्ठल काळोखे यांचे व्यक्तिमत्व विकास, डॉ नाना शेजवळ यांचे डिजिटल साक्षरता, प्राध्यापक रोहित गुरव यांचे मैत्री व बाप, ह भ प पुरुषोत्तम महाराज मोरे यांचे युथ फॉर माय भारत, देहू प्राथमिक आरोग्य केंद्र वैद्यकीय अधिकारी डॉ यादव सर यांचे आरोग्य विषयक जनजागृती आदी




व्याख्याने आयोजित करण्यात आली. शिबिर यशस्वीतेसाठी रासेयो कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक दिलीप घुले, अजिंक्य डी वाय पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सर्व रासेयो स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

#रा

# गरमागरम पोडी इडली

इडली हा झटपट होणारा पदार्थ. आज घराघरात इडली बनते. सर्वसाधारणपणे इडली चटणी किंवा इडली सांबार खाल्लं जातं. पण एखाद्या दिवशी बदल म्हणून पोडी इडली बनवू शकता. हा सकाळच्या गडबडीत पटकन होणारा पदार्थ आहे.

**रसगंधा**

**साहित्य :** छोट्या आकाराच्या दहा इडल्या, दोन चमचे शेंगदाणे, दोन मोठे चमचे चणाडाळ, एक मोठा चमचा उडिद डाळ, दोन ते तीन सुक्या लाल मिर्च्या, दोन छोटे चमचे



तीळ, दोन छोटे चमचे किसलेलं सुकं खोबरं, अर्धा चमचा जीरं, कढीपत्त्याची सहा–सात पानं, चवीनुसार मीठ आणि तूप

**कृती :** एका कढईत दाणे, लाल मिरची, चणा डाळ, उडीद डाळ, तीळ, सुकं खोबरं, जीरं आणि कढीपत्त्याची पानं घालून मंद आचेवर भाजून घ्या. त्यानंतर गॅस बंद करा. हे पदार्थ थंड झाल्यावर मिक्सरमधून बारीक वाटून घ्या. वाटताना चवीनुसार मीठ घाला. तुमचा पोडी मसाला तयार आहे. आता कढईत थोडं तूप गरम करा. यात इडल्या घालून परतून घ्या. आता या इडलीवर पोडी मसाला भुरभुरा. चमच्याने नीट हलवून घ्या. पोडी इडली तयार आहे.

# घालमेल कशी थांबवू?

तीन वर्षांपूर्वी माझं लग्न झालं. माझा नवरा महिन्यातले २५ दिवस कामासाठी बाहेर असतो. यामुळे मला खूप एकटं वाटतं. आमच्यातला संवाद खूपच कमी झाला आहे. तो बाहेर गेल्यावर रोज फक्त १०–१५ मिनिटं बोलणं होतं. यामुळे माझी चिडचिड होते. पण त्याच्यावर कामाचा खूप ताण असल्यामुळे तक्रारींची भर पडू नये, असं वाटतं. मी काय करू?

**काय करू?**

– वैयक्तिक आणि व्यावसायिक आयुष्याचं संतुलन साधण्याची कला प्रत्येकाला जमायला हवी. पण अनेकदा असं संतुलन साधणं कठीण होतं आणि एकच बाजू वरचढ ठरते. पण नात्याला आकार देण्यासाठी एकमेकांसोबत चांगला वेळ घालवणंही गरजेचं आहे. तू पतीला समजून घेऊन परिस्थितीला योग्य पद्धतीने सामोरं जात आहेस. पण तुझी घालमेल पतीला सांगणंही गरजेचं आहे. तुझ्या भावना त्याच्यापर्यंत पोहोचल्याच नाही तर तो स्वत:मध्ये सुधारणा कशी करणार? प्रत्यक्ष बोलायला वेळ नसेल तर तू त्याला मेसेज कर, मेल पाठव. तो परतल्यावर लंच किंवा डिनरच्या निमित्ताने एखाद्या निवांत ठिकाणी जाऊन मोकळ्या गप्पा मारण्याचा बेतही ठरवू शकतेस. बघ, कोणता मार्ग प्रशस्त वाटतो ते...





# पगारवाढ हवी आहे?

नोकरी म्हटली की पगारवाढ आलीच. कर्मचाऱ्यांना त्यांच्या कौशल्यांनुसार, क्षमतेनुसार बढती दिली जाते. ठराविक काळानंतर पगारवाढही होते. पण २०१५ च्या एका सर्वेक्षणानुसार ५७ टक्के नोकरदार महिला पगारवाढीसाठी विचारणाच करत नाहीत. पगारवाढ मिळवण्यासाठी नेमकं काय करायला हवं याविषयी...

✻ कंपनीच्या प्रगतीत तुम्ही दिलेल्या योगदानाचा विचार करा. कामाचा दर्जा आणि प्रमाण यांचा ताळमेळ बसवताना अचूकता महत्त्वाची आहे हे लक्षात घ्या.

✻ स्वत:मधली कौशल्यं ओळखा. त्यांची यादी करा. तांत्रिकच नाही तर कामाशी संबंधित इतर कौशल्यंही महत्त्वाची ठरतात. तुमची समर्पक वृत्ती, वेळेत कामं संपवणं, कामाप्रतीची निष्ठा या गोष्टीही महत्त्वाच्या आहेत हे लक्षात ठेवा. आपलं पद, हाताखाली काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना दिलेलं प्रशिक्षण या बाबींचा विचार करा. पगारवाढीबाबत वाटाघाटी करताना आत्मविश्वास दिसू द्या.

**स्कील डेव्हलपमेंट**

✻ एक कर्मचारी म्हणून स्वत:चं मूल्य जाणून घ्या. पगारवाढीबाबत वरिष्ठांशी चर्चा करण्याआधी बाजारपेठेचा अभ्यास करा. तुमच्या पदावर असणाऱ्यांना किती पगार मिळतो हे जाणून घ्या. त्यानुसार वरिष्ठांशी बोला. आपल्याला किती पगारवाढ हवी याचा निश्चित आकडा आपल्याकडे असायला हवा. तसं नसेल तर आपल्याला वरिष्ठांनी दिलेली पगारवाढ मान्य करावी लागेल.

✻ वरिष्ठांशी वाटाघाटी करण्याआधी पूर्ण तयारी करा. अन्यथा, तुम्ही गोंधळून जाल.

✻ तुम्ही पगारवाढीसाठी वाटाघाटी करत आहात हे लक्षात ठेवा. वरिष्ठ आकडा कमी करण्याचा प्रयत्न करणार. कोणीही पहिल्याच प्रयत्नात भरपूर पगारवाढ देणार नाही. त्यामुळे सुरूवात मोठ्या आकड्याने करा. वाटाघाटींदरम्यान हा आकडा खाली येणार आहे हे लक्षात ठेवा.



**पत्रकार असणाऱ्या सोनल रोचानी यांना समाजासाठी काही तरी करायचं होतं. वंचित, दुर्बल घटकांना त्यांचे हक्क मिळवून द्यायचे होते. कामाच्या निमित्ताने फिरताना त्यांना समाजातल्या विविध घटकांमधली आर्थिक दरी दिसत होती. पण कामाची सुरूवात काही केल्या होत नव्हती. पण एका घटनेने त्यांचं आयुष्यच बदलून टाकलं आणि आदिवासी समाजातल्या महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले.**

# आर्थिक सक्षमीकरणाच्या दिशेने..

सोनल रोचानी यांना फक्त पत्रकारितेच्या क्षेत्रापुरतं मर्यादित रहायचं नव्हतं. पत्रकारितेच्या पलीकडे जाऊन समाजातल्या वंचित, दुर्बल घटकांना मदत करण्याची त्यांची इच्छा होती. सोनल सूरतमध्ये पत्रकार म्हणून कार्यरत होत्या. त्यांना कामानिमित्ताने बरंच हिंडावं लागायचं. या दरम्यान त्यांनी समाजातला विरोधाभास अनुभवला. पण हळहळ व्यक्त करण्याशिवाय त्या दुसरं काही करू शकत नव्हत्या. पण २००५ मधल्या एका घटनेने त्या खूप हादरल्या. या घटनेने त्यांच्या आयुष्याला कलाटणी दिली. त्या बातम्या मिळवण्यासाठी जिल्हा रुग्णालयात जायच्या. असंच एके दिवशी रुग्णालयात आलेल्या एका महिलेने त्यांच्याकडे मदत मागितली. सासरच्यांनी त्या गरोदर महिलेच्या अंगावर रॉकेल ओतलं होतं. पोटातल्या बाळाचं लिंग कळल्यामुळे ते तिला पेटवून देण्याच्या तयारीत होते. सोनल आणि इतरांनी या महिलेला मदत केली. पण महिला सक्षमीकरणासाठी आपण

**मानिनी**



आणखी काही तरी करायला हवं, याची जाणीव त्यांना झाली. ग्रामीण भागातल्या महिलांच्या परिस्थितीबाबत त्यांनी संशोधन केलं. मर्यादित स्रोतांमुळे या महिला मागे पडत असल्याचं त्यांच्या लक्षात आलं.

सोनल यांच्या कार्याचं बीज तिथेच रोवलं गेलं. मग जवळपास पाच वर्षांच्या प्रयत्नांनंतर नोकरी सोडून समाजकार्याकडे वळण्याचं धाडस सोनल यांनी दाखवलं. त्यांनी आदिवासी महिलांच्या सक्षमीकरणाच्या कामाला वाहून घ्यायचं ठरवलं. काही काळ जागतिक बँकेसोबत काम केलं. विविध सामाजिक कार्यांसाठी देण्यात येणाऱ्या निधीच्या वाटपाचा अभ्यास केला. जागरूकतेच्या अभावामुळे ग्रामीण भागातल्या लोकांना सरकारी योजनांचे लाभ मिळत नसल्याची बाब त्यांच्या लक्षात आली. ग्रामीण भागातल्या महिला आणि मुलांसाठी असणाऱ्या सरकारी योजनांचे लाभ त्यांना मिळवून देण्यासाठी सोनल यांनी २०११ मध्ये शक्ती फाउंडेशन या सेवाभावी संस्थेची स्थापना केली.

सामाजिक परिस्थिती जाणून घेण्यासाठी त्या संपूर्ण गुजरात राज्यात फिरल्या. त्यानंतर त्यांनी सुरत आणि तापी परिसरातल्या हलपाती आणि कोटद्वारा या आदिवासी समाजांसाठी काम करायचं ठरवलं. या समाजांमधले पुरुष दारूच्या आहारी गेले होते. त्यामुळे त्यांचं आयुष्य खूप कमी झालं होतं तर वनसंपदा कमी झाल्यामुळे कोटद्वारा समाजाचा बांबूपासून हस्तकलेच्या वस्तू घडवण्याचा पारंपरिक व्यवसाय धोक्यात आला होता. त्यामुळे या दोन्ही समाजांची स्थिती अत्यंत हलाखीची होती. सोनल आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी बरेच प्रयत्न केले. शिक्षण, आरोग्य, स्वच्छता अशा विविध क्षेत्रांमध्ये काम केलं. आज तब्बल आठ वर्षांनंतर शक्ती फाउंडेशनने ५५ गावांमधल्या जवळपास पाच हजार आदिवासी महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम केलं आहे. स्वत:चे व्यवसाय सुरू करण्यासाठी त्यांना संस्थेतर्फे प्रशिक्षण आणि मदत देण्यात आली आहे. आता त्याची गोड फळं चाखायला मिळत आहेत. आता संस्थेला आपलं कार्य राज्यभर पोहोचवायचं आहे. सोनल यांनी अनेक महिलांचं आयुष्य पूर्णपणे बदलून टाकलं आहे.

# फ्रीजमध्ये काय ठेऊ नये?

बाजारातून आणलेल्या फळं, भाज्या आपण थेट फ्रीजमध्ये ठेवतो. यासोबतच घरातले उरलेसुरले पदार्थही फ्रीजमध्येच जातात. मात्र काही पदार्थ फ्रीजमध्ये ठेवल्याने त्यांची गुणवत्ता, चव बिघडते. शिवाय असे पदार्थ आरोग्यासाठीही घातक ठरू शकतात. कोणते पदार्थ फ्रीजमध्ये ठेवणं अयोग्य ठरतं? जाणून घेऊ.

**हेल्थ टॉक**



✻ टोमॅटो फ्रीजमध्ये ठेऊ नयेत. त्यात पाणी कमी असल्यामुळे थंड वातावरणात ते लवकर खराब होतात. फ्रीजमधल्या टोमॅटोंचा रंगही बदलतो. अशा टोमॅटोंचं सेवन घातक ठरू शकतं.

✻ पाव, ब्रेड असे पदार्थ फ्रीजमध्ये ठेऊ नयेत. फ्रीजमध्ये ठेवल्यानंतर ब्रेड कोरडा पडतो. त्याची चव बदलते.

✻ फ्रीजमधल्या थंड वातावरणामुळे बटाट्यातल्या स्टार्चचं रुपांतर साखरेत होतं. यामुळे पोटाच्या समस्या निर्माण होतात.

✻ फ्रीजमधल्या मधात खडे तयार होतात. तसंच हे मध गोठून जातं. त्यामुळे मधाची बाटली सर्वसामान्य तापमानातच ठेवावी.

✻ थंडगार कलिंगड खूप छान लागतं. पण फ्रीजमध्ये ठेवल्यानंतर कलिंगडातले पोषक घटक नष्ट होतात.

✻ कॉफी फ्रीजमध्ये ठेऊ नये. यामुळे कॉफीचा ताजेपणा नष्ट होतो. कॉफी फ्रीजमधले विविध प्रकारचे गंध शोषून घेते. याचा आरोग्यावर परिणाम होतो.

✻ सोया सॉस, टोमॅटो केचप असे पदार्थ फ्रीजमध्ये ठेवण्याची गरज नसते.

✻ लिंबू, संत्र्यासारखी आंबट फळंही फ्रीजमध्ये खराब होतात. त्यांच्या सालांवर डाग पडतात आणि रसही आटतो.

### टाचांना भेगा आहेत?

**स्मार्ट टिप्स**

टाचांना भेगा पडणं ही अनेकींची समस्या असते. मात्र वेळीच लक्ष दिलं नाही तर ही समस्या गंभीर रुप धारण करते. टाचांच्या भेगांमुळे स्किन इंफेक्शनचा धोका संभवतो. मधुमेहींना हा धोका अधिक गांभीर्यानं जाणव–



तो. म्हणूनच यावर वेळीच उपाय करायला हवा. घरच्या घरी देखील टाचेच्या भेगांवर परिणामकारक उपाय होऊ शकतो. यासाठी बेकिंग सोडा आणि दूध हे मिश्रण वापरावं. दूध हे नैसर्गिक मॉइश्चरायझर आहे. दुधामुळे त्वचा मऊ मुलायम बनते. दुधाऐवजी मिल्क पावडरचाही वापर करता येतो. दोन कप दुधामध्ये एक चमचा बेकिंग पावडर मिसळावी आणि यात पाय बुडवून ठेवावेत. यामुळे पायाच्या भेगा कमी होतीलच त्याचप्रमाणे टॅनिंगही निघून जाईल.

### दरवळत रहा...

**लक्षात असावे**

डिओचा सुगंध दिवसभर टिकवून ठेवायचा असेल तर काही टिप्स फॉलो कराव्या लागतील. ओल्या अंगावर डिओ फवारल्याने त्याचा सुगंध फार काळ टिकत नाही. त्यामुळे आंघोळीनंतर लगेच डिओ फवारू नका. अंग कोरडं करून मगच वापरा.



ङ्गशेक बीफोर युजफ या सूचनेचं पालन करा. यामुळे डिओतले सर्व घटक एकजीव होऊन चांगल्या प्रकारे काम करतात आणि शरीराची जळजळ होत नाही. बाटली शरीरापासून १५ सेंटीमीटर लांब ठेऊन डिओ फवारा. डिओ कपड्यांवर फवारू नका.

### अशी चमकवा काळी भांडी

**किचन टिप्स**

सततच्या वापरामुळे कढई आणि भांडी काळी पडतात. पदार्थ करपल्यामुळेही भांड्यांचा तळ काळपट दिसू लागतो. या काळ्या भांड्यांचा वापर नकोसा वाटतो. मात्र काही



उपायांद्वारे तुम्ही भांड्यांचा काळपटपणा सहज दूर करू शकता. काळपट कढईत एक चमचा बेकिंग सोडा घालून त्यात दोन चमचे लिंबाचा रस आणि दोन कप पाणी घाला. स्टीलच्या स्क्रबरने कढई घासून स्वच्छ करा. काळपटपणा निघून जाईल. टोमॅटोच्या रसानेही काळपट भांडी स्वच्छ होतील. काळ्या पडलेल्या भांड्यांमध्ये टोमॅटोचा रस आणि पाणी घालून उकळून घ्या. यानंतर स्क्रबरने घासून स्वच्छ करा.

# रोज खा भात



भारतामध्ये विविध खाद्यसंस्कृती अस्तित्वात असल्या तरी भात हा त्यातील समान धागा आहे. भारताच्या बहुतेक सर्व भागांमध्ये तांदळापासून बनवलेल्या विविध पाककृती आहाराचा बहुतांश भाग व्यापतात. एकंदरच भात हे भारतीयांचं आवडीचं अन्न आहे असं म्हणायला हवं. एकीकडे भातामुळे वजन वाढतं, जाडी वाढते, रक्तातील शर्करा वाढते असे समज भीती वाढवत राहतात. पण हे गैरसमजच असल्याचं तज्ज्ञ सांगतात. तांदळाच्या विविध जातींमध्ये व्हिटॅमिन्स आणि मिनरल्सचा उत्तम स्त्रोत असतो. तांदळामध्ये व्हिटॅमिन डी, कॅल्शियम, फायबर, थायमीन, लोह आदी आवश्यक घटकांची उत्तम मात्रा असते. म्हणूनच हे लाभ मिळवण्यासाठी दररोजच्या आहारात भात असावा.

**डाएट मंत्रा**

पोट खराब असल्यास, जुलाब, उलट्या होत असल्यास तांदूळ आणि मुगाची डाळ एकत्र करुन तयार केलेली खिचडी खावी. ही खिचडी पचायला हलकी असते. त्याचप्रमाणे तांदळातील पौष्टिक घटकांमुळे पचनक्रिया सुरळीत होण्यास मदत होते.

✻ व्हाईट राईसऐवजी ब्राऊन राईसला प्राधान्य द्यावं. हा तांदूळ मधूमेहींसाठी विशेष उपकारक ठरतो. मात्र अस्थमा असणाऱ्यांनी हा तांदूळ वापरू नये. कारण या तांदळाची प्रकृती थंड आहे. या तांदळाचा भात खाल्लयास दम्याचा त्रास वाढू शकतो.

✻ दररोज भात खाल्ल्याने शरीराची कार्बोहाईड्रेटची गरज भागते. या घटकामुळे मेंदूचे कार्य सुरळीत रहाते. भातामुळे शरीराची कार्यक्षमताही टिकून राहाते.

✻ उच्च रक्तदाबाचा त्रास असणाऱ्या महिलांनी रोजच्या आहारात एक वाटी भात ठेवायलाच हवा. तांदळामध्ये सोडियमची मात्रा नसते. त्यामुळे हृदयविकाराचा धोका दूर रहातो.

✻ तांदळामध्ये नाममात्र स्वरूपात कोलेस्टेरॉल असतं. तुम्ही कोलेस्टेरॉल फ्री राईसही वापरू शकता. यामुळे जाडी वाढण्याचा धोका संपतो.

✻ ब्राऊन राईसमध्ये शरीरात विरघळणाऱ्या फायबरची पर्याप्त मात्रा असते. ही बाब कॅन्सरचा धोका दूर ठेवण्यास पूरक ठरते.

✻ भाताची पेजही लाभकारक आहे. इतकंच नव्हे तर, तांदूळ शिजवलेल्या पाण्याने चेहरा धुतल्यास त्वचारोग दूर होतात. त्याप्रमाणे सुरकुत्यांपासून मुक्ती मिळते.

✻ दररोजच्या आहारात भात असेल तर अल्झायमरचा धोका टळतो असं तज्ज्ञ सांगतात.

# जपा केसांचे आरोग्य

थंडीत केसांची विशेष काळजी घ्यावी लागते. थंड वातावरण केस कोरडे होणं, त्वचा खाजणं, कोंड्याची समस्या वाढणं आदी त्रास संभवतो. म्हणूनच या दिवसात आहारात काही महत्त्वपूर्ण घटकांचा समावेश करुन केसांचं आरोग्य अबाधित राखण्याचा प्रयत्न करायला हवा. थंडीत केसांच्या समस्या वाढतात हा अनेकींचा अनुभव असेल. म्हणूनच या दिवसांत केसांकडे विशेष लक्ष द्यायला हवं. केसगळती पर्यायाने सौंदर्याच्या हानी रोखायची असल्यास काही टिप्स लक्षात घ्यायला हव्या.



✻ केसांना प्रथिनं अत्यावश्यक असतात. ती पुरेशा प्रमाणात मिळाली नाहीत तर लोहाची कमतरता निर्माण होऊन केस गळू लागतात. म्हणून आहारात कडधान्ये, डाळी, मसूर, सोयाबीन, वाटाणे यांसारखे पदार्थ असावेत.

✻ दही, दूध, चीज यांचं पुरेसं प्रमाण असेल तर योग्य प्रमाणात कॅल्शियम आणि ड जीवनसत्त्व मिळून केसांची मुळं पक्की होतात.

✻ फळं आणि भाज्या, हिरव्या पालेभाज्या, पिवळ्या आणि नारिंगी रंगांची फळं यांमधून अ तसेच क जीवनसत्त्वं मिळून टाळूला तेलनिर्मिती करण्यास मदत होते.

✻ मीठ आणि साखर अति प्रमाणात खाल्लं जात असेल तर डोक्यावरची त्वचा लाल होऊन खाज सुटते. कोंडा वाढतो. म्हणून हे पदार्थ टाळले पाहिजेत.

✻ रोज थोडे काजू खाल्ल्याने जस्त मिळतं आणि त्यामुळे केस तेजस्वी दिसतात.

✻ गाजर, रताळी, अक्रोड, बदाम यांचा आहारातील समावेशही केसांच्या वाढीला उपयुक्त ठरतो.

# चलती रंगीबेरंगी मस्काराची

डोळ्यांचं सौंदर्य खुलवण्यासाठी काजळ, लायनर, आयशॅडो, मस्कारा यांचा वापर होतो. बोल्ड लूकसाठी रंगीबेरंगी मस्कारा ट्राय करता येतो. डोळ्यांच्या रंगानुसार त्याची निवड करा.

**ब्युटी टॉक**

✻ काळ्यापेक्षा काही वेगळं ट्राय करायचं असेल तर ब्राउन मस्कारा लावा. ब्राउन मस्कारा तुम्हाला नॅचरल लूक देतो. हा मस्कारा पार्टी किंवा समारंभाला जाताना लावता येईल. ऑफिसमध्येही तुम्ही तो ट्राय करू शकता. ब्राउन रंगाचे डोळे असतील तर हा मस्कारा ट्राय करा. ✻ हिरवट रंगाचे डोळे असणाऱ्यांनी निळ्या रंगाचा मस्कारा लावायला हरकत नाही. निळ्या रंगातल्या विविध शेड्स ट्राय करता येतील. निळा रंग रात्रीपेक्षा सकाळी उठून दिसतो. हटके लूकसाठी गोल्डन मस्कारा ट्राय करा. ✻ डार्क ब्राउन रंगाच्या डोळ्यांसाठी मस्काराच्या हिरव्या शेड ट्राय करा.

✻ डोळ्यांचा आकार मोठा भासवायचा असेल तर पर्पल मस्कारा लावा. सावळ्या वर्णाच्या महिलांवर पर्पल तर गोऱ्या वर्णाच्या महिलांवर व्हायोलेट शेड उठून दिसेल.





## क्रिकेटचा महाकुंभ

# अमृता पुजारी आणि विजय चौधरीचे वर्चस्व

## नमो कुस्ती महाकुंभ २ अंतर्गत आयोजित देवाभाऊ केसरी आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**पुणे :** नमो कुस्ती महाकुंभ २ अंतर्गत आयोजित देवाभाऊ केसरी आंतरराष्ट्रीय कुस्ती दंगलमध्ये महिला महाराष्ट्र केसरी अमृता पुजारी आणि ट्रिपल महाराष्ट्र केसरी विजय चौधरीसह सर्वच भारतीय पैलवानांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील परदेशी पैलवानांना धूळ चारत आपले वर्चस्व दाखवून दिले.

नमो कुस्ती महाकुंभात देवाभाऊ केसरीच्या निमित्ताने आयोजित आंतरराष्ट्रीय दंगलमध्ये महाराष्ट्र केसरी विजेत्यांनी जगभरातील ९ देशांमधून आलेल्या नामवंत पैलवानांना पराभूत करत कुस्तीच्या मैदानी परंपरेचा अभिमान वाढवला. स्पर्धेची सुरुवात व शेवट महिलांच्या सन्मानार्थ महिला कुस्ती ने पहिल्यां करण्यात आली.

कुस्ती बघण्यासाठी पन्नास हजारांपेक्षा अधिक कुस्तीप्रेमींचा जनसागर आला होता. महाराष्ट्र केसरी विजेत्या अमृता पुजारीने रोमानियाच्या ऑलिम्पियन कॅटालिना क्सेन्टने हिच्यावर वर्चस्व गाजवत विजय नोंदविला. शेवटच्या कुस्तीमध्ये अमृताने उत्कृष्ट डावपेच आणि चपळाईने गुण मिळवत आपला पराक्रम सिद्ध केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते विश्वविजेता व ट्रिपल महाराष्ट्र केसरी विजय चौधरीला सन्मानित करण्यात आले. तसेच सर्व विजेत्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जलसंपदा मंत्री गिरीष महाजन यांच्या हस्ते मानाची गदा देऊन गौरविण्यात आले.

जामनेर नगरीत झालेल्या या दंगलीत विजय चौधरीने दबदबा दाखवताना आशियाई विजेता उझबेकिस्तानच्या सुक्सरोब जॉनला केवळ दोन मिनिटांत चीतपट करत प्रेक्षकांची मने जिंकली. पहिली महिला महाराष्ट्र केसरी प्रतीक्षा बांगडीने फ्रेंच च्या वर्ल्ड चॅम्पियन अंजलीक गोन्झालेझ हिच्यावर सहज विजय मिळवला. तसेच, महाराष्ट्र केसरी विजेती सोनाली मंडलिक हिने एस्टोनियाच्या मार्टा पाजूला हिला पराभूत करून प्रथम गुण घेत प्रभावी विजय मिळवला. महाराष्ट्र केसरी सिकंदर शेखने युरोपियन चॅम्पियन मोल्दोवाच्या घेओघे एरहाणला चितपट करत आपली ताकद सिद्ध केली. तसेच, महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज पाटीलने जॉर्जियाच्या वर्ल्ड चॅम्पियन इमामुकवर विजय मिळवत भारतीय कुस्तीतील स्वतःचे स्थान भक्कम केले. उप-महाराष्ट्र केसरी महेंद्र गायकवाडने रोमानियाच्या युरोपियन चॅम्पियन फ्लोरिन ट्रिपोन याला पराभूत करत उत्कृष्ट कामगिरी बजावली. डबल महाराष्ट्र केसरी शिवराज राक्षेने वर्ल्ड चॅम्पियन गुलहिर्मो लिमाला सहज चितपट केले. महाराष्ट्र चॅम्पियन बाळू बोडके आणि मुन्ना झुंजुर्के यांनी अनुक्रमे हरियाणाच्या राष्ट्रीय विजेत्या मनजीत मेला व दिल्लीच्या हरिओमी ट्रॅक्टर यांना पराभूत करून आपली ताकद दाखवली.

### कुस्तीत महाराष्ट्राचा दबदबा - मुख्यमंत्री

- 'जागतिक पटलावर महाराष्ट्राच्या खेळाडूंनी आपली छाप पाडली आहे, ही अभिमानास्पद बाब आहे,' असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नमूद केले. त्यांनी ऑलिम्पिक, कॉमनवेल्थ व एशियन गेम्समध्ये भारतीय खेळाडूंच्या कामगिरीचे कौतुक केले. 'मागील काही काळात मॅटवरील कुस्तीला अधिक प्राधान्य मिळाले होते, मात्र आता मातीवरील कुस्तीने दमदार पुनरागमन केले आहे. कुस्तीच्या माध्यमातून भारताला पहिले ऑलिम्पिक पदक मिळवून देणारे खाशाबा जाधव होते. आज विजय चौधरी, सोनाली मंडलिक यांसारखे खेळाडू परदेशी प्रतिस्पर्ध्यांवर मात करत आहेत,' असे त्यांनी सांगितले.
- या कुस्तीदंगलमध्ये आयोजन राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षाताई खडसे, खासदार स्मिताताई वाघ, माझी मंत्री आ. अनिल पाटील, आमदार सर्वश्री सुरेश भोळे यांच्यासह कुस्तीगीर संघटनेचे रामदास तडस, जामनेरच्या माजी नगराध्यक्ष साधनाताई महाजन, कुस्तीगीर संघटनेचे पदाधिकारी, विविध देशांतून आलेले कुस्तीपटू आणि ५० हजारपेक्षा अधिक कुस्तीप्रेमींनी उपस्थिती लावला.

## चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मधील पहिलं शतक!



**कराची :** चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेतील उद्घाटन सामन्यात न्यूझीलंडने पाकिस्तानला विजयासाठी तगडे आव्हान दिले आहे. प्रथम फलंदाजी करणाऱ्या न्यूझीलंडच्या दोन फलंदाजांनी सामन्यात शकत ठोकले. न्यूझीलंडचे आघाडी फलंदाज स्वस्तात बाद होत असताना सलामीवीर विल यंगने शतकी खेळी केली. तर त्याला साथ देणाऱ्या टॉम लॅथमनेही दणदणीत शतक ठोकले. तर न्यूझीलंडने डावात ३२० धावा उभारत पाकिस्तानला विजयासाठी ३२१ धावांचे आव्हान दिले. कराची मैदानावर पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. ७.३ व्या षटकात अब्रार अहमदने पाकिस्तानला पहिली विकेट मिळवून दिली. सलामीवीर डेव्हॉन कॉन्वे अवघ्या १० धावांवर बाद झाला. त्यानंतर लगेचच माजी कर्णधार केन विल्यमसन अवघ्या एका धावेवर माघारी परतला. ७३ धावांवर न्यूझीलंडला तिसरा धक्का बसला. तिरंगी मालिकेत चांगली कामगिरी केलेला डॅरी मिचेलही १० धावांवर बाद झाला. आघाडीचे फलंदाज स्वस्तात बाद होत असताना सलामीवीर विल यंग मात्र मैदानावर टीकून राहिला. विल संथ खेळी करत धावसंख्या वाढवत राहिला. त्याला टॉम लॅथमची चांगली साथ मिळाली. विल यंगने १२ चौकार व १ षटकाराच्या मदतीने ११३ चेंडूत १०७ धावांची शतकी खेळी केली व चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेत पहिले शतक झळकावले.

## सोलापूरच्या आनंद शेलारला मिळालं आंतरराष्ट्रीय प्रशिक्षकपद



**सोलापुर :** उत्कृष्ट क्रिकेट खेळाडू व जिल्हा क्रिकेट संघातून सोलापूर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केलेल्या बार्शीचा आनंद शेलारची 'इंटरनॅशनल मास्टर्स लीग' स्पर्धेसाठी वेस्ट इंडिज मास्टर्स संघाचा प्रशिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. क्रिकेट जगतातील महान खेळाडू या स्पर्धेत सहभागी होणार असून ब्रायन लारा, ख्रिस गेल, सचिन तेंडुलकर, युवराज सिंग, जॅक्वेस कॅलीस, शेन वॉटसन यांसारख्या दिग्गज खेळाडूंच्या नेतृत्वाखाली विविध संघ खेळणार आहेत. क्रिकेट सोडून आनंदने धाडसाने प्रशिक्षणाचा निर्णय घेतला. प्रशिक्षकपद सार्थ करण्यासाठी रात्रंदिवस अपार मेहनत करून यश मिळवले. त्यानंतर मिळालेल्या प्रत्येक संधीचे सोने करत स्वतःची दखल घेण्यास भाग पाडले. उच्च दर्जाच्या गुणवत्तापूर्ण दिलेल्या प्रशिक्षणाच्या जोरावर आनंदने मिळवलेल्या यशाची दखल घेतली गेली नसती तरच नवल. या सर्व बाबींमुळेच आंतरराष्ट्रीय खेळाडू ब्रायन लारा, ख्रिस गेल, नरसिंग देवनरीन,ब्रायन लारा, ख्रिस गेल व आनंद शेलार पारस म्हाम्ब्रे यांच्या नजरेने आनंद यांच्यातील गुणवत्ता ओळखून त्यांनी प्रशिक्षक म्हणून त्यांची शिफारस केली. महाराष्ट्रातील विशेष म्हणजे सोलापुरातील प्रशिक्षकांना आंतरराष्ट्रीय स्तरावर संधी मिळणे ही मोठी प्रतिष्ठेची गोष्ट आहे. त्यांच्या यशाबद्दल क्रिकेट वर्तुळातून त्यांचे कौतुक होत आहे. आनंद यांनी अमेरिकेतील लेव्हल १, लेव्हल २, केआयओसी अमेरिका त्यानंतर केपटाऊन येथे साउथ आफ्रिकेच्या गॅरी कर्स्टन यांच्या लेव्हल १, लेव्हल २, लेव्हल ३ अशा प्रशिक्षण परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे. आनंद स्वतः एक चांगला क्रिकेट खेळाडू.



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पुणे शहर महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त सुनिता चव्हाण संघटक सचिव पुणे शहर महिला यांचा सत्कार दत्ताभाऊ सागरे उपाध्यक्ष पुणे शहर यांच्या हस्ते करण्यात आला.

# भारताच्या आर्यन शहाचे आव्हान संपुष्टात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**पुणे :** महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना(एमएसएलटीए) यांच्या वतीने व क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र सरकार, पीएमसी, पीसीएमसी आणि पीएमडीटीए यांच्या संलग्नतेने आयोजित पीएमआरडीए पुरस्कृत महा ओपन एटीपी चॅलेंजर १०० पुरुष टेनिस स्पर्धेत मुख्य ड्रॉमध्ये भारताच्या आर्यन शहा याला पराभवाचा सामना करावा लागल्याने त्यांचे आव्हान संपुष्टात आले.

श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे बालेवाडी येथील टेनिस संकुलात सुरू असलेल्या या स्पर्धेत मुख्य ड्रॉमध्ये पहिल्या फेरीत सहाव्या मानांकित अमेरिकेच्या ब्रँडन होल्ट याने वाईल्ड कार्ड द्वारे प्रवेश केलेल्या भारताच्या आर्यन शहाचा ६-२, ६-२ असा सहज पराभव केला. हा सामना १ तास १२मिनिटे चालला. सामन्यात सुरुवातीपासूनच होल्ट याने जोरदार खेळ केला. पहिल्याच गेममध्ये आर्यनची सर्व्हिस भेदली व स्वतःची सर्व्हिस राखत आघाडी घेतली. पिछाडीवर असलेल्या आर्यनला सामन्यात सूर गवसला नाही. होल्टने आर्यनची पुन्हा तिसऱ्या गेममध्ये सर्व्हिस ब्रेक केली व हा सेट ६-२ असा जिंकून आघाडी मिळवली. दुसऱ्या सेटमध्येदेखील पहिल्या सेटची पुनरावृत्ती पाहायला मिळाली. या सेटमध्ये होल्टने आर्यनची पहिल्या, तिसऱ्या गेममध्ये सर्व्हिस ब्रेक केली व हा सेट ६-२ असा जिंकून विजय मिळवला.

उझबेकिस्तानच्या खुमोयुन सुलतानोव याने तिसऱ्या मानांकित ऑस्ट्रेलियाच्या ट्रिस्टन स्कूलकेटचा ६-३, ४-६, ६-३ असा संघर्षपूर्ण पराभव करून सनसनाटी निकाल नोंदवला. ऑस्ट्रियाच्या

ज्युरिज रोडिओनोव याने सातव्या मानांकित जपानच्या शिंतारो मोचिझुकीचा टायब्रेकमध्ये ६-७(५), ६-१, ६-२ असा पराभव करून अनपेक्षित निकालाची नोंद केली. पात्रता फेरीतून मुख्य फेरीत प्रवेश केलेल्या जपानच्या मासामिची इमामुरा याने ग्रेट ब्रिटनच्या जे क्लार्कचा ७-६(२), ६-२ असा तर, क्वालिफायर बेल्जीयमच्या मायकेल गीर्ट्स यःने चेक प्रजासत्ताकच्या मारेक गेंजेलचा ४-६, ६-१, ७-६(४) असा पराभव करून दुसरी फेरी गाठली. पाचव्या मानांकित फ्रान्सच्या उगो ब्लँचेटने फ्रांसच्या एन्झो काऊकाडचे आव्हान ३-६, ६-२, ६-३ असे मोडीत काढले. क्वालिफायर रशियाच्या इलिया सिमाकिनने लकी लुझर ठरलेल्या ऑस्ट्रेलियाच्या ब्लेक एलिसला ६-४, ६-२ असे नमविले. फ्रांच्या किरियन जॅकेट याने जपानच्या रिओ नोगुचीवर ६-१, ६-३ असा विजय मिळवला.

## मुंबई इंडियन्सने विजयाचे खाते उघडत घडवला इतिहास!

**वडोदरा :** मुंबई इंडियन्सने गुजरात जायंट्सवर ५ विकेट्सनी विजय मिळवत डब्ल्यूपीएल २०२५ मधील विजयाचे खाते उघडले. या सामन्यात मुंबई इंडियन्स नाणेफेक जिंकून गुजरात जायंट्सला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले होते. यानंतर मुंबई इंडियन्स गुजरात १२० धावांवर गारद केले. गुजरातसाठी हरलीने सर्वाधिक धावांचे योगदान दिले. तसेच मुंबईकडून हेली मॅथ्यूजने सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या. मुंबईने १६.१ षटकांत ५ गडी गमावून नॅट सिव्हर ब्रंटच्या अर्धशतकाच्या जोरावर १२२ धावा करत विजयावर शिक्कामोर्तब केला. यासह मुंबईने डब्ल्यूपीएलमधील इतिहासातील गुजरातविरुद्ध सलग पाचवा विजय नोंदवला आहे. हा सामना वडोदऱ्यातील कोटाम्बी स्टेडियमवर खेळला गेला, ज्यामध्ये मुंबईने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मुंबईचा निर्णय योग्य ठरला. कारण गुजरातने ४३ धावा केल्या तोपर्यंत त्यांचा अर्धा संघ पॅव्हेलियनमध्ये परतला होता. बेथ मूनी, लॉरा वोल्वार्ड आणि ॲशले गार्डनर सारख्या मोठ्या खेळाडू मुंबईच्या घातक गोलंदाजीला बळी पडल्या. एकेकाळी गुजरातने ७९ धावांवर ७ विकेट गमावल्या होत्या. येथून, हरलीन देओल आणि तनुजा कंवर यांनी मिळून गुजरातचा स्कोअर १०० च्या पुढे नेला. मुंबई इंडियन्सच्या हेली मॅथ्यूजने या हंगामात पहिल्यांदाच पर्पल कॅपवर दावा केला आहे. मॅथ्यूजने डब्ल्यूपीएल २०२५ च्या दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या तिच्या पहिल्या सामन्यात २ विकेट्स घेतल्या होत्या. आता तिने गुजरात जायंट्सविरुद्ध ३ विकेट्स घेत पर्पल कॅपवर दावा आहे. तिने या हंगामात आतापर्यंत ५ विकेट्स घेतल्या आहेत आणि सर्वाधिक विकेट्स घेण्याच्या बाबतीत रेणुका ठाकूरची बरोबरी केली आहे.

## स्थाव्य सिद्धार्थ, देव मल्लू, अन्या हळदणकर, अन्विता एम, प्रत्यशा दलाई, ईशान मुलांगे यांची आगेकूच!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**पुणे :** पुण्यातील लोकप्रिय युवा सामाजिक कार्यकर्ते आणि माजी नगरसेवक सनी विनायक निम्हण यांच्या वाढदिवसानिमित्त सोमेश्वर फाउंडेशनच्या वतीने "सुपर सनी विक" या क्रीडा महोत्स वा अंतर्गत आयोजित सोमेश्वर करंडक बॅडमिंटन स्पर्धेत स्थाव्य सिद्धार्थ, देव मल्लू, अन्या हळदणकर, अन्विता एम, प्रत्यशा दलाई, ईशान मुलांगे, साईश बी, चैतन्य सक्ते यांनी आपापल्या गटातील प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला.

द लाईफ स्पोर्ट्स, सोमेश्वरवाडी येथील बॅडमिंटन हॉलमध्ये सुरु असलेल्या या स्पर्धेत उपांत्य फेरीत ११ वर्षांखालील गटात उपांत्य फेरीत स्थाव्य सिद्धार्थने सार्थक रिंगेचा १५-०२, १५-०१ असा तर, दुसऱ्या लढतीत देव मल्लूने दिव्यान वर्माचा १५-०६, १५-१० असा पराभव करून अंतिम फेरी गाठली. याच मुलींच्या गटात ए पाटील हिने रिया लोखंडेवर १५-१३, १५-०७ असा विजय मिळवला. तर, अन्या हळदणकरने अक्षती गुप्ताचे आव्हान १५-०८, १५-११ असे मोडीत काढले.

१५ वर्षांखालील मुलींच्या गटात अन्विता एम हिने नीती पंडितचा १५-०३, १५-०५ असा पराभव करून आगेकूच केली. प्रत्यशा दलाईने अनघा तरोणेचा १५-०१, १५-०१ असा सहज पराभव केला. याच मुलांच्या गटात ओम केने याने वेद मल्लूचा १५-०६, १५-०८ असा तर, ईशान मुलांगेने जयेश खेमणारचा १५-०६, १५-०६ असा पराभव केला. १९ वर्षांखालील मुलांच्या गटात साईश बी याने ओजस पाटीलवर १५-०४, १५-१० असा विजय मिळवला. चुरशीच्या लढतीत चैतन्य सक्तेने सुजल म्हस्केचा १५-०९, १२-१५, १५-१० असा संघर्षपूर्ण पराभव केला.

## पाकिस्तानात येण्यास नकार देणाऱ्या टीम इंडियाला हरवा!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ ला आजपासून सुरुवात होतेय आणि पाकिस्तानी अजूनही टीम इंडिया पाकिस्तानात येत नसल्यावर नाराज आहेत. टीम इंडियाने चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी पाकिस्तानात जाण्यास नकार दिल्याने स्पर्धा हायब्रिड मॉडेलनुसार खेळवावी लागतेय आणि त्याचा पाकिस्तानींना खूप राग आलाय. भारताचे सर्व सामने दुबईत खेळवले जाणार आहेत. आता भारत पाकिस्तान दौऱ्यावर येत नसल्याने त्यांना दुबईत जाऊन पराभूत करा, असे आवाहन माजी पाकिस्तानी महान खेळाडू शाहिद आफ्रिदीने केलं आहे. त्याने पाकिस्तानी खेळाडूंना भारतासह सर्व संघांना हरवण्यासाठी एक खास 'गुरुमंत्र' दिला आहे.

शाहिद आफ्रिदीचा एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे. त्यात तो म्हणाला, 'भारत आला नाही, आता मी त्यांना काय बोलावे. अन्य संघ पाकिस्तानात येत आहेत, मग भारतीय संघानेही यायला हवे होते. ते नक्कीच यायला हवे होते. जेव्हा जगातील सर्व संघ येत आहेत तेव्हा भारत का येत नाही? आता जे झाले ते झाले.. भारत कुठेही खेळत असला तरी, त्यांच्याविरुद्ध चांगली कामगिरी करणे हे पाकिस्तानचे काम आहे. पाकिस्तानने त्यांच्याविरुद्ध विजय मिळवायला हवा. पाकिस्तान संघावर आणि प्रत्येक खेळाडूवर खूप जबाबदारी असेल.'

## सीएसआर स्पोटर्स, विजय क्रिकेट अॅकॅडमी या संघांमध्ये विजेतेपदासाठी लढत !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**पुणे :** ट्वेन्टीफोर स्पोटर्स मॅनेजमेंट तर्फे आयोजित 'रायझिंग स्टार करंडक' १० वर्षाखालील मुलांच्या आंतरक्लब क्रिकेट स्पर्धेत सीएसआर स्पोटर्स आणि विजय क्रिकेट अॅकॅडमी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून स्पर्धेच्या अंतिम फेरीमध्ये प्रवेश केला.

सिंहगड रोड येथील कोंद्रे फार्म्स क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत विवान दांगट याने फटकावलेल्या नाबाद ५४ धावांच्या जोरावर सीएसआर स्पोटर्स संघाने एके स्पोटर्सचा ७७ धावांनी सहज पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करणाऱ्या सीएसआर स्पोटर्सने १११ धावा धावफलकावर लावल्या. विवान दांगट याने ३६ चेंडूत ८ चौकारांसह नाबाद ५४ धावांची खेळी केली. त्याला विदीथ रायकर याने २७ धावांची खेळी करून योग्य साथ दिली. याला उत्तर देताना एके स्पोटर्सचा डाव ३४ धावांवर गडगडला. सार्थक तावडे याने तीन धावांमध्ये दोन तर, अन्श चव्हाण याने सात धावांमध्ये २ गडी बाद केले.

नील सोलापुरे याने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर विजय क्रिकेट अॅकॅडमीने एमबीबी अॅकॅडमीचा ५० धावांनी सहज पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करताना विजय क्रिकेट अॅकॅडमीने १११ धावांचे आव्हान उभे केले. विहान ताकवले (३५ धावा), रियांश ताकवले (२४ धावा) आणि कार्तिकेय खरात (१४ धावा) यांनी संघाच्या डावाला आकार दिला. या लक्ष्याचा पाठलाग करताना एमबीबी अॅकॅडमीचा डाव ६३ धावांवर मर्यादित राहीला.

### 'अभिषेक ठाकूर करंडक' आंतरक्लब खुल्या गटाच्या ट्वेन्टी-२० क्रिकेट स्पर्धा

## मुंडे स्पोर्टस्, गेम चेंजर्स संघांमध्ये विजेतेपदासाठी लढत!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**पुणे :** पुणे क्रिकेट अॅकॅडमी आणि सागर कांबळे यांच्यावतीने कै. अभिषेक ठाकूर यांच्या स्मरणार्थ आयोजित 'अभिषेक ठाकूर करंडक' आंतरक्लब खुल्या गटाच्या ट्वेन्टी-२० क्रिकेट स्पर्धेत मुंडे स्पोर्टस् आणि गेम चेंजर्स या दोन संघांनी अनुक्रमे ब्रेव्हहार्टस् आणि हेमंत पाटील या संघांचा पराभव करून स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला.

मुकुंदनगर येथील महाराष्ट्रीय मंडळाच्या क्रिकेट नेक्स्ट अॅकॅडमीच्या मैदानावर सुरू असलेल्या स्पर्धेत कुणाल थोरात याने केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर गेम चेंजर्स संघाने हेमंत पाटील संघाचा ९२ धावांनी सहज पराभव करून अंतिम फेरी गाठली. पहिल्यांदा फलंदाजी करताना गेम चेंजर्स संघाने २०२ धावांचा डोंगर उभा केला. दिग्वीजय देशमुख याने ५४ धावांची खेळी केली. आदील अन्सारी (२७ धावा) आणि अभिनव तिवारी (२३ धावा) यांनीही धावांचे योगदान दिले. याला उत्तर देताना हेमंत पाटील संघाचा डाव ११० धावांवर गडगडला. गेम चेंजर्सच्या कुणाल याने ११ धावांमध्ये ४ गडी बाद केले. याशिवाय सव्य गजराज याने १० धावांमध्ये ३ गडी टिपले आणि संघाला सहज विजय मिळवून दिला.

जय बिस्ता याने फटकावलेल्या ११३ धावांच्या खेळीमुळे मुंडे स्पोर्टस संघाने ब्रेव्हहार्टस्चा ६५ धावांनी पराभव केला आणि अंतिम फेरी गाठली. प्रथम फलंदाजी करताना मुंडे स्पोर्टसने २५९ धावांचा डोंगर उभा केला. यामध्ये जय बिस्ता याने ६३ चेंडूत १५ चौकार आणि ५ षटकारांसह ११३ धावांची खेळी केली. त्याला शाश्वत जगताप याने ७० धावांची खेळी करून उत्तम साथ दिली. या लक्ष्याचा पाठलाग करताना ब्रेव्हहार्टस्चा डाव १९४ धावांवर मर्यादित राहीला. जय बिस्ता याने ३४ धावांमध्ये ४ गडी बाद करून संघाला विजय मिळवून दिला.

#रा